साप्ताहिक
# माणूस
१ फेब्रुवारी ८६/२ रुपये




## मंत्री महोदय,

## जॅम.. बटर.. सॉस संस्कृती नको




तलासरीत..

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे
अंक : छत्तिसावा

१ फेब्रुवारी १९८६
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ–सुरेश नावडकर



# मुंबापुरी

## □ बॉम्बेचे मुंबई

Rose by any other name ..असे विल्यम शेक्सपिअरने आपल्या एका नाटकात म्हटले आहे. गुलाबाच्या फुलाला दुसरे कोणतेही नाव दिले तरी त्याच्या सुगंधात फरक पडणार नाही असे शेक्सपिअरला वाटले तरी मुंबापुरीचे महापौर छगन भुजबळ ह्यांना मात्र वाटत नाही. राज्य सरकारची परवानगी न घेताच अस्मादिकांनी बॉम्बेचे 'मुंबापुरी' केले; आता छगन भुजबळ ह्यांनी समारंभपूर्वक बॉम्बेचे मुंबई असे नामकरण करण्याचा चंग बांधला आहे.

प्रजासत्ताकदिनी महापौरांनी मुंबापुरीच्या प्रवेशद्वाराशी (ह्याला इंग्रजीत गेटवे ऑफ इंडिया म्हणतात) एक सोहोळा घडवून आणला. ह्या दिवशी त्यांनी शिवाजीच्या पुतळ्याशी 'मुंबई' अशा नावाची संगमरवरी पाटी बसविली.

मुंबई महापालिकेच्या नगरसेवकांचा रस्त्यांची नावे बदलण्याचा जुना छंद आहे. दरमहा तीन ते चार रस्त्यांची तरी नावे बदलण्यात येतात. त्यासाठी खास समारंभही घडवून आणले जातात. रस्त्याचे नाव बदलल्यामुळे मराठी माणसाची अस्मिता सुखावली जाते असे म्हटले जाते. भुजबळांनी ह्या समारंभासाठी खास निमंत्रण पत्रिका छापून घेतल्या. महापालिका आयुक्त जमशेदजी कांगा ह्यांनीही वेगळे आमंत्रण पाठविले होते. ह्या पत्रिकात नामकरणाचा मुहूर्त अकरा वाजून चौदा मिनिटे असा देण्यात आला होता. महापालिकेत चौकशी करता आम्हाला असे सांगण्यात आले की, महापौरांनी खास ज्योतिष्यास पाचारण करून मुहूर्त शोधला. शहराचे नामकरण करण्यासाठी अशा प्रकारे मुहूर्त धुंडाळण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. असो.

आमच्या माहितीप्रमाणे (शेवटी ही पत्रकारांचीच माहिती असल्याने तुम्ही शक्यतो तपासून पहावी. नाही तर छापलेला प्रत्येक शब्द खरा मानाल!) शहराचे नाव बदलण्याचा हक्क राज्य सरकारला असतो आणि राज्याचे नाव बदलण्याचा हक्क केंद्र सरकारला असतो. महापालिका केवळ रस्त्यांची नावे बदलू शकते.

आपल्याकडे कोणत्याही प्रश्नावर आंदोलने उभारली जातात आणि अस्मितेच्या प्रश्नावर तर निवडणुकाही जिंकल्या जातात. बॉम्बेचे मुंबई असे नामकरण केले तरी ह्या शहराचे प्रश्न सुटणार नाहीत, असे कदाचित शेक्सपिअरसाहेब म्हणतील. पण त्यांचे काय जाते, निवडणुका लढविणे म्हणजे काही नाटके लिहिणे नव्हे. अशी नाटके अधूनमधून करावीच लागतात. एरवी भुजबळसाहेबांची मुले मात्र इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच जातात. अखेर वाघिणीचेच दूध ते; वरळी डेअरीतले एनर्जी पिऊन काय डरकाळी फोडता येते ?

## □ चित्रपटसृष्टी आणि वाडिया

वाडिया मूवीटोनचे जे. बी. एच. वाडिया वारले त्या दिवशी अस्मादिक रात्रपाळीवर होते. चार–पाच ठिकाणी फोनाफोनी करून वाडियांची माहिती मिळवली. बातमी लिहून काढली.

बारा पन्नासच्या नेहमीच्या ठरलेल्या गाडीत बहुधा हमखास भेटणारे रावळकाका दिसले. त्यांनी विशेष खबर काय म्हणून विचारलं. मी त्यांना वाडियांच्या मृत्यूची बातमी सांगितली. तर रावळकाका खूप हळहळले.

त्यांनी वाडियांची, त्यांच्या चित्रपटांची इत्थंभूत माहिती दिली. वाडियांच्या 'दे-धाड' स्टंटपटांनी आमचं बालपण उजळून काढलं

असं पुन्हा पुन्हा म्हणाले.

त्या जे बी. एच. वाडियाच्या शोकसभेला मुद्दाम हजर राहिलो. गेल्या सोमवारी, अठरा जानेवारीला, ताराबाई हॉलमध्ये पार पडली. हॉल जवळजवळ रिकामाच होता. समस्त वाडिया कुटुंब हजर होतं. शांत, सौम्य प्रकृतीचे, सत्तरीच्या पुढे गेलेले होमी वाडिया, वाडिया कुटुंबातल्या बायका, मंगळधाच्या पांढऱ्या ज्यॉर्जेटच्या साड्या, त्याला काळी किनार आणि फियरलेस नादिया वय खूप झालय. नादियाच्या हातात वॉकिंग-स्टिक होती पण डोळे तसेच. लुक-लुकणारे, मार्जारी

जुन्यापैकी प्रकाश पिक्चर्सचे विजयभाई भट आले होते तेही खूप थकलेत. मोजकच बोलले. पण त्यांच्या प्रत्येक शब्दात 'जेन्युईन लॉस'ची भावना होती. बाकी चित्रपट-सृष्टीने वाडियांना इग्नोअरच केलं

मार्लन ब्राण्डोने हॉलीवुडचं किती समर्पक वर्णन केलय ! 'हियर द साईज ऑफ द स्माईल डिपेण्ड्स ऑन द लेटेस्ट बॉक्स-ऑफिस सक्सेस.' वाडिया काही चलनी नाणं नव्हतं. ती एक संस्थाच होती

शोकसभेनंतर वाडियांचा 'मदहोश' दाखवला. मुबारक–मीनाकुमारी. 'मेरी याद में तुम ना आंसू बहाना.' हे तलतचं गाणं. मदनमोहनचं संगीत. विलायतखाचं पार्श्व-संगीत. सतारीचा एकेक स्ट्रोक थेट काळ-जाला भिडणारा..

पिक्चर संपला. गर्दीतनं वाट काढत एक जख्खड बोहरी म्हातारा पुढे आला. त्याने प्रेमभराने होमी वाडियांशी, नादियाशी शेक-हॅण्ड केला. उघड्या रोल्स रॉइसमधनं होमी आणि नादिया निघून गेले आणि हा म्हातारा मला फियरलेस नादियाचे फाईटिंग सीन्स ऐकवू लागला. मला अनायासे रावळकाकांची आठवण झाली.

### ☐ सूर आणि राष्ट्रीय एकात्मता

गेल्या खेपेला राजहट्टाविषयी लिहिलं होतं. आता हा राजहट्टाचा आणखी एक नमुना.

राज्यपाल कोना प्रभाकर राव सांप्रत राष्ट्रीय एकात्मतेच्या भरीव कामगिरीत रममाण झालेत हिंदुस्थानी आणि कर्नाटक संगीत परपरेचा मिलाफ साधणारा एक अडीच–तीन तासाचा कार्यक्रम करावा असं राज्यपालाच्या मनात आलं. आलं तर मग कसला वेळ दवडता ? भराभर हुकूम सुटले. दूरदर्शन, रेडियो, सांस्कृतिक संचलनालय वगैरे सरकारी हपिसातली माणसं कामाला लागली.

मागच्या शुक्रवारी, जानेवारी चोवीसच्या सध्याकाळी षण्मुखानंद हॉलमध्ये संगीत तालमीला गेलो. बरोबर फोटो घ्यायला मुकेश पारपियानी होताच आता मुकेश म्हणजे उत्तम फोटोग्राफर. पण मूड वगैरे बाबतीत किशोरी आमोणकर. जमलं तर ठीक. नाहीतर असा घुस्सा होईल की विचारू नका.

मैफलीत भीमसेनजी, लालगुडी जयराम, अमजद अली, अर्जुन शेजवळ असे तोला-मोलाचे कलाकार. फोटो काढायला मिळतील का असं तातारीना विचारलं. त्यांनी काना-वर हात ठेवले. 'यू आस्क गवर्नर.' गवर्नर स्टेजवर उभे राहून आशा खाडिलकरांची 'ओम नमोजी आद्या' या गाण्याची चाचणी घेत होते. काय विचारणार त्याना, कपाळ ?

अशोककुमार कार्यक्रमाचे निवेदक होते. ते एका खुर्चीवर शांतपणे बसून सगळा खेळ पहात होते. डोळ्यावर काळा चष्मा. जया बच्चन आल्या आणि गवर्नरसकट सगळ्यांची धावपळ सुरू झाली. जयाबाई सगळ्यांना दमातच घेत होत्या. टि. व्ही. च्या चंडोला-बाईंनी त्याना बनारसी साधा पान आणून दिलं तेव्हा कुठं कळी खुलली. जॉयादीदी, ऑतिशॉय भीषण. असं वागन बरं न्हवं.

आत मेकपरूममध्ये अमजद अली खा आणि लालगुडी जयरामन तालीम करत बसलेत मी तबल्यावर बसलेल्या उस्ताद शफातखाकडून फोटो काढण्याची परवानगी मागतो ते शक्य तितका त्रासिक भाव चेह-ऱ्यावर ठेवून, शुष्क, थंड आवाजात 'निका-लिये' असं फर्मावतात.

या संगीत क्षेत्रातल्या मान्यवरांना प्रेस-वाल्यानी, खास करून गुळगुळीत, ग्लॉसी मासिकानी, डोक्यावर चढवून ठेवलंय. अम-जद अली खा सरोद कशी वाजवतो ते सोडून त्याच्या bedroom eyes वर उसासे टाकून लिहिणारे पत्रकार आम्हाला ठाऊक आहेत आणि अतिशय फाकडू, मस्त इंग्रजीत हे लेख अशा ग्लॉसी मासिकातून छापून येतात. म्हणून कार्यक्रमाना उच्चभ्रूंची गर्दी होते.

कार्यक्रम राहतो दूर, सुंदर दिसण्यातच या रावसाहेबाचा आणि पंडितजींचा वेळ वाया जातो. बालगंधर्व, दीनानाथ, मास्टर मदन, बेगम अख्तर, उस्ताद बडे गुलाम, मन्सूर अण्णा... याना हे सगळं करण्याची जरूर कधी भासली नाही. आणि तरीही यांच्या सुरानी सगळा भारत एका सूत्रात बांधला गेला.

— विष्णू जयदेव

## पुणे वार्ता

### ☐ अभिनव वाढदिवस

पुणेकर खूपच 'सोशल' आहेत. त्यांच्या या 'सोशल'पणाचा अनुभव नेहमीच येत असतो; पण ते जसे सोशल आहेत तसेच मिस्किलही. जाताजाता कोपरखळ्या मार-ण्याचा त्याचा शौक जुना आहे. आता या दोन्ही गोष्टीचा मिलाफ झाला तर जे घडेल त्याचे प्रत्यतर नुकत्याच एका समारंभात दिसले.

हुतात्मा अनंत कान्हेरे पथावरचे विजेचे खांब. आता त्याना 'विजेचे' म्हणायचे ते केवळ त्याना विजेचे दिवे जोडले आहेत म्हणून. एरवी गेली साडेतीन वर्षे रस्त्या-प्रमाणेच तेही अंधारात आहेत. साडेतीन वर्षांपूर्वी या खांबाची स्थापना झाली. तेव्हा-पासून या खांबाकडे कोणी लक्षच दिलें नाही. वीज खात्याने पाहिले नाही आणि महा-पालिकेने विचारलें नाही. बिच्चारे खांब ! दाद कुणाकडे मागणार ? त्यांची पुणेकराच्या सेवेची हौस कशी भागणार ?

पुणेकरानाच त्यांची दया आली, खांबाचा साडेतीनावा वाढदिवस आला. सोशल पुणे-कराना उपरोधाची संधी मिळाली. दत्तवाडी-तील 'बाल शिवाजी मंडळ' व 'अपघात' या संस्थानी मिळून हा आडनिडा वाढदिवस साजरा केला आणि खांबाच्या उपेक्षेकडे संबंधितांचे लक्ष वेधले. या प्रसंगी सर्व खांबाना सजवण्यात आलं. नगरसेवक अंकुश काकड्यानी केक कापला साडेतीन मेणबत्त्या विझवल्या आणि जमलेल्या मंडळीनी

टाळ्यांचा कडकडाट केला. एकूणच उत्साहात हा हृद्य समारंभ पार पडला.

या प्रसंगी खांबांवर एक पाटी टांगण्यात आली होती. त्यात अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे आम्ही आपणास सेवा देऊ शकत नाही म्हणून त्यांनी दिलगिरी व्यक्त केली होती. असो. या वाढदिवस सोहळ्यामुळे संबंधित खात्यांच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्यात खांब यशस्वी झाले. आता ते रीतसर उजळतील आणि आपली सेवा रुजू करतील ही अपेक्षा !

### □ आणखी एक नवा प्रयोग

गेला हप्ता पुण्यात सांस्कृतिक–सामाजिक मरगळ जाणवतेय. फारसं काही घडलेलं नाही. क्रिकेटमध्ये हार खाल्ल्याने पुणेकरांना फटाक्यांचा आनंदही लुटता आला नाही. मोटोक्रॉसमुळे थोडा झंझावात एवढेच. बाकी सगळं सो...सो...चाललंय.

एकीकडे अशी मरगळ असताना शिवसृष्टीत मात्र बरंच काही चालू आहे. विश्राम बागवाड्यात बाबासाहेब पुरंदरे आपल्या छत्रपती प्रतिष्ठानद्वारे अफलातून संकल्पना सादर करताहेत. त्यांनी विश्रामबागवाड्याचे स्वरूपच बदलून टाकलंय. गणपतीत गणेश महाल, नवरात्रात भवानी महाल, दिवाळीत पुरंदर किल्ला आणि नंतर 'जाणता राजाचा' अफाट प्रयोग या एकामागून एक सादर झालेल्या अफलातून कलाकृतींमधून पुणेकर शिवसृष्टी अनुभवत आहेत.

ध्वनी आणि प्रकाशाच्या माध्यमातून शिवसृष्टी दर्शनाचा एक अभिनव प्रयोग आता बाबासाहेब योजताहेत. यासाठी त्यांनी प्रसंग निवडलाय महाराजांच्या सागरी पराक्रमाचा ! इंग्रजांसारख्या पाण्यातल्या माशाला महाराजांच्या आरमाराने कसे नेस्तनाबूत केले आणि आपला पहिला आरमारी विजय नोंदवला याचे रसभरित वर्णन या प्रयोगातून सादर होणार आहे. त्यांच्या इतर डोळे दिपवणाऱ्या कलाकृतींप्रमाणेच ती असेल यात शंका नाही.

या अभिनव योजनेचा मुहूर्त विश्रामबागवाड्यात भवानी महालात टेल्कोचे मेहरुणकरसाहेब यांच्या हस्ते आणि श्रीमन् छत्रपति उदयन महाराज यांच्या उपस्थितीत गुरुवारी २३ जानेवारीला संपन्न झाला. याप्रसंगी या योजनेचे स्वरुप बाबासाहेबांनी स्पष्ट केले आणि प्रसंगाचे वीरोचित वर्णन केले. उपस्थितांमध्ये पालिका आयुक्त बोंगिरवार होते. मेहरुणकरांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांचा गौरव केला. या योजनेत सहभागी झालेल्या कलाकारांचा परिचयही या निमित्ताने करून देण्यात आला.

या प्रयोगाची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. ध्वनि आणि प्रकाश माध्यमातून इतिहास दर्शनाचे प्रयोग भारतात इतरत्र चालू आहेत. लाल किल्ल्यातला हा प्रयोग प्रसिद्ध आहे. पुण्यात शनिवारवाड्यात अशा स्वरूपाचा प्रयोग होणार असल्याचे बऱ्याच दिवसांपासून ऐकतोय. यात्र अद्याप त्या संदर्भात काही घडलेले नाही. पुण्यासारख्या ऐतिहासिक शहरात असा प्रयोग नसावा हे दुर्दैवच. आता बाबासाहेबांच्या प्रयोगाने ते दूर होईल असे वाटते.

### □ औद्योगिक क्षेत्रात...

सांस्कृतिक मरगळ जाणवत असली तरी औद्योगिक क्षेत्रात मात्र घडामोडी चालू आहेत. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सने विविध विषयांवर व्याख्याने–परिसंवादांचा धडाका लावला आहे. हल्लीच घडलेल्या काही धाडी आणि छाप्यांच्या संदर्भातही पुणेरी औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडालेली आहे.

सुप्रसिद्ध उद्योगपती आणि बजाज ऑटो लि. चे संचालक राहुलकुमार बजाज यांचा बजाज ऑटोने मिळवलेल्या पाच मानाच्या पारितोषिकांबद्दल सत्कार करण्यात आला. हा सत्कार मराठा चेंबरने आयोजित केला होता. इकॉनॉमिक टाईम्स, आय. डी. बी. आय. प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिल, बिझनेस इंडिया आणि ए. आर. ई. आय्. या संस्थांची पाच पारितोषिके बजाज ऑटोने पटकावली आहेत.

बजाज ऑटो लि. हा पुणे परिसरातील अग्रेसर कारखाना आहे. या कंपनीची वहाने राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करीत आहेत. झपाट्याने प्रगत झालेल्या या कारखान्याच्या यशात राहुलकुमार बजाज यांचा सिंहाचा वाटा आहे. आपले उत्पादन हे जागतिक स्तरावर श्रेष्ठ ठरावे ह्यासाठी त्यांची निरंतर धडपड आहे. नेमकी हीच अपेक्षा त्यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. 'आपली बाजारपेठ संपूर्ण जग आहे हेच मनात धरून प्रयत्न करायला हवेत' असे विचार त्यांनी व्यक्त केले. मिळालेल्या सन्मानांचे श्रेय त्यांनी कामगारांना आणि अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांना दिले.

उत्पादकता त्यातील दर्जा आणि नियंत्रण या संदर्भात तरुण उद्योजकांना त्यांचे विचार मार्गदर्शक ठरावेत.

— मनोहर सोनवणे



शिकणे अधिक मनोरंजक !

# वृत्तपत्र-शाळेच्या वर्गात

वृत्तपत्रांचं आपल्या रोजच्या आयुष्यक्रमातलं स्थान अनन्यसाधारण आहे. तो तर आपल्या जीवनक्रमाचा अविभाज्य भाग आहे वृत्तपत्र आणि सकाळचा चहा ही जोडी तर परमेश्वरसुद्धा फोडू शकत नाही ही झाली मोठ्या माणसांची घरची कथा. घरात, ऑफिसमध्ये, ऑफिसला जाता-येताना गाडीत, बसमध्ये सर्वत्र आपण वृत्तपत्र पाहतो वाचतो. पण आपल्या मुलांच्या दिनक्रमात आपण वृत्तपत्राला कितीसा वेळ देतो ?

इथे मलेशियात मुलाच्या रोजच्या शाळेच्या वर्गातच वर्तमानपत्राला स्थान दिल गेलय ! आणि ते सुद्धा शाळेचे रोजचे इग्लिश, गणित, इतिहास, भूगोल वगैरे विषय शिकवण्यासाठी ! काही महिन्यापूर्वीच हा News paper In Education चा अभिनव प्रयोग इकडे सुरू करण्यात आला.

'New Straits Times' या इथल्या इंग्लिश दैनिकाने हा प्रकल्प हाती घेतला आहे शाळाशाळातून त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात येते आहे आणि मग त्या त्या शाळेतील शिक्षकाना त्यासंबधीचे विशेष शिक्षण देण्यात येते. तर हा NIE-News paper In Education प्रकार आहे तरी काय ?

रोजच्या वृत्तपत्रातील कुठलीही बातमी, छायाचित्र, जाहिरात, लेख याची शिक्षकांनी निवड करायची अन् त्याचा उपयोग एखादा विषय शिकवण्यासाठी करायचा हा या उपक्रमाचा मूळ गाभा आहे. ती बातमी विद्यार्थ्यांना वाचायला सागून त्याच्या अनुषगाने प्रश्न विचारणे; मुलाचे दोन ग्रुपस् पाडून त्यांच्यात चर्चा घडवून आणणे, अमुक एक गोष्ट का घडली या सबधीचा विचार करायला लावणे अशा अनेक प्रकारानी हे शक्य आहे. अगदी लहान वर्गापासून-चित्र कापून चिकटवणे ते १० वीच्या वर्गात चर्चासत्र घडवून आणणे-यापर्यंत त्या त्या वर्गाच्या योग्यतेप्रमाणे हे करणे शक्य आहे.

साध्या रोजच्या वर्तमानपत्रातला हवामानाचा अंदाज. शिक्षक मुलाना त्या अंदाजावरहुकुम चार्ट करायला सांगतील वेगवेगळे रग वापरून, वेगवेगळ्या प्रातातील एका विशिष्ट वेळेतील हवामान दाखवण्यात येईल. मग ते वेगळे का यासंबंधी कारणे शोधून पाहणे, पाठ्यपुस्तकातील कारणांशी ताडून पाहणे यामुळे सहजासहजी मुलाना आपल्या सभोवतालच्या प्रातातील हवामान तर कळेलच पण त्याची मूळ कारणमीमासाही शिकवली जाईल.

इग्लिश किंवा इतर कुठलीही- त्या त्या प्रांताची भाषा शिकवण्यासाठी तर वृत्तपत्र अनेक तऱ्हेने उपयोगी पडू शकेल. वृत्तपत्रातील बातमी किंवा संपादकीय वाचून त्यावर प्रश्न, त्याचे रसग्रहण, अवघड शब्दाचे अर्थ, तोच उतारा सक्षिप्त स्वरूपात लिहायला लावणे, त्या उताऱ्यातील शब्दांचा, भाषेचा व्याकरण शिकवण्यासाठी उपयोग अशा अनेक तऱ्हानी हे शक्य आहे.

शिकणे आणि शिकवणे या प्रक्रियेतील गोडी वाढवणे आणि शिकणे हे अधिक आनददायी आणि मनोरंजक करणे हा त्यामागचा मूळ उद्देश आहे. रोजचे वृत्तपत्र हे किमतीच्या मानाने किती अमूल्य माहिती देते हे वेगळे सागायला नकोच. वृत्तपत्राचा एक अक विविध विषयाच्या, विविध तऱ्हेच्या बातम्यानी भरलेला असतो. साध्या बातम्यांखेरीज त्यामध्ये तज्ज्ञाचे लेख असतात. वेगवेगळी छायाचित्रं, सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक, धार्मिक, थोडक्यात जीवनातल्या सर्व अंगाना स्पर्श करणारं हे एक 'जिवंत पाठ्यपुस्तक' ( Living Text book )च असत. पाठ्यपुस्तकातील माहिती काही वेळा कालबाह्य झालेली असते. पण वर्तमानपत्र कायम up to Date ! त्यामुळे शिकताना मुलाना रोजचे नवनवीन अनुभव. अर्थात यावरून असा गैरसमज होऊ नये की पाठ्यपुस्तकाला सुट्टी देऊन वर्तमानपत्रचं वापरावं. 'एन आय ई' योजनेचं तत्त्व वर्तमानपत्र हे पूरक पाठ्यपुस्तक म्हणून वापरावे असंच आहे.

वर्तमानपत्र शाळेच्या वर्गात आल्यामुळे होणारा महत्त्वाचा फायदा म्हणजे शाळेतील वर्ग आणि बाहेरचं जग यांच्यातील अतर कमी होऊन जाईल. सभोवतालच्या जगात घडणाऱ्या घटना कळत नकळत शिकत राहिल्यामुळे मुलाचं सामाजिक भान आपोआप जागृत होत जातं. वर्तमानपत्र म्हणजे फक्त बाबानीच वाचून त्यावर मित्रांशी वितंडवाद करण्याची गोष्ट नसून आपणही त्याचा उपयोग घेनो आहोत ही जाणीव मुलांत येईल ती निराळीच.

## शिकणे-शिकवणे

प्रत्येक वृत्तपत्रात प्रत्येकाला आकर्षित करणारं काही न काही नक्कीच असतं. रोजच्या घटना, संपादकीय, व्यंगचित्र, पुस्तक परिचय, सिनेमा, नाटक, कला, टीका लेख क्रीडा विभाग, जाहिराती एक ना अनेक-वर्तमानपत्र म्हणजे 'You name it, we have it असा प्रकार असल्यामुळे त्याला 'दैनदिन ज्ञानभाडार' च म्हणायला हरकत नाही. शाळेत रोज शिकवायच्या भाषा, इतिहास, भूगोल, शास्त्र या विषयाचे टिचिंग मटिरिअलही त्यामध्ये सहज उपलब्ध असते. उदा. नवीन वसाहतीतील होणाऱ्या घरबाधणी योजनेची जाहिरात किंवा Ownership Flat ची जाहिरात एखादा अंकगणिताचा पाठ घेण्याम सहज उपयोगी पडेल. शिवाय अंकगणिताचा पाठ-घराची किंमत, पर स्क्वेअर फूट दर, कार्पेट एरिया, त्यावरून वसाहतीतील सर्व घराची किंमत काढणे हा झाला अकगणिताचा पाठ. पण तो शिकता शिकता मुलाना आपल्या भागातील घराच्या, जागेच्या किमती यासारखे सामान्य ज्ञान अगदी सहज देऊन जातील.

भोपाळ किंवा मेक्सिकोतील भूकप यासारख्या दुर्घटना-ते कुठे आहे या भूगोलाच्या पाठाने सुरुवात केली तरी त्याशिवाय त्यामागची कारणमीमांसा, त्याचे भीषण परिणाम, त्याबद्दल सरकार, समाज, आपण काय करू शकतो याविषयीचे मुलाचे विचार जागृत करू शकतं.

मुलाचं शब्दभाडार वाढविण्यासाठीही वृत्तपत्राइतकं प्रभावी दुसरं काय असणार ? पुन्हा यातील शब्द हे रोजच्या जीवनातले अन् जे शब्द मुलांना आयुष्यभर वापरावे

पृष्ठ २९ वर

केंद्रीय अर्थमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांना अनावृत्त पत्र




# ट्रक्स्-टेंपो पडून असता, जॅम-बटर कशासाठी?

**सन्माननीय मंत्री महोदय,**

आपल्याच अर्थव्यवस्थेत राहणाऱ्या व आतापर्यंत जगलेल्या अतिसामान्य नागरिकाचा सादर प्रणाम.

पत्रास प्रारंभ करण्यापूर्वी मी आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो. कर्तबगार माणसं सर्वसाधारणतः विनयशील असतात. आपणही कर्तबगार आहात. त्यामुळे आपणही मी अभिनंदन करताच 'कसचं, कसचं' म्हणून विनयानं अभिनंदनाचं कारण विचारणार, हे मला ठाऊक आहे. खरं तर कारण एक नाही, एकाहून अधिक आहेत. प्राध्यापकी भाषेत सांगायचं तर याला कारणं तीन आहेत.

एकतर व सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्याला नुकतीच शाबासकी दिली. 'हा माझ्या मंत्रिमंडळातला सर्वोत्कृष्ट मंत्री आहे' असे त्यांनी म्हटले. राजीवजी आपले मंत्री व खासदार यांच्या कार्याचा नेहमी संगणकाद्वारे हिशोब ठेवतात. अर्थात हे मी आपणास सांगणे उचित नाहीच. कारण आपणही राजीवजींच्या मर्जीतले एक मंत्री आहात नि संगणक–योजनेचे पुरस्कर्ते आहात! तर गेल्या वर्षभरात आपल्या विविध मंत्र्यांनी काय काय काम केले याचा आढावा राजीवजींनी घेतला, (राजीवजींच्या कार्याचा आढावा पत्रकार–विचारवंत यांनी घेतला!) त्यात राजीवजींना असे आढळून आले की, विविध मंत्र्यांना गेल्या वर्षी जी उद्दिष्टे देण्यात आली होती ती गाठण्यात आपणच सर्वात अग्रेसर ठरलात. पहिल्या सहामाहीत आपण त्याच कालावधीसाठी आपल्या मंत्रालयापुढे असलेल्या उद्दिष्टांपैकी ९५ टक्के उद्दिष्टे पूर्ण केलीत. यामुळे राजीवजी आपल्यावर खूष होणे स्वाभाविकच होते. म्हणूनच त्यांनी आपले अभिनंदन केले व कौतुकही केले. आणि त्यासाठीच मी आपले पत्राप्रारंभीच मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. अभिनंदनाची इतर कारणे पुढे ओघात येणारच आहेत.

आणखी एकदा फेब्रुवारी महिना उजाडला आहे. आपल्याला आता अर्थसंकल्पाचे वेध लागलेले असणार. आपल्याप्रमाणेच इतर अनेकांना ते लागत असतातच. पण आपणाला ते जास्तच लागले आहेत, हे नुकतेच दिसून आले. सर्वसाधारणपणे अर्थसंकल्पापूर्वी एक महिना कोणत्याही वस्तू वा सेवेच्या किंमतीत वाढ केली जात नाही, हा एक अलिखित नियम आहे, एक संकेत आहे. पण गेल्यावर्षीपासून तो धाब्यावर बसविला गेला आहे असे दिसते. गेल्यावर्षी वाहतुकीच्या दरात अशीच वाढ केली होती. तर यावर्षी कोळशाच्या दरात टनामागे २७ रु. वाढ केली आहे. यामुळेच मी म्हटले की, आपल्याला अर्थसंकल्पाचे वेध इतरांपेक्षा अधिक लागलेले असतात, आहेत.

असो, हा कटू मुद्दा आपण तूर्तास बाजूला ठेवू. अर्थसंकल्पाचे वेध लागलेले असल्याने आपण सध्या गेल्या वर्षीचा आर्थिक आढावा घेत असणार, माहिती गोळा करीत असणार. गेल्या वर्षी आपण खरोखरच अत्यंत लक्षणीय कामगिरी केलीत.

प्रसिद्ध कायदेपंडित व अर्थतज्ज्ञ नानी पालखीवाला हे वास्तविक दरवेळी अर्थसंकल्पावर कडाडून टीका करीत असतात. आपले अर्थसंकल्प हे ठराविक साचाचे असतात व ते आपले मंत्री, जनतेचे प्रतिनिधी तयार करीत नसून प्रशासक मंडळीच तयार करीत असतात, असा त्यांचा आरोप अगदी गेल्यावर्षीपर्यंत होता; पण आपण गेल्यावर्षी आपला पहिला अर्थसंकल्प मांडलात त्यात करदर (आयकर) एकदम निम्म्यावर आणले. कमाल करदर ५० टक्के केला, नियंत्रणे कमी केलीं आणि त्यामुळेच आमचे नानीजी खूपच खूष झाले. राजीवजींची स्तुती आपल्या ओघवत्या इंग्रजी भाषेत करीत 'हा युगप्रवर्तक' अर्थसंकल्प असल्याचे त्यांनी जाहीर केले. येथेच आपण पहिला विजय मिळविलात. याच्याच जोडीला मग तुम्ही उद्योगांना मुबलक सवलती दिल्या. मक्तेदारी कायद्याचे क्षेत्र मर्यादित केले. १०० कोटी रु. पर्यंतचे उद्योग यातून सुटले. यामुळे तर अवघ्या उद्योग जगताने आपले कौतुक केले.

याच्याच पुढचा भाग म्हणून की काय, आपण वर्षाअखेरीस (डिसेंबरमध्ये) दीर्घकालीन वित्तीय धोरण जाहीर केले आणि या धोरणात इतर अनेक गोष्टींप्रमाणे पुढील पाच वर्षे वैयक्तिक आयकर दर स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच आपला करदर स्थिर ठेवूनही करोत्पन्न वाढविता येईल याबाबतचा आत्मविश्वास प्रकट केलात. आयकर व इतर करांची वसुली अधिक कार्यक्षमतेने केली तर उत्पन्न वाढते हे यामागचे आपले तत्त्व आहे.

कर वसुलीतली कार्यक्षमता वाढविण्याचे आपले तत्त्व खरोखर स्तुत्य आहे. यावर्षी पहिल्या सहामाहीत आपण गेल्या वर्षीच्या त्याच काळातील करवसुलीपेक्षा २५ टक्क्याने अधिक वसुली करून दाखविलीत, यामुळे आपला विश्वास गैरलागू व गैरवाजवी आहे असे वाटत नाही. शिवाय नुकतेच आपल्या पंतप्रधानांनी करदर वाढवून उत्पन्न वाढविणे

यापुढे शक्य नसल्याचे स्पष्ट केले आहे. (हैद्राबाद येथे बोलताना.)

आयकराचे उत्पन्न करदर कमी करूनही कसे वाढविले याचे उत्तर आपल्या दोन धोरणातून स्पष्ट होते. एकतर कररचना, करकायदे याचे सरलीकरण करण्याचा आपला यत्न, करदर कमी करून करदात्याना प्रामाणिक होण्याचे आपले आवाहन आणि दुसरे म्हणजे आपण करबुडव्याविरूद्ध उचललेले कठोर पाऊल. यामुळे दोन्ही बाजूनी आपण सरकारी तिजोरीत भर टाकण्याचा जो प्रयत्न केला तो प्रशसनीयच आहे.

## इंकॉ. चं काय ?

अर्थमंत्री होताच आपण व पंतप्रधान राजीव गाधी यानी काळयापैशाबाबत कडक धोरण अवलंविण्याच जाहीर केल होत आणि गेल्यावर्षी फेब्रुवारीत त्याची अमलबजावणीही सुरू झाली. मुबईतील नवानी बिल्डर्सवर आपल्या आयकरखात्याने, धाड घालणाऱ्या ९०० जणाच्या पथकाच्या सहाय्याने, धाडी घातल्या. तीन दिवस चाललेल्या या धाडी ३०० ठिकाणी घातल्या जात होत्या. त्यानतर धाडीचे हे सत्र आजतागायत चालू आहे. धाडी घालणे हे तसे नवीन नाही; पण सातत्याने धाडी घालणे व काळया पैशाच्या मागे हात धुवून लागणे हे मात्र यावेळी नवीन होते.

या धाडीतून बडेबडे उद्योगपतीही सुटले नाहीत. ऑर्के मिल, किर्लोस्कर उद्योगसमूह, बजाज गट या बडयासह अनेक उद्योग, सोन्याचादीचे व्यापारी, सगणक बनविणाऱ्या कंपन्या, बिल्डर्स नि आता मिठाई उत्पादकसुद्धा, या सर्वांवर धाडी घालण्यात आल्या. या सर्वांतून अनेक कोटी रुपयाचे उत्पन्न सरकारला मिळू शकेल, असे मत व्यक्त करण्यात येत आहे.

पण मत्री महोदय, या धाडीबाबत आपले केवळ कौतुक झालेले नाही किंवा केवळ प्रशंसा झालेली नाही, तर त्याबद्दल घणाघाती टीकाही झालेली आहे. दिल्लीतल्या काही व्यापाऱ्यानी म्हटले की, या वातावरणामुळे आम्हाला आता आमचे व्यवसाय बंद करावेसे वाटतात. काही उद्योजकानी व गिरीलाल जैन (टाईम्स ऑफ इंडिया) यांनी तर प्रथम राजीवजीवर धाडी घाला, मग इतरावर, अशी मागणी केली. किर्लोस्करांना ८२ व्या वर्षी अधिकाऱ्यांनी सायकाळी सहा पासून रात्री तीनपर्यंत छळले. याबाबतही कडवट प्रतिक्रिया आली काहीनी या धाडीना जी प्रसिद्धी दिली त्याबाबत टीकास्त्र सोडले. 'धाडीच्या प्रसिद्धीमुळे आमचे जे दोन पिढयांचे नुकसान झाले, आमची प्रतिष्ठा धुळीला मिळाली, याला जबाबदार कोण ? ' असा सवाल त्यानी केला आहे. धाड घालणाऱ्या आपल्या अधिकाऱ्याना १४ व २२ कॅरेट सोन्यातला फरकही समजत नाही, मग त्याचे मूल्याकन बरोबर कसे येणार, असा सवालही काहीनी विचारला आहे. एकूण काय की, या धाडी कोणाकोणाला आवडलेल्या नाहीत.

मात्र आपण आपल्या भूमिकेशी ठाम राहिलात. आर्थिक गुन्हा हा गुन्हाच आहे, त्याला प्रसिद्धी मिळालीच पाहिजे, हे आपले धोरण राहिले; पण खरच काहो, मत्री महोदय, इ. कॉं. कडे बराच काळा पैसा आहे ? जर असेल तर, त्याहीबाबत एकदा आपण काही कारवाई का करीत नाही ? तस झालं तर या धाडसीपणाला आणखी वजन प्राप्त होईल. आपल्याला तस वाटत नाही का ? काहीतरी चागला मार्ग काढून राजकीय पक्षाजवळचा काळा पैसा जाहीर करावा. शिवाय पक्षाना निवडणुकीसाठी समान निधी द्यावा; पण हे शक्य नाही. कारण याची शक्यता, माझ्या माहितीप्रमाणे नव्या मुख्य निवडणूक आयुक्तानी फेटाळून लावली आहे. त्यामुळे समातर अर्थव्यवस्थेचा हा स्त्रोत तसाच राहणार का? कारण एकीकडून आपण उद्योगपतीना राजकीय पक्षाना खुले आम देणग्या देण्याची मुभा देऊ करता व दुसरीकडे आपल्या पक्षाला देणगी मिळाली नाही तर त्याच्यावर धाडी घालता, अशी टीकाही सध्या होत आहे. मग राजकीय पक्षाजवळचा निधी जनतेला कळणार नाहीच का ? पण मी मात्र आपल्याबाबत खूप आशा बाळगून आहे. याबाबतही आपल्यासारखा निग्रही अर्थमंत्री काहीतरी करेल, याची खात्री वाटते.

गेल्यावर्षीपासून आपण भारताच्या एकूण आर्थिक धोरणात एक आमूलाग्र बदल घडविण्याचा सपाटा चालू केला आहे व त्यातील एक म्हणजे, आपण समाजवादी तत्त्वापासून थोडे ढळलेले दिसत आहात यापूर्वी इंदिराजीचे अर्थकारण ( इदिराजीचे म्हणण्याचं कारण त्यावेळी अर्थमंत्री स्वत: काही ठरवतोय असे वाटतच नसे. ) हे वरतून खालपर्यंत येणारे होते. त्याचा झिरप पद्धतीवर विश्वास होता एकूणच अर्थव्यवस्थेची प्रगती झाली तर ती खालच्या स्तरापर्यंत पोहोचेल, असा त्याचा विश्वास होता; पण प्रत्यक्षात तसे झाले नाही यामुळेच की काय, आपण धोरणात बदल केलात असे वाटते. अर्थात त्यात राजीव गाधीचे मार्गदर्शन आहे हे उघड आहे; पण आपण सध्या ज्या (डायरेक्ट) प्रत्यक्ष परिणाम पद्धतीचा पुरस्कार करीत आहात तोही फारसा सरळ आहे असे वाटत नाही. त्यामुळेही खालच्या स्तरावरच्याना फारसा लाभ मिळणार नाही.

याची अनेक कारणे देता येतील. एक तर आपल्या देशाची उपभोग रचना आपण समजावून घेतलेली नाही असे दिसते. माझ्यासारख्या सामान्याना खरोखर तुमच्या वैविध्यपूर्ण गाडया नकोत, तुमची जॅम, बटर, सॉस संस्कृती नको आहे. वेगवेगळया प्रकारच्या टूथपेस्ट, स्नो, क्रीम्स नको आहेत. आम्हाला हवं आहे रोजचं दोन वेळच जेवण, त्यासाठी हव आहे काम. पण सध्या तुमचे धोरण पाहता आम्हाला सतत रोजगार मिळेल असे वाटत नाही. पुन्हा याचे कारण आहे, आपण करत असलेली खुली व्यवस्था. मुळात नियंत्रणे कमी करण्यात काहीच चूक नाही; पण ती गुणात्मक पातळीवर कमी करणे आवश्यक आहे. आज तसे न होता, जे आपल्या देशात आज प्राधान्याच्या गरजेचे नाही त्यालाच आपण प्राधान्य देत आहात.

## आता अति झालं...

शिवाय जे तंत्रज्ञान आपण आणता आहात, ते पाहता, आपण सातव्या योजनेअखेर बेकारी संपूर्ण हटविण्याचे स्वप्न कसे रंगविता हे समजत नाही. नवीन तत्रज्ञानामुळे तात्पुरती बेकारी येते, नंतर ती वाढते हे झाल पाश्चिमात्य तत्त्वज्ञान. पण भारतात जेथे सध्याच बेरोजगारी कमाल स्थितीला पोहोचलेली आहे, तेथे या पाश्चिमात्य तत्त्वप्रणालीचा उपयोग किती होणार, हे आताच ठरवावे लागणार आहे– वेळ हातातून गेल्यानंतर हा विचार करणे योग्य होणार नाही. पुन्हा

एकदा टाईम्स ऑफ इंडियाच्या जैन यांचा इशारा नमूद करावासा वाटतो– ' साहेब सध्याच्याच धोरणाने आपण चालत राहिलात तर येत्या १० वर्षात ही अर्थव्यवस्था कोसळेल, ' अशी भीती त्यानी व्यक्त केली आहे.

ही भीतीही अगदीच चूक नाही. याचे कारण सध्याच पहाता, आपण वाहन उद्योगात आमूलाग्र बदल केलेत. खरच नवी छान वाहने पाहून आम्हालाही बरे वाटले. पण हे आता अती झालं अस वाटत. गेल्यावर्षी ट्रक टॅंपो यासारखी व्यापारी वाहने पडून आहेत अशी ओरड आहे. केवळ मालट्रकचीच सख्या १० ते १२ हजारापर्यंत आहे तेथे मदी आल्याबरोबर ती आता सर्वत्र पसरू पहात आहे. हीच स्थिती दुचाकी वाहनांबाबत दिसणार आहे. बजाज सारखे उत्पादक म्हणतात, शक्य आहे ती सगळी बाजारपेठच आपण मिळविण्याच्या प्रयत्नात आहोत. (औरगाबाद युनिट भेटीच्या वेळी बजाज म्हणाले होते.) याचा अर्थ बजाजांसारखे काही मक्तेदारच या स्पर्धेत टिकणार, बाकीच्याचें काय? सध्या चाळीस प्रकारची दुचाकी वाहने धावत आहेत त्यामुळे मदीची भीती खोटी ठरेल असं वाटत नाही. किर्लोस्कर उद्योग समूहाच्या काही युनिट्समध्ये सध्या तीन दिवस सुट्टी दिली जात आहे, हेही मदीचेच एक लक्षण आहे.

याशिवाय नवीन तंत्रज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान आणण्यासाठी आपल्याला रोकड मोजावी लागत आहे. जुने-पुराणे तंत्रज्ञान आणताना सवलती होत्या, त्या आता नाहीत. त्यामुळे आपल्या परकीय चलन गंगाजळीवर फारच ताण पडत आहे. परवाच रिझर्व बॅंकेने धोक्याचा इशारा दिला आहे. आपली निर्यात लक्षणीयरीत्या वाढली नाही तर आपले खरे नाही, असे बॅंकेचे म्हणणे आहे आणि आपण तर सध्या आयात साखरेचेही कौतुक टिव्हीवर करीत आहोत. 'क्या थोडी चिनी और मिल सकती है?' हे कशाचे लक्षण आहे? चहा, साखर व इतर शेतमाल या आपल्या वास्तविक निर्यातीच्या वस्तू. त्याही आपण आयात करीत आहोत. यामुळे आपण आतरराष्ट्रीय व्यापारातील तूट वाढवित आहोत हे स्पष्ट होते

निर्यात वाढवून जर आयात बिले देण्याचा धडाका लावला तर आपण वेगळयाच दुष्टचक्रात सापडणार आहोत कारण राजीवजीच्या व आपल्याही म्हणण्यानुसार आपण आता अपारपारिक वस्तूच्या निर्यातीवर भर देणार आहोत. त्यामुळे आपल्या देशातील गरजा बाजूला सारून परदेशीय गरजांना प्राधान्य द्यावे लागणार. यालाच अर्थशास्त्रीय भाषेत केंद्र व परीघ उपपत्ती म्हणतात. अर्थात हे मी आपणास सांगण्याची गरज नाही. फक्त एवढेच म्हणावेसे वाटले, आपली दुर्मिळ साधनसामग्री आपण परकीयाच्या गरजांसाठी वापरत आहोत यात धोका आहे. शिवाय देशातले उत्पादनही फक्त बडयाच्या गरजा भागविणारे आहे.

सहज आठवलं म्हणून सागतो. रिझर्व्ह बॅंकेचे माजी गव्हर्नर आय. जी. पटेल यानी एके ठिकाणी म्हटले आहे की, 'सध्या ज्या वस्तूची आयात आपण करीत आहोत वा जे उत्पादन करीत आहोत ते चुकीचे आहे. पण देशात तसे उत्पादन होत असेल, यापूर्वीच त्यासाठी परवाने दिलेले असतील तर माझे काही म्हणणे नाही. याचे कारण श्रीमतच श्रीमताचे पैसे काढून घेतात असे होईल. मला त्याचे काही वाटणार नाही.'

## आपण हे विसरलात ?

आय. जी. पटेल याचे म्हणणे किती चुकीचे आहे हे लगेच स्पष्ट करता येईल. अहो श्रीमताचा पैसा श्रीमत काढतात हे वरवर योग्य वाटते. पण याचा अर्थ पटेलसाहेब, महनीय माजी गव्हर्नरसाहेब ऑफ आर. बी. आय. हे फक्त पैसा पाहात आहेत, असे दिसते. पण त्यामागे वास्तव सपत्तीचा, दुर्मिळ साधनसामग्रीचा वापर अग्रक्रम नसणाऱ्या गरजाकडे वळवावा लागतो हे आमचे पटेलसाहेब विसरेलेले दिसतात. पण एक शका मनात येते. साहेब, आपणही ही प्राधान्ये विसरलेले आहात काय? कारण राजीव गाधी, आपण दारिद्रय रेषेवर अनेकाना आणण्याची घोषणा करीत आहात. पण प्रत्यक्षात सध्या तरी त्यासाठी आवश्यक पाऊले उचलल्याचे कोठेच दिसत नाही.

मत्री महोदय, शेवटी हे पत्र आहे. फार लांबलेल चालणार नाही कारण लिखाणाच्या ओघात एकादी चूक होऊ शकते त्यामुळे पत्र आता आटोपणेच योग्य होईल. पण माझ्यासारख्या अनेक सामान्य नागरिकाना आपल्या नेतृत्वाबाबत आशा आहेत. जरी आज बेकारी वाढण्याचे चित्र दिसत असले, सामान्याना प्रत्यक्ष काही लाभ मिळत नाही असे वाटत असले, देशाच्या दुर्मिळ साधनसामग्रीचा वापर अग्रक्रमानुसार होत नसला, तरी करदर कायम ठेवणे, परिणामांची पर्वा न करता व दोष पत्करून काळया पैशावर हल्ला करणे, गुंतवणूक वाढीसाठी प्रयत्न करणे या धनात्मक पावलांमुळे आमच्या आशा पल्लवीत होत आहेत कारण येथे कृतीची जोड दिसते आहे. काम केली जातात तेव्हाच चुका होतात, हे आम्हा सामान्याना अधिक चांगले ठाऊक आहे.

अर्थसंकल्प दारी आला आहे. तेव्हा यावेळी आम्हा सामान्यासाठीही बरंच काही तो करेल याची खात्री वाटते. सातव्या पचवार्षिक योजनेसाठी लागणारा पैसा आपण सामान्याना आवश्यक असलेल्या वस्तूवर कर लादून मिळवणार नाही याबाबत खात्री वाटते. खुल्या बाजारात आपल्याला तो उभा करण्याची धडपड करावी लागणार आहे. त्यासाठी आपण बचतीच्या नव्या योजनेत दिलेला व्याज दर, ११ ते १५ टक्के, यामध्ये ठेवावा लागणार आहे. त्यामुळेच आपण खासगी क्षेत्राकडून बचत आकृष्ट करू शकणार आहात. तशी ती मिळविलीत म्हणजे सामान्यावर नवा करभार पडणार नाही. सध्या आपण करदर कमी केले आहेत पण ते १८ हजार रु. च्या पुढे जे आयकर भरणे या जन्मात शक्य नाही त्या, वर्षाला चार–पाच हजार रु. मिळवून, रोजच्या रोज हातातोडाची लढाई करणाऱ्याबाबत आपली काही योजना नसावी का? त्याच्या रोजच्या वापराच्या वस्तूवर भरमसाठ कर आहेत ते केव्हा जायचे? करातली ही प्रतिगामिता केव्हा सपायची? आपण श्रीमताना दुखविण्यास कचरत नाही याबाबत खात्री आहे आणि म्हणूनच आपण आय. जी पटेलांसारखी विधाने न करता साधनसामग्रीचा ओघ गुणात्मक व प्राधान्यांच्या दृष्टीने वळवाल याची खात्री वाटते

आपल्या ठोस पावलाबद्दल पुन्हा एकदा अभिनंदन. राजीव गाधीची शाबासकी यावेळी आपण मिळविलीत पुढच्या काही वर्षात आपल्यालाही राष्ट्रीय नेतृत्वाची प्रभा लाभो व इतराना शाबासकी देण्याची सधी प्राप्त होवो हीच या अर्थसकल्पाचे वेळी शुभेच्छा. हे विधान करण्याचे कारण एकच आहे व ते म्हणजे राजीव गाधीच्या तुलनेत सध्या फक्त आपलेच नाव घेतले जात आहे पण हो साहेब, सावधान! पतप्रधान व्हायची स्वप्ने वगैरे पाहू नका, नाही तर माजी अर्थमंत्री प्रणव मुखर्जींप्रमाणे वाताहात व्हायची बाकी आपणाला हे कोण सागणार म्हणा! आपण समंजस, कृतीप्रवण आहात. तेव्हा तूर्तास नव्या अर्थसकल्पाकडे आम्ही आशेने पहात आपली रजा घेतो.

—अनिल शिंदे

# एक सव्वीस जानेवारी

तो सव्वीस जानेवारीचा दिवस नक्की कोणता होता हे निदान आज तरी मला आठवत नाहीये. त्या दिवसापासून आजच्या एखाद्या निष्णात लेडीज अँड जेण्टस् स्पेशालिस्ट टेलरनं पॉलिस्टर कापड टराटर फाडाव तस माझं मन फाटल गेलंय या देशात आपल कुणी आहे की नाहीय असा सभ्रम पडत गेला असल्यास त्यात काही नवल नाहीय. यात कमालीचाच नव्हे तर जिच्याएवढा देखील देशद्रोह नाहीये.

त्या दिवशी खूप सोसल. रडलो. रडल्यानंतर डोळ्यात आलेलं पाणी कुठल्या पाणवठ्याच असेल याचा विचार केला. ते तर मनून निर्माण केलेल्या पाणवठ्यातल होत हे आता उमजलय. आज देखील ते अधून-मधून येत असतच ! अशावेळी ऐन थंडीच्या मोसमात घाम फुटतो. रक्तारक्तातून सघर्षाची पाखरं चित्कारायला लागतात ! शेवटी त्याला सुद्धा या समाजव्यवस्थेनं कुठतरी लगाम घातलाय याची जाणीव होते !

... तर एक सव्वीस जानेवारीचा दिवस! ओठ पिळल तर त्यातून दूध निघणार नाही अस बालपण. बालपणातली अल्लड–विद्यार्थी दशा. खाकी शर्ट, खाकी हाफ पँटची शाळेची सक्ती. चड्डी कधी ढुगणावर फाटलेली. शर्ट बकुटयावर फाटलेला. पोषाख धुवायला कधी पाचशे एक साबणाची वडीसुद्धा मिळत नव्हती ! हिंगण्याच्या दुधाळ फेसात तो धुवायचा. काश्याच्या तांब्यात चुलीतले लालभडक विस्तव घालायचे. तांब्या खूप गरम व्हायचा त्याच्या बुडाला जरा थुकी लावायची. चर्रचर्र असा आवाज झाला की इस्त्री पेटली असं समजायचं. मग पोतं घ्यायच. धुराळा झाडायचा. झकासपैकी जमिनीवर अथरायचं त्यावर पँट–शर्टला इस्त्री करायची. पहाटे पाचला उठून अगोदरच महारआडावर आंघोळ करून आलेला असायचो. त्यामुळं थोडी तरतरी यायची.

काश्याच्या तांब्यात विस्तव घालून इस्त्री केलेला पँट–शर्ट मी अगावर चढवला. आता मी कसा दिसत असेन याची भयंकर उत्सुकता मनाला लागली होती. घरात आरसा तर नव्हताच. इकडं–तिकडं बघितल घरात सगळी मातीची भांडी होती. एक परात मात्र पितळेची होती. आईनं ती लख्ख घासून ठेवलेली. परात मी पुढ्यात धरली. त्यात माझा चेहरा मी पाहिला ! सकाळी सातच्या आत शाळेकडं जाऊ लागलो. इनशर्ट करायचा राहून गेल्याची आठवण झाली. लघवीचं निमित्त करून धोंडाच्या आड गेलो. तिथं इनशर्ट करू लागलो. इनशर्ट करायची मोठी हौस असताना देखील तो करवेनासा झाला कारण खाकी चड्डी ढुगणावर फाटली होती ! परतु गुरुजीची इनशर्ट करायची सक्ती असल्यानं कसा–बसा इनशर्ट केला.

ती चिरेबदी मराठी शाळा होती आज सव्वीस जानेवारी म्हणून दोन–तीन दिवस अगोदर रगवून घेतलेली. बाहेर गेट. गेटातनं बरीच मुलं शाळेच्या आवारात प्रवेश करताहेत. मी थंडीनं काकडून गेलेलो. गेटातनं प्रवेश करायला बघतो. माझ्या ढुगणावर फाटलेल्या चड्डीकडं बघून गावातल्या तालेवाराची मुलं–मुली हसताहेत ! मी पुरा शरमून जातोय. ही सारी मुलं–मुली गुलछबू. मुलाचा टेरिकॉटचा खाकी पोषाख. मुली रगीबेरंगी कपड्यातल्या. मी मात्र वैराण माळावरच्या मोडक्या झोपडीसारखा. ओढ्याच्या पलीकडं पडलेला. मला बघून मुलं–मुली चेहरा पाडतात. गेटाजवळ उगीचच गर्दी करतात. मला लवकर आवारात जाता येऊ नये हा त्याचा एकमेव हेतू मी गेटापासून जरा दूर जातो. गुरुजी शिट्टी फुकतात, तसा या गुलछबू तालेवार मुला–मुलींचा घोळका आवारात जायला धडपडतो. हळूहळू सर्वजण आवारात येतात. मी सकोचत आवारात शिरतो !

'झेंडावंदन करायचंय; रागेत उभ रहा' –गुरुजी खांदा उडवित म्हणाले. सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींनी झटपट रागा केल्या. 'तू आमच्यापस्न दूर रहा' एक विद्यार्थी नाक उडवीत मला म्हणाला. त्यावर माझ्या हातापायातनं क्षणभर वारं गेल्यासारखं झालं ! या रांगेत मला सर्वांच्या शेवटी उभं रहायला सागितल जातय तशी मला पुढ पुढं करायची फार हौस असायची. परतु ओढ्यापलीकडल्या महाग्वाड्यातला मी ! माझ्या भाव–भावना, महत्त्वाकाक्षा, जिद्द, सारं काही ओढ्यापलीकडं ठेवायला लागायचं. सार्वं रांगेत उभा रहाताना सुद्धा माझ्यावर असे प्रसंग यायचेत. एका अर्थी रांगेत सर्वांच्या शेवटी उभ रहाण माझ्यादृष्टीनं फायद्याचं होत. कारण ढुगणावर फाटलेली खाकी हाफ पँट तरी कुणाला दिसणार नव्हती. त्यात मी उच आणि तगडा. त्यामुळं रांगेत सर्वांच्या मागे उभा रहाण्याचा प्रसग उंच विद्यार्थ्यालाच येत असतो, म्हणून माझ्या मनाला हे दुःख फारसं बोचलं नाही.

एका विद्यार्थ्यानं तिरंगी ध्वज आणला. त्यात फुलाच्या पाकळ्या गुंडाळायच्या होत्या. मला वाटत होतं, आपण पुढं जावं. सर्वांना बाजूला सारावं. ध्वज हिसकावून घ्यावा. आपण त्यात प्रेमानं फुलाच्या पाकळ्या भराव्यात, ध्वजारोहणाच्या खांबावर तो दोरीनं चढवावा. येणारे पाहुणे ध्वजारोहण करतील. त्याबरोबर झेंड्याला मानवदना दिली जाईल. मी तिरंगी झेंड्यात गुडाळलेल्या फुलाच्या पाकळ्या सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनी, गुरुजन, प्रमुख पाहुणे याच्या झकपक पोषाखावर पडतील. माझी ओढ्याबाहेरच्या वस्तीतली छाती फुगून जाईल. मनाला भरतं येईल. पण मला झेंड्याजवळ यायला सर्वांचा अटकाव होता. तो अटकाव का होता हे मला उमजत होत. मुळी गुरुजींनी केलेल्या रांगाच चातुर्वर्ण्याश्रम पद्धतीच्या होत्या त्या रांगेतनं ध्वजापर्यंत येणं म्हणजे चातुर्वर्ण्याची उतरंड कोसळल्यासारखं होतं. मी ध्वजापासून दूर... माझ्या विकसित होऊ पहाणाऱ्या मनाचं गलबत ओढ्याबाहेरच्या नेहमी शात असणाऱ्या समुद्रात या समाजव्यवस्थेनं कायमचं नागरून टाकलेलं. मला त्या ध्वजाजवळ कोण येऊ देईल ? हे सर्व मी डोळ्याच्या धगधगीत बाहुल्यात साठवत होतो !

प्रमुख पाहुणे आलेत. सर्वांनी शिस्तीसाठी अंग आखडलं. त्यांनी झेंड्याची दोरी आपल्या हातानं ध्वजस्तंभाच्या टोकापर्यंत नेली. हिसका दिला तसा, फुलाच्या पाकळ्यांचा वर्षाव झाला. तिरगा डौलानं फडकत राहिला. 'झंडा उँचा रहे हमारा, विजयी विश्व तिरंगा प्यारा'... गीत झालं. रविंद्रनाथांचं 'जन–

गण–मन अधिनायक जय हे भारत भाग्य-विधाता' हे राष्ट्रगीत म्हटलं गेलं. पण माझं मन बोचत राहिलं. त्या फुलांच्या पाकळीतली एक पाकळी जरी माझ्या अंगावर पडली असती तर माझ्या ओढ्याबाहेरच्या मनाला भरतं आलं असतं. मनूनं मला निर्माण केलं होतं ! त्या पाकळ्यानासुद्धा मनूनं निर्माण केलं होतं काय ? होय त्या फुलाच्या पाकळ्या मनूनंच निर्माण केल्या होत्या. कारण त्या वर्षावातली एखादी पाकळीसुद्धा माझ्या देहावर का पडली नाही ? पडली असती तर मी ती तशीच हातावर घेतली असती. जमिनीवर पडू दिली नसती !

आता गावातून प्रभात फेरी होती. ध्वजवंदनासाठी उभ्या केलेल्या रांगा गुरुजींनी तशाच गेटबाहेर काढल्या. प्रभातफेरी सुरू झाली ! गुरुजींनी 'उगवूया भारत दिव्य नवा... दिव्य नवा... दिव्य नवा...' या गीताची ललकारी दिली, त्यांचा सूर पल्लेदार होता. तो सूर आम्ही ओढत राहिलो. 'घरेदारे स्वच्छ ठेवा' 'मुलामुलींना शाळेत पाठवा' 'जय जवान जय किसान' 'महात्मा गांधीचा विजय असो' 'पंडित जवाहरलाल नेहरू की जय' 'आझाद हिंद सेनेचा विजय असो' 'प्रजासत्ताक दिन चिरायू होवो' अशा घोषणांनी गाव दुमदुमून गेला. गावातल्या बाया–बापड्या प्रभातफेरीतल्या आपआपल्या मुलाकडं कौतुकानं पहात होत्या. माझ्याकडं असं कौतुकानं बघणारं कुणी नव्हत. आई–वडिल सर्वजण ओढ्याबाहेरच्या महारवाड्यात. ते जर गावात राहायला असते तर ?... ही प्रभातफेरीपण ओढ्याबाहेरच्या महारवाड्यात, मागवाड्यात... जाणारी नव्हती. हां . प्रभातफेरीत दिल्या जाणाऱ्या घोषणांतून बाबासाहेबाना वगळलं जात होतं त्यानी तर मोठ्या प्रयासानं स्वतंत्र भारताची राज्यघटना केलेली. ही राज्यघटना याच सव्वीस जानेवारीला त्यानी राष्ट्राला अर्पण केली हा इतिहास क्रमिक पुस्तकात मी वाचला होताच... मग बाबासाहेबांचाही जयघोष या प्रभातफेरीत कुठय ? तो जयघोष चौदा एप्रिललाच केवळ ओढ्याबाहेर ऐकायला यायचा.

प्रभातफेरी एकदाच सर्व गावाला वेढा देऊन शाळेच्या गेटसमोर आली. आता मुला–मुलींचा सास्कृतिक कार्यक्रम होणार होता. गेटमधून एकएक जण शाळेच्या आवारात यायला लागला. हा हा म्हणता आवार फुलून गेला. ध्वजवंदन चुकविणारी विद्यार्थी मंडळीसुद्धा भित भित जागा शोधत होती. माझी नजर मात्र डौलानं फडकणाऱ्या तिरंगी झेंड्याकडं होती !

इकडं व्यासपीठावर हार्मोनियमचा सूर... तबला लावणं .. तबला मला किंचित बघायला मिळायचा. आज सुद्धा तबला मला फारसा आवडत नाहीय चमवाद्यातला तो बैठा प्रकार वाटतोय. तमाशातील ढोलकी मात्र आवडतेय. कडं-ढोलकीच्या जुगलबंदीनं अंगातलं रक्त अजून सळसळतय. गुडघं टेकून ढोलकी वाजविणं सोपं नाहीय !

झकमक खाकी पोषाखातली चार–चौघं अकस्मात व्यासपीठावर आलीत. खड्या सुरात ती म्हणू लागलीत....

भारताचा तिरंगी झेंडा आमुचे
निशाण ।। धृ ।।
दादाभाई नवरोजी पहिले
लोकमान्य टिळक दुसरे
आधि गोखल्याना मान
भारताचा तिरंगी झेंडा आमुचे निशाण !
भारताचा तिरंगी झेंडा आमुचे
निशाण !!

कुणीतरी 'मी गेलो रानात ढेकूण माझ्या कानात या ढेकणानी मला किती भंडगवलय' हे विनोदी गीत सादर केलं. माजराच्या कळवडीची नक्कल केली. भांगडा नृत्य करण्यात आलं. मुलींच्या नृत्याचा कार्यक्रम झाला. ते चौघे विद्यार्थी पुन्हा व्यासपीठावर आलेत. खड्या सुरात पुन्हा म्हणू लागलीत.. ...

पडित सागून गेले बंधूनो आम्हाला ।।धृ।।
लागूया आपआपल्या कामाला
सोळा वर्षे राज्य त्यानी केले
जगासाठी शरीर झिजवले
गेले निजधामाला...
लागूया आपआपल्या कामाला.. ...

आता वक्तृत्व स्पर्धा होणार होत्या. स्पर्धेसाठी मी नाव नोंदविलं होतं. कोणत्या विषयावर बोलायच यावर काही बंधन नव्हत. शेवटी खेडेगावातली शाळा ती ! कुणी कोणत्या विषयावर किती बोलावं ? कस बोलावं याचं प्रशिक्षण सहमा कोण देत नव्हत. ज्यान–त्यान आपआपल्या बुद्धीन भाषण तयार करावं. पाठ करावं नि बोलावं... मी वक्तृत्व स्पर्धेला विषय निवडला होता. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' मी या विषयावर बोलणार आहे हे कुणालाच माहीत नव्हतं.

क्रमिक पुस्तकांतली व इकडची–तिकडची थोडी माहिती मिळवून मी ते भाषण कसं बसं तयार केलेलं. भाषणाचा कागद घेऊन मी चार–पाच दिवस माळावर एकटाच जायचो. तिथं घोकमपट्टी करीत बसायचो. माळावरून इकडं–तिकडं फिरायचो. काही ओढ्याबाहेरच्या मंडळींना मला वेड लागलं आहे अस वाटायचं. एखाद–दुसरा येऊन खडे मारायचा. अय्या अय्याऽऽ करीत माझ्या समोरून जायचा. माझं अशा त्याच्या करामतीकडं पूर्ण दुर्लक्ष असायचं त्यामुळं भाषण चांगलं मुखोद्गत झालं. त्यात महाडच्या मुक्तिसंग्रामाचाच अधिक समावेश असल्यानं अंग फुरफुरायचं. स्पर्धा नक्कीच जिंकू असा आत्मविश्वास दुणावायचा.

भाषणासाठी गुरुजींनी माझं नाव पुकारलं. मी अंग अखडूनच व्यासपीठावर गेलो. मला बघताच सर्वजण हसू लागलेत. काहीजण स्तंभित झालेत. 'हा काय बोलणार ओढ्याबाहेरचा महार ?' असं प्रश्नचिन्हच जणू त्याना पडलं होत. कारण या सर्वांना महार केवळ तमाशातच दिसायचा. मला व्यासपीठावर आल्यानंतर हसणारी व स्तंभित होणारी मंडळी बाबुराव कुपवाडकर, शिवासंभा कमलापूरकर, भाऊबापू माग, नारायणगावकर, नाना मनेवकर, पेंढ्या बावाजी, नायकू कामेरीकर या सर्व ओढ्याबाहेरच्या मंडळीचे तमाशा ऐकताना हवेत फेटे उडवायचे. गण–गौळणीत बाबू कुपवाडकर कृष्ण होऊन मथुरेला जाणाऱ्या गवळींना आडवायला यायचा तेव्हा त्यानं सहज कोशा फेटा बांधलेली आपली मान एका झटक्यात उडविली की, त्याच्या रसिकतेला उधाण यायचं, या सर्वांना मी तमाशातला सोंगाड्या तरी वाटत नाही ना ? या शकेनं मी अधिकच भयभीत झालो. तस स्टेज डेरिंग ठेऊन मी बोलू लागलो. 'आदरणीय गुरूजन, गाववाले व विद्यार्थीबंधू–भगिनींनो ! आज मी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' याच्या महाडच्या चळवळीवर सागणार.....' तोवर अकस्मात व्यासपीठावर झणकन् एक दगड आला...

'आंबेडकरावर सागायला हितं काय वढ्याबाहिरचा महारवाडा हाय व्हय' असा एकान आवाज काढला. 'हुर्यो' म्हणून सर्वजण उभी राहिलीत. चार–चौघानी मला फरफटत व्यासपीठावरन खाली खेचल ! मढ उचलाव तसं धरल आवारातनं गेट बाहेर आणलं. ज्यायला म्हणून एकान माझ्या पाठीवर जोरानं हाताचा दणका दिला. मी तोंडावर पडलो. डोळ्यात घळकन् पाणी तरारलं. असख्य हुदके आवरून मी कसाबसा उठलो आणि ओढ्याबाहेरच्या दिशेनं पावल टाकू लागलो.......

—भास्कर कांबळे, दापोली

# बर्ट्रंड रसेल म्हणतात....

## प्रेमाच्या सत्तेला ख्रिश्चन धर्माचा विरोध आहे

### केनेथ हॅरीस यांनी घेतलेली मुलाखत

**प्रश्न :** तुम्हाला भेटलेल्यात सर्वात चित्त-वेधक व्यक्ती कोण ?

**रसेल :** काय हा प्रश्न ! केन्स–कोनराड यांची नावे सागता येतील. कोनराड हा तसा आकर्षक नव्हता. आणि विन्स्टन चर्चिल. मी विन्स्टनचा मोठा चहाता आहे. त्याच्याशी माझे कधीच जुळले नाही. परंतु मला आदर वाटतो तो त्याच्या मनोधारणेबद्दल नाही, तर त्याचे सामर्थ्य आणि धैर्य यासाठी. मला वाटतं आमच्या काळातला डिझरेली हा सर्वात कर्तबगार पुरुष होय. लॉईड जॉर्जजवळ लोक-विलक्षण गुण होते परंतु त्याच्यावर विश्वास ठेवता येत नसे. मी त्याचा द्वेष करण्याचा यत्न केला, पण ते जमले नाही. कारण तो इतका गोड आणि छान माणूस होता, की मला त्याचा द्वेष करताच येईना. परंतु त्याची विश्वासार्हता ही मला सदैव शकास्पदच वाटत होती.

**प्रश्न :** केन्स याने महत्त्वाची कामगिरी केली ती शिक्षक या भूमिकेत केली, की सार्वजनिक जीवनाचा भाष्यकार या नात्याने केली ?

**रसेल :** मी त्याचे सार्वजनिक कार्यच फार चहातो. तो धोका पत्करणारा होता. जी माणसे विश्वविद्यालयातून शिकवतात ती बहुश: भित्री असतात ! म्हणून तर ती युनिव्हर्सिटधातून रहातात-बाहेर येत नाहीत. त्याचे शिकवणे हे घास्तावलेल्या माणसाचे शिकवणे असते. म्हणून त्याचा फारसा परिणाम होत नाही आणि त्या शिकवण्याची दखल घेण्याचे कारण नाही.

प्रत्येक बुद्धिवादी माणसाला जीवनात लवकरात लवकर काही प्रमाणात गांजवणूक अनुभवाला यायला हवी. फार छळ नाही; कारण तो त्यांना खलासच करील. पण थोडासा मानसिक छळ अत्यावश्यक असतो. ग्रहणशक्ती ताजीतवानी असते तेव्हाच आपले उमेदी असलेले तरुण, विश्वविद्यालयातून अशा घास्तावलेल्या शिक्षकाच्या तडाक्यात सापडतात, हे त्यांचे दुर्दैव होय. तिथे ते जे शिकतात त्यातून ते हळूहळू बाहेर येतात पण यात खूप वर्षे जातात.

**प्रश्न :** सध्या जे तत्त्वज्ञानी आहेत, त्यांच्यात तुम्हाला आक्षेपार्ह काय वाटते ?

**रसेल :** सर्वात काही आक्षेपार्ह असेल, तर चर्चा ही रोजच्या व्यावहारिक भाषेतच झाली पाहिजे हा त्यांचा अट्टाहास ! विशिष्ट अर्थ प्रगट करणारे शब्द वापरण्याबाबतची त्याची आग्रही भूमिका. या शब्दाच्या अर्थाचा जास्तीत जास्त संक्षेप करण्यात ते अतोनात वेळ घालवतात.

**प्रश्न :** मला आठवतं की मी लहान असताना माझ्या वडिलानी, तुमचे 'रोड्स टू फ्रीडम' पुस्तक वाचल्यावर, तुमच्या लिखाणातील अल्पाक्षरत्वाची फारच तारीफ केली होती.

**रसेल :** मला माझे म्हणणे अगदी थोडक्यात सांगून पुस्तक हातावेगळे करण्याची त्यावेळी घाईच होती, कारण मी लगेचच तुरुंगात जाणार होतो.

परतु मी पधरा वर्षाचा असल्यापासून जेव्हा मला मी सार्वजनिक कार्यात पडेन की लेखक होईन, की आणखी कोणी, याची कल्पना सुद्धा नव्हती, तेव्हापासून या ना त्या कारणाने मला हा नादच लागला, की कमीतकमी शब्दात आपले म्हणणे मांडायचे. मी यासाठी मेहनत घेऊ लागलो आणि त्याचा मला पुढे उपयोग झाला.

**प्रश्न :** मी जेव्हा तुमचे लेखन वाचतो तेव्हा मला कधी कधी असे वाटते की, सरकारने एखाद्या प्रश्नाविषयी काहीही मत माडले तरी ते चुकीचेच आहे असे तुम्ही गृहीतच धरता.

**रसेल :** त्या – त्यावेळी जी परिस्थिती असते–त्याचा साधकबाधक विचार सरकार करते, अशी आपण अपेक्षाच करू शकत नाही. कारण जोपर्यंत या सरकारातून विचार करायला ज्यांना वेळच नाही अशा माणसांचा भरणा आहे, तोपर्यंत अशी अपेक्षा करणे व्यर्थ होय. विचार करायला वेळ द्यावा लागतो–राजकारण्याना सतत भाषणे करायची असल्याने, तो विचार कधी करणार ? जी माणसे केवळ 'सभ्य' या एकाच गुणावर आपल्यावर राज्य करतात अशांचे राज्य चालू देणे आपल्याला परवडणार नाही. अडचण ही असते की, राजकारण्याच्या दृष्टीने, पुन: निवडून येणे हेच त्यांना महत्त्वाचे असते आणि जोपर्यंत अणुबाँब, संरक्षण किंवा अशा अन्य महत्त्वाच्या प्रश्नावर मुळी निवडणुका होतच नाहीत, तोपर्यंत इतर फालतु प्रश्नावर ही मडळी पुन. निवडून येतात.

**प्रश्न :** युद्धविरोधी असे तुमचे जे सर्व-साधारण विचार होते, त्यात तुम्ही बदल का केला ?

**रसेल :** पहिल्या महायुद्धाच्या वेळी मी संपूर्ण शांततावादी होतो पण दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी नव्हतो अहिंसात्मक विरोधावरचा माझा विश्वास उडाला, जेव्हा स्टॅलिनने लक्षावधी शेतकऱ्याचे काय केले ते मी पाहिले. त्याने त्याना हेतुपुरस्सर, हळूहळू उपाशी ठेवले व मारले. ते काहीच करू शकले नाही. हिटलरने ज्यूंच्या बाबतीत हेच केले. त्याने लक्षावधी ज्यूंना नाहीसेच केले मुख्य म्हणजे हे घडत होते, तेव्हा कोणाच्या ध्यानीही आले नाही, हा त्यातला सर्वात भयंकर भाग होता. त्यागाला महत्त्व असते, जर तो त्याग कुणाच्या नजरेस पडला असला तर ! यामुळे अहिंसात्मक विरोधाचे मूल्य स्वाभाविकच मर्यादित ठरते. हिटलरने माझ्यातील शांततावादी संपवला.

सर्वच्या सर्व समाजाने अहिंसात्मक विरो-

धाच्या नादात सामूहिक आत्महत्या स्वीकारणे, हा वेडगळपणा आहे जर समाजच नष्ट झाला तर मूल्याला काय अर्थ आहे ?

**प्रश्न :** पण मग काही लोकांना तरीही हा मार्ग योग्य का वाटतो ?

**रसेल :** ख्रिश्चन शिकवणुकीचा हा परिणाम आहे. हा धर्म आणि इतर काही धर्म, मोठ्या प्रमाणावर लोकांना यावर विश्वास ठेवायला शिकवतात, की या जन्मात ते जेवढा छळ सहन करतील, तितके ते पुढल्या जन्मात अधिक सुखी होतील !

**प्रश्न :** परंतु ख्रिश्चन धर्मातील काही कल्पना आणि विचार असे नाहीत का की ज्याबद्दल तुम्हालाही प्रेम वाटावे ? उदा. तुम्ही म्हणता की तुमची धडपड यासाठी आहे की, जगात स्वातंत्र्याचा, आशावादाचा आणि प्रेमाचा फैलाव अधिकाधिक व्हावा. ख्रिश्चन हा धर्म प्रेमाच्या सत्तेवर आधारलेला आहे ना ?

**रसेल :** ( संतापाने ) प्रेमाच्या सत्तेला ख्रिश्चन धर्माचा विरोध आहे ! उलट, ख्रिश्चानिटीमध्ये प्रेमाचा मागमूस नाही. जो धर्म, अनुयायी आपल्याला सोईस्कररीत्या वागावे म्हणून नरकातील वणव्याची भीती घालतो, तो प्रेमावर आधारलेला आहे असे कोण म्हणेल ?

**प्रश्न :** पण ख्रिस्ताने नरकातील आगीचा उपयोग केलेला नाही.

**रसेल :** सेंट पॉलने केला आणि ख्रिश्चन चर्चचे बहुतेक मुखंड ही भीती घालतात.

**प्रश्न :** मी ख्रिश्चन चर्चबद्दल बोलत नसून ख्रिश्चन धर्माबद्दल सांगतोय.सद्यस्थिती अशी आहे की ख्रिस्ताची शिकवण ज्यानी आयुष्यात स्वीकारली, त्याच्यावर, ज्याला तुम्ही प्रेम म्हणता त्या गुणाचा विलक्षण परिणाम झालेला दिसतो. ते ख्रिश्चन म्हणून संघटित ख्रिश्चन चर्चचे सभासद होते की नव्हते हा निराळा मुद्दा आहे

**रसेल :** त्यानाही माझा विरोधच आहे.

**प्रश्न :** का ?

**रसेल :** कारण '*अप्रामाणिकता*' त्यांनी स्वेच्छेने किंवा आवश्यक म्हणून पत्करलेली आहे. आपल्या कृतीचा न्यायीपणा सिद्ध करण्यासाठी, त्यानी 'देव' नावाची एक वस्तू निर्माण केली आहे. याला बुद्धिवादी आधार काहीही नाही आणि हे जर बुद्धिवादी जीव *असतील, तर त्याना ही गोष्ट समजायला* हवी. समजून ते ढोंग पाघरतात म्हणून ते अप्रामाणिक आहेत आणि जिथे जिथे मला अप्रामाणिकता दिसते–त्याला त्याला मला विरोध केलाच पाहिजे. ख्रिस्त याबाबत काय म्हणाला, ते पहा ! शरीरवासनेच्या पापाबद्दल तो म्हणाला की, जो कोणी स्त्रीकडे वासनामय दृष्टीने पाहील त्याने तेच पाप केले, जे तिला भ्रष्ट करणाऱ्याने प्रत्यक्ष केले. किती हा आचरट सिद्धांत आहे ! एखादी आकर्षक स्त्री पाहिल्यावर जर एखाद्या सुदृढ प्रकृतीच्या पुरुषाच्या मनात, काही एक प्रकारची वैषयिक प्रतिक्रिया उत्पन्नच झाली नाही, तर त्या माणसात काही तरी न्यून आहे असेच म्हणायला हवे. सेंट पॉलने आणखी काही अशी दुष्ट वचने सांगितली असतील, पण सुरुवात ख्रिस्तानेच केली. ख्रिश्चन धर्माच्या या सोवळेपणाने खूपच अनर्थ केलेला आहे. सुजाण आणि समजुतदार अशा वृत्तीने काही मर्यादित यश मिळाले असते. मी हे पाहिले की ज्या देशात दारूबंदी आहे, तिथे दोनच प्रकारचे लोक असतात. अतोनात पिणारे दारूडे आणि मद्याला स्पर्श न करणारे सोवळे !

## मोठा कोण ?

**प्रश्न :** जो मोठा माणूस समजतात, तो नेमका कशामुळे मोठा ठरतो ?

**रसेल :** पहिली गोष्ट म्हणजे ज्या गोष्टी *व्यक्तिभावरहित आहेत,* अशा गोष्टीबद्दल त्याचे टोकाचे आग्रह असतात. अशा गोष्टी की ज्याच्याशी त्याचा काहीच व्यक्तिगत स्वार्थ निगडीत नसतो. दुसरी गोष्ट अशा माणसापाशी विश्वास बसणार नाही असा निर्धार असावा लागतो आणि परिणामाची पर्वा न करता, आपल्याच मार्गावर त्याची अविचल श्रद्धा असावी लागते.

**प्रश्न :** बुद्धीपेक्षा इच्छाशक्तीच्या जोरावर मोठा माणूस मोठा होतो का ?

**रसेल :** यातील एक किंवा दोन्ही असायलाच पाहिजेत असे नाही. तो काहीसा त्याचा प्रकृतीधर्म असतो. असे काही तरी त्याच्यापाशी असते, की ज्यामुळे तो कशापुढे नमत नाही.

**प्रश्न :** तुमच्या काळात असे काही थोर पुरुष होते किंवा आहेत असे तुम्हाला वाटते का ?

**रसेल :** नक्कीच– अशी काही माणसे *सांगता येतील. केवळ परिणामकारकतेचा* विचार केला– मग तो बरा–वाईट कसाही असो– तर मला वाटतं आमच्या काळातला सर्वात मोठा माणूस लेनिन म्हणावा लागेल. याचा अर्थ मी त्याने जो परिणाम घडवला, त्याचा चहाता आहे असे नाही. पण त्याने इतिहासाच्या एकूण चालीवरच जो परिणाम केला तो खरोखरच खूप मोठा आहे.

**प्रश्न :** तुम्ही कधी लेनिनला भेटला होता का ?

**रसेल :** हो. हो. एक तासभर मी त्याच्याशी गप्पा मारल्या आहेत.

**प्रश्न :** काय मत झालं तुमचं ?

**रसेल :** मला तो कोत्या मनाचा वाटला. जणू क्रॉमवेलचा दुसरा अवतारच. मला वाटतं त्याचे क्रॉमवेलशी खूपच साम्य होते. फक्त त्याने पुढे मार्क्स ठेवला होता तर क्रॉमवेलने बायबल. पण नाहीतर दोघात फारसा काहीच फरक नव्हता.

**प्रश्न :** तुमचे बोलणे काय झाले ?

**रसेल :** तो बोलत होता. मी बरेच प्रश्न विचारीत होतो. मी म्हटले, 'तुम्ही समाजवाद आणू पहाता आहात असे मी समजतो, तर प्रत्यक्षात तुम्ही शेतकऱ्याची मालकशाही प्रस्थापित करीत आहात यावर तो म्हणाला, 'छे: छे. हे काही खरे नाही. अर्थात तुम्हाला असे दिसेल की आम्ही, गरीब शेतकऱ्यांना श्रीमंत शेतकऱ्यांविरुद्ध उठवतो आहे व लवकरच ते श्रीमंत शेतकऱ्याना झाडाना टांगून टांगून मारतील. हा: हा: हा:' तो हे सांगत असताना माझे रक्त गोठल्यासारखे झाले. पण मी मोठ्या माणसाची जी लक्षणे सांगितली त्यानुसार तो मोठा माणूस होताच.

**प्रश्न :** ब्रिटनमध्ये तुमच्या काळात कोणी असा मोठा माणूस झाला का ?

**रसेल :** हो. विन्स्टन चर्चिल याला मी मोठा माणूस समजतो. दुर्दैवाने १९४० मध्ये मी अमेरिकेत होतो. पण त्यावेळी मला चर्चिलविषयी विलक्षण कृतज्ञता वाटत होती. तो त्यावेळी त्याच गोष्टी सांगत होता, ज्या सांगायलाच हव्या होत्या आणि याबद्दल मी त्याच्या कायमच्या ऋणातच रहाणार आहे.

भाषांतर–
वि. ग. कानिटकर

# तलासरीच्या परिसरात



मागील अंकात तलासरी परिसराची ओळख आणि तिथल्या कम्युनिस्ट पक्षाचे श्री. कोम व श्री. ओझरे यांच्या मुलाखती दिल्या होत्या. या अंकात तिथल्याच विश्व हिंदू परिषदेचे श्री. माधवराव काणे व त्यांचे सहाय्यक श्री. अप्पा जोशी व सौ. शोभा जोशी यांच्या मुलाखती.

मुलाखती : **विनया खडपेकर**

**प्रश्न** : या केंद्राची सुरुवात कधी झाली ?

**श्री. काणे** : १९६७ मधे.

**प्रश्न** : या ठिकाणी काही योजनाबद्ध कार्यासाठी यावं असं तुम्हाला का वाटलं ? येथे येण्यापूर्वी तुम्ही कोणकोणत्या प्रकारच्या सामाजिक कार्यातून गेला होतात ?

**काणे** : लहानपणापासून थोडंफार काहीतरी उत्साहानं करीतच होतो. सुरवातीच्या काळात रा. स्व. संघाच्या शाखेत जात होतो. नंतर कल्याणमधे जनसंघ या पक्षाचं काम करायला लागलो.

**प्रश्न** : रा. स्व. संघाच्या शाखेत वयाच्या साधारण कितव्या वर्षी जायला लागलात ?

**काणे** : मला आठवतं आहे तेव्हापासून मी संघाचा स्वयंसेवक आहे १९३० चा माझा जन्म. आमचं घराणं संघाचं. मोठे भाऊ संघात जात होते. आमच्याकडे साधारण १९४० पासून संघ सुरू झाला.

**प्रश्न** : रा. स्व. संघाकडून 'जनसंघ' या राजकीय पक्षाकडे केव्हा वळलात ? तुम्हाला जनसंघात बोलावलं की रा. स्व. संघ कुठेतरी अपुरा वाटायला लागला, राजकारणाची आवश्यकता भासायला लागली म्हणून तुम्ही जनसंघाकडे वळलात ?

**काणे** : अगदी नेमकं असं आठवत नाही. पण १९५३ मधे कल्याण नगरपालिकेच्या निवडणुका होत्या. या नगरपालिकेचं राजकारण हे एक प्रकारे गटबाजीचं. श्रीमंती गटबाजीचं राजकारण होतं. तेव्हा मतदानाचा पहिला हक्क मिळाला. त्याचवेळी मी निवडणुकीला उभा राहिलो आणि पडलो. मी जनसंघाचा म्हणून उभा राहिलो नव्हतो. अपक्ष उमेदवार होतो. कारण आमच्या इथे कल्याणमधे जनसंघाची स्थापनाच झालेली नव्हती. जनसंघ तेव्हा अखिल भारतीय पातळीवर काम करीत होता. महाराष्ट्रातही होता. पण जिल्हावार जनसंघाची स्थापना चालू होती. पूर्ण झालेली नव्हती.

**प्रश्न** : अपक्ष म्हणून तुम्ही उभे राहिलात तर तुमचा प्रचार कोणी केला होता ?

**काणे** : आसपासच्या सगळ्या तरुणांनी. उभे राहिलेले सगळे बराच काळ राजकारण खेळलेले होते. मी अगदी तरुण होतो. प्रस्थापितांच्या विरुद्ध म्हणून साहजिकच तरुणांचा माझ्याकडे ओढा होता. जिंकणाऱ्यांना काहीतरी हजार–बाराशे मतं मिळाली. मला आठशे मिळाली. पडलो तरी त्या पडण्यातही आनंदच होता. त्यानंतर 'जनसंघ' कल्याणमधे सुरू झाला. जनसंघाच्या आरंभापासूनच मी कल्याणमधे जनसंघासाठी काम करायला लागलो. गोवा विमोचन समितीचा सत्याग्रह सुरू झाला. तिथल्या गोळीबाराचा धनी झालो. हाताला गोळी लागली. नंतर एकवीस दिवस मी तिथल्या तुरुंगात होतो. काही दिवस हॉस्पिटलमधे होतो. त्यामुळे कल्याणमधे माझी एक वेगळीच प्रतिमा तयार झाली. तिचा उपयोग जनसंघाला झाला. १९५७ मधे मी कल्याणच्या नगरपालिकेतून निवडून आलो. कार्पोरेटर झालो.

**प्रश्न** : १९५७ ते १९६७ हा पूर्ण काळ तुम्ही कार्पोरेटर होतात? येथे आलात ते नगरपालिकेतलं पद सोडून ?

**काणे** : असं आठवत बघा, १९६४–६५ मधे मी नगराध्यक्ष होतो. नगराध्यक्षाची मुदत संपली. नंतर जरी नगरपालिकेचा सभासद होतो तरी मी कल्याण सोडलं. महिन्यातून एखाद्या मिटिंगपुरता जात होतो. पण फारसा रस राहिला नाही. तेव्हाच जनसंघाचा जिल्हा सेक्रेटरी होतो.

**प्रश्न** : ही दोन्ही पदं सांभाळताना कोणत्या प्रकारच्या कामांची जबाबदारी तुमच्याकडे आली ? कार्पोरेटर म्हणून कोणती कामं केली आणि जनसंघाचा जिल्हा सेक्रेटरी म्हणून कोणती कामं केली ?

**काणे :** कल्याणमधल्या प्राथमिक शाळा जिल्हा परिषदेकडे होत्या. कार्पोरेटर असताना आम्ही त्या नगरपालिकेकडे घेतल्या, कारण शाळांसाठी नगरपालिकेला जिल्हा परिषदेला काही लाख रुपये द्यावे लागायचे. ही रक्कम नगरपालिकेकडे राहिली तर नगरपालिका आपल्या दृष्टीनं सोयीच्या इमारती उभ्या करू शकेल, शिक्षणात फेरफार करू शकेल अशी शक्यता होती. अशी थोडी सुरुवात तेव्हा झालेली होती. ते काम आम्ही पूर्ण केलं, कल्याणमधे नळाचं पाणी नव्हतं. एकंदर पाण्याचा तुटवडा होता. टोपलीचे संडास होते. असं भरपूर. नगरपालिकेच्या आमच्या दहाबारा वर्षांच्या काळात ड्रेनेज योजना येण्याकरिता पूर्वतयारी, पाणी योजनेसाठी टाक्या बांधणे, टाक्यांमध्ये पाणी येणं यासबंधीचा खटाटोप केला. याशिवाय नगरपालिकेचं टाऊन प्लॅनिंग केलं पाहिजे अशी मागणी होती. कल्याण नगरपालिकेनी ती योजना पास केली होती; पण नगरपालिकेतले राजकीय पक्षाचे मतभेद इतके विकोपाला गेले होते की प्रकरण हायकोर्टात गेले. स्थगिती मिळाली. टाऊन प्लॅनिंगच्या कायद्यामध्ये दुर्दैवाने एक अशी व्यवस्था आहे की एकदा सुरू केल्यावर त्याच्या तारखाप्रमाणेच ती अमलात येऊ शकते. नाहीतर चांगलाच ढिले, उशीर होतो. मतभेदांमुळे उशीरच झाला. मी असताना नाही, तरी पुढे माझे सहकारीच तेथे असताना, टाऊन प्लॅनिंग अमलात आलं.

जनसंघाचा जिल्हा सेक्रेटरी म्हणून पक्षाचं संघटनात्मक काम करीत होतो. जव्हार भागात शेतकऱ्यांचे मेळावे मी घेतले होते.

## गटबाजी होतीच

**प्रश्न :** तेव्हा मेळाव्यामधे कोणते कार्यक्रम होते ?

**काणे :** सरकारने शेतीवरचा मालकी हक्क नष्ट करून सहकारी शेती ही कल्पना मांडली होती. जनसंघाचा याला विरोध होता. त्यासाठी शेतीसंघटना आम्ही बांधत होतो.

**प्रश्न :** १९५७ च्या आसपासच्या काळातलं बोलता आहात म्हणजे सहकारी साखर कारखान्यांना तेव्हा नुकतीच सुरुवात झाली होती. त्याचे फायदे-तोटे कळायचेच होते. तरी जनसंघाचा सहकाराला विरोध का होता ?

**काणे :** सहकारी साखर कारखान्यांना आमचा विरोध नव्हता. सहकारी शेतीला विरोध होता. जे सर्वांचंच आहे ते कोणाचंच नाही असं घडून शेतीची अनास्था झाली असती. आमचं सहकारी शेतीविरुद्धचं जनआंदोलन आम्ही तेव्हा यशस्वी केलं.

**प्रश्न :** कार्पोरेटर आणि पक्षाचं चिटणीसपण ही दोन्ही पदं एकदम सांभाळताना काही तणाव, संघर्ष आले ?

**काणे :** नाही. फारसा नाही. दोन्हीकडे वेळ देऊ शकत होतो.

**प्रश्न :** वेळाच्या दृष्टीनं नाही. पण पक्षामधे तुमच्यावर कोणीतरी असणार त्याचा दबाव तुमच्या कार्पोरेटर पदावर आला नाही ? अमुक एक गोष्ट करवून घ्या असा कार्पोरेटरवर पक्षाकडून कधीतरी दबाव येणं अपरिहार्य वाटतं.

**काणे :** नाही. असं तितकसं झालं नाही. कारण मुख्य म्हणजे आम्ही सगळे नवीन होतो. नगरपालिकेत प्रतिनिधित्व करायला गेलेले आम्ही नवीन होतो. आम्हाला मार्गदर्शन करणारे पक्षाचे लोकही नवीन होते. आपसात सर्वानुमते निर्णय व्हायचे. शिवाय नगरपालिकेत जनसंघ म्हणून आमची सत्ता आलीच नाही. आमचे गट असायचे. शेतकरी-कामकरी पक्षाचा गट, आमचा गट.

**प्रश्न .** गट म्हणजे गटबाजी. एकाने विधायक कार्य करायचे म्हटलं की दुसरा बखेडा काढणार ? यातून मार्ग काढणं कसं जमत होतं ?

**काणे :** गटबाजी होतीच. फारच रंगतदार प्रसंग घडायचे. चीफ ऑफिसरच्या खाली पवार म्हणून इन्स्पेक्टर होते. चीफ ऑफिसरच्या सेवानिवृत्तीनंतर पवार चीफ ऑफिसर होणार. हे पद सांभाळण्याची त्यांची ताकद नाही असं माझं मत होतं. आमच्याबरोबर त्यावेळी शेतकरी कामकरी पक्ष होता. सरकारी अधिकारातला, सचिवालयातून कोणी तरी चांगला चीफ ऑफिसर यावा ही माझी इच्छा कृष्णराव धुळुपना मी सांगितली. त्यांचे माझे व्यक्तिगत संबंध चांगले होते. पण नगरपालिकेत ब्राह्मण ब्राह्मणेत्तर वाद होता. बरंच काम पैशावर चालायचं प्रत्येक मिटिंगकरता हरिजनाचं सहाय्य घ्यावं लागायचं. कृष्णराव धुळुपांचा पाठिंबा त्यांच्याच सहकाऱ्यांना असायचा मला म्हणायचे सहकारी ऐकत नाहीत. मला हार खावी लागली. पवार चीफ ऑफिसर झाले. मी नगराध्यक्ष होतो तेव्हाच पवार चीफ ऑफिसर होते. अतिशय घाबरून काम करायचे कुठच्याही प्रकारे त्यांनी मला कधी अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला नाही. मी त्यांना तोंडावर सांगत असे, 'तुमची लायकी नसताना तुम्ही चीफ ऑफिसर झालेले आहात. त्यामुळे जरा जपूनच वागलं पाहिजे.' माझं नगराध्यक्ष पद संपल्यावर त्यांना चीफ ऑफिसरचं पद सोडून द्यावं लागलं. नगरपालिकेचं राजकारण हे नेहमीच अगदी घाणेरडं असतं. यात मी होतो म्हणून या ठिकाणच राजकारण मला सुलभ गेलं. पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका कशातून तरी गेलं की राजकारण चांगलं कळायला लागतं. कटु अनुभव येतात. कटु अनुभव येत असतानासुद्धा सगळ्यांनी मिळून सत्तेत राहिलो तर काही काम करता येतं, हेही मला त्याच ठिकाणी कळलं. कल्याणची नगरपालिका दरिद्री. पैसे अपुरे. त्यामुळे रस्त्याचं काम नीट व्हायचं नाही. दरवर्षी खडी टाकायची. रोलर फिरवायचा. माती टाकायची. पावसाळ्यात रस्ते पुन्हा होते तसे. सगळ्यांनी मिळून ठरवलं, एक वर्ष रस्त्याचं काम नाही. जो तक्रार करत येईल त्याला माझ्याकडे पाठवायचं. मी शिव्या खायला तयार. एक वर्षाचं बजेट शिल्लक ठेवलं. दुसऱ्या वर्षी अधिक मोठं बजेट करून कल्याणच्या परिसरातले मुख्य रस्ते डांबरी केले. लोकांवर चांगला परिणाम झाला.

**प्रश्न :** ज्यांना काही विधायक कार्य करायचं आहे त्यांनी राजकारणात पडू नाही असं म्हणतात पण सत्तेची म्हणून शक्ती असते. आज समाजकार्यकर्ता म्हणून काही तुम्ही डांबरी रस्ते बांधू शकत नाही पण सत्तेवरचा माणूस राजकारणात इतका गुरफटतो की विधायक कार्याकडे दुर्लक्षच होऊ लागतं हेही खरं. नगरपालिका सोडून

**मी इथे आलो ते राजकीय वस्त्र बाजूला ठेवून. मी कोणाशीही वैर धरले नाही.—श्री. काणे**

तुम्ही जेव्हा तलासरीत आलात तेव्हा त्यामागे असं काही वैफल्य होतं ?

**काणे :** तसं नाही. वैफल्य वगैरे नाही. राजकारणात असतानाच मनाचा एक निर्णय झाला होता की राजकारणाने वनवासी भागाचं चित्र पालटू शकणार नाही. देश राजकारणामुळे बदलणार नाही. त्यासाठी अन्य गोष्टींची गरज आहे. जनसंघाच काम करताना वनवासी भागाशी संबंध आला होता. जव्हार–वाडा या मतदारसंघात आम्ही आठशे, नऊशे, हजार मतांनी पडत होतो. या भागात काम केल तर आमचा आमदार निवडून येईलसं वाटत होतं. म्हणून प्रामुख्यान मी या वनवासी क्षेत्रात आलो. डहाणू आणि नगरहवेली या ठिकाणी विधानसभा आणि खास करून केंद्रशासित नगरहवेलीची जागा जनसंघान लढवायची ठरली निवडणूक जिंकता येणार नाहीच; पण उमेदवार उभे करायचे ठरले.

**प्रश्न :** जनसघाचा प्रचार करायला जेव्हा जात होतात तेव्हा इथल्या आदिवासी म्हणजेच सघपरिवाराच्या शब्दात वनवासींची गोदावरीबाई परूळेकरांवरची निष्ठा तुम्हाला जाणवली असणार., कम्युनिस्टांच्या म्हणजे गोदावरीबाईंच्या विरुद्ध प्रचार हा तुमच्या कार्यवाहीचा भाग असणार–

**काणे :** हो. बरोबर आहे.

## शिक्षणाबद्दल नफरत

**प्रश्न :** हा गोदावरीबाईंच्याविरुद्ध प्रचार तुम्ही कसा करीत होतात ?

**काणे :** आमचा प्रामुख्याने किंबहुना माझा स्वत चा पिंड कोणाला तरी विरोध करून उभ रहाण्यापेक्षा स्वतःच काही हाती घेऊन उभं रहाण्याचा आहे.

**प्रश्न :** मग कोणतं कार्य तुमच्यासाठी करू असं तुम्ही आदिवासींना सागत होतात ?

**काणे :** लोकसभेच्या जागा लढवताना मनात सुप्त हेतू होता या निमित्तान आपण या लोकांपर्यंत पोहोचायच. तोपर्यंत आम्ही या लोकापर्यंत गेलोच नव्हतो निवडणूक हा लोकापर्यंत पोहोचण्याचा मार्ग म्हणून आम्ही वापरला.

**प्रश्न :** जेव्हा तुम्ही प्रचारासाठी सभेत बोलणार, लोकाच्या घरी जाणार तेव्हा त्याना काय सागत होतात ?

**काणे :** डोक्यात विचार होता जव्हार विधानसभेची जागा मिळवायची आहे. या व्यतिरिक्त कुठे काही मिळणार नाही. पण माणसं भेटतील. ती जोडण्याचा उद्योग तेवढा करायचा.

**प्रश्न :** हे सगळे तुमचे हेतू होते. पण शेवटी प्रचाराचं बोलण्यासाठी भाषा वापरावी लागते की आम्ही तुम्हाला हे देऊ ते देऊ, ते तुम्ही काय सागत होतात ?

**काणे :** प्रामुख्यान जनसंघाचं जे धोरण होतं– 'राष्ट्रीयता' ते सांगत होतो. सरकारची ध्येयधोरणं बरोबर नाहीत असं सांगत होतो.

**प्रश्न :** राष्ट्रीयता या लोकाना समजण्यासारखी नव्हतीच. मग ?

**काणे :** या भागात रेल्वे, वीज, धरणं आली पाहिजेत असं सांगत होतो. आमची तरी जास्त काय सागण्याची ताकद होती ? जनसंघ तेव्हा इतका प्रगल्भ नव्हताच. आम्ही तसे शिकतच होतो.

**प्रश्न :** जनसंघ आणि नगरपालिका यांचं काम करताना परिवर्तनाच्या दृष्टीन राजकारणाव्यतिरिक्त काही तरी केलं पाहिजे असं तुम्हाला वाटलं असं तुम्ही सांगितलत. म्हणून नगराध्यक्षपद संपल्यावर तुम्ही एकदम तलासरीत दाखल झालात आणि विश्व हिंदू परिषदेच्या केंद्राची स्थापना केलीत ?

**काणे :** इतक तडकाफडकी काही झालं नाही सगळं. राजकारणाव्यतिरिक्त काय करायचं या दृष्टीनं १९६६ पासून मी चर्चा सुरू केली होती. माझे सहकारी जनसघाचे कोषाध्यक्ष वसंतराव पटवर्धन, विभाग प्रचारक दामूअण्णा टोकेकर, कल्याणचे माजी नगराध्यक्ष भगवानराव जोशी या सगळ्याशी चर्चा केली .. १९६६ मध्ये हिंदु सेवा संघाची स्थापना केली. भगवानराव जोशी अध्यक्ष. मी सेक्रेटरी. लोकाकडून पैसे गोळा करून थेरोंड्याला ५५ एकर जागा घेतली. या जागेतून उत्पन्न काढायच, नंतर शैक्षणिक कार्य, वसतिगृह. आश्रमशाळा असे उपक्रम डोळ्यासमोर होते. त्यावेळी तलासरीत बाबा कुलकर्णी म्हणून एक गृहस्थ काम करायचे जे. जे. हॉस्पिटलमधून हेडक्लार्क म्हणून ते सेवानिवृत्त झालेले होते. त्यांची मुलं व्यवस्थित मार्गाला लागलेली होती. त्यांची एक आतरिक इच्छा– हिंदूसाठी काम करायचं. तलासरीत ख्रिश्चनांचं प्राबल्य होतं. ते तलासरीला हिंदू करून घ्यायचे नंतर पंधरा दिवस मुबईला जायचे; पैसे गोळा करायचे आणि परत तलासरीत यायचे. अस त्याचं चार–पाच वर्षं चाललं होतं. १९६६ मध्ये विश्व हिंदू परिषदेची स्थापना झाली. विश्व हिंदू परिषदेचे दादासाहेब आपटे आणि हिंदू सेवा सघाचे दामूअण्णा टोकेकर याचे घनिष्ट सबध होते. हिंदू सेवा सघाला मदत करण्याची विनती दामूअण्णानी दादासाहेब आपटे याना केली. नंतर मोरोपत पिंगळे, दादासाहेब आपटे दामूअण्णा टोकेकर, नाना पालकर असे आम्ही सगळे श्री बाबा कुलकर्णींच्या भेटीला गेलो. एकीकडे निवडणुकीची धामधूम चाललीच होती. माझा नगर हवेलीला जाण्याचा रस्ता तलासरीवरून असल्यामुळे माझी आणि बाबा कुलकर्णींची तशी नेहमीच भेट व्हायची. आम्ही सगळे बाबा कुलकर्णींना भेटून सागितल, तुम्हाला सहाय्य होईल असं काम आम्ही थेरोंड्याला करणार आहोत. बाबा कुलकर्णी अस्वस्थ झाले, ते म्हणाले, 'मी आता म्हातारा झालो आहे. कधी जाईन भरवसा नाही. मी जी कुटुब हिंदू केली त्याना आधार काय ? तुम्हाला जे काही करायच ते तलासरीत करा.' बाबासाहेब म्हणाले, 'तलासरीत काम करायला आमच्याजवळ माणूस नाही. थेरोंड्याला माधव करणार आहे. येथेही आम्ही नंतर काम करूच' बाबा कुलकर्णी म्हणाले, 'याला माधवलाच इथे काम करू दे हाच इथे काम करू शकतो.' त्यानी मानलं. बाबांना आश्वासन दिलं. १६ एप्रिल १९६७ या दिवशी बाबांच्या हस्ते विश्व हिंदू परिषदेच्या केंद्राची तलासरीत स्थापना झाली मी या केंद्रावर आलो. राजकारण, राजकीय पक्षाचं काम सोडून आलो आज ज्या ठिकाणी गट विकास अधिकाऱ्यांचं ऑफिस आहे तेथे एक जागा भाड्याने घेऊन मी रहात होतो. सुरुवातीला बाबा कुलकर्णींच्या बरोबर थोडा फिरलो. त्याच्या काही कार्यकर्त्यांशी ओळखी झाल्या. एके दिवशी बाबा कामासाठी मुबईला गेले. तेथेच त्याना हृदयविकाराचा झटका आला. रस्त्यातच कोसळले. ३१ मे १९६७, बाबा वारले. जाताना त्यांना

एक समाधान होतं की त्यांचं कार्य कोणीतरी हातात घेऊन पुढे सुरू ठेवणार होतं. एप्रिल, मे, जून लोकाना भेटण्याखेरीज मी काही केलं नाही. आचार्य भिसे यांना भेटलो. म्हटलं, मला वसतिगृह सुरू करायचं आहे. मार्गदर्शन करा. पण त्यानी तशी संधी दिली नाही. त्याच्या शाळेतल्या शिक्षकाशी माझा परिचय झाला. वसतिगृहाचा निर्णय मी पक्का केला. माझ्या वसतिगृहात मुल येऊ नाहीत म्हणून गावात प्रयत्न सुरू असायचे. या भागात शिक्षणाबद्दल मुळातच नफरत. मी विद्यार्थी शोधत होतो. इकडच्या मार्क्सिस्ट पुढाऱ्यानी जनतेची एक समजूत करून दिलेली की, शिकून तुम्ही काय करणार? कुठे तरी शिपाई, चपरासी होणार. येथे ताडी पिण्याचं प्रमाण भयकर. हा शिकलेला शिपाई नोकरी करणार. शेती करणार नाही. घरात पगाराचे पैसे देणार नाही. ते दारूत उडवणार. घरी पिकलेल भात मात्र तो दादागिरी करून नेणार. त्यामुळ शिक्षित माणूस हा उपयोगाचा नाही, अशी वनवासीची धारणा. शिक्षणाबद्दल नफरत त्यांच्या मनात होती. अजून आहे. ती घालविण्याकरता पूर्वी कोणी प्रयत्न केले नव्हते. फक्त आचार्य भिशाजवळ तो दृष्टिकोन होता. म्हणून त्यांनी शाळा सुरू केली.

## राजकीय वस्त्र बाजूला

**प्रश्न :** कम्युनिस्टाचं एवढं काम होत, त्यांनी शाळा नाही उघडली?

**काणे :** नाही. त्याचं वसतिगृह आता दोन–तीन वर्षांपूर्वी सुरू झालेल आहे.

**प्रश्न :** इथे पहिली शाळा कोणी सुरू केली? जिल्हा परिषदेनं कधी शाळा सुरू केली?

**काणे :** आचार्य भिसे यांनी हायस्कूल सुरू केलं. जिल्हा परिषदेनं खूप पूर्वीपासून शाळा सुरू केल्या होत्या. पण त्या शाळेत शिक्षक असेल तर असेल. नाही तर नाही. याच भागातला शिक्षक असला तर ताडीच्या नशेत असायचा. व्यवस्थित शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या मिशनऱ्यानी. २६ एकर जागा घेऊन 'ज्ञानमाता-सदन' हे वसतिगृह ख्रिस्ती मिशनऱ्यानी सुरू केलं हायस्कूल कोणी सुरू करायचं याबद्दल गोखले एज्युकेशन सोसायटी आणि ख्रिस्ती मिशनरी याच्यात झगडा झाला. आचार्य भिशाचं सरकारमध्ये वजन होत. म्हणून मिशनऱ्याना हायस्कूल उघडता आलं नाही आणि गोखले एज्युकेशन सोसायटीचं ठक्कर बाप्पा हायस्कूल तलासरीत चालू झाल.

**प्रश्न :** तुमच्या वसतिगृहाची सुरुवात कशी झाली?

**काणे :** सागत होतोना तुम्हाला! माझ्या वसतिगृहात मुले येऊ नयेत असे उद्योग गावात चालू होते! त्यासाठी शिकून करायचय काय हे लोकाना सांगितलं जायचं. मी कॉंग्रेसचे, सी. पी. एम्. चे काही पुढारी गाठले. त्याना म्हटलं, 'आज तुम्ही आमचे पुढारी आहात. उद्या आमचा पुढारी कोण? तुमचा मुलगाच असला पाहिजे. त्याला वसतिगृहात पाठवा. शिकलेला पुढारी चागलाना? सरपच, पचायत समितीच्या लोकांची निवडक मुल सुरुवातीला गाठली. नंतर लोकाना म्हटलं, 'पहा, हे पुढारी स्वत च्या मुलाना शिकवतात. तुम्ही पण विचार करा' हळूहळू विद्यार्थी मिळाले.

**प्रश्न :** म्हणजे विरोधकांची मुलं घेण्यापासून तुमची सुरुवात झाली म्हणा–

**काणे :** अस म्हणू नका. ज्या दिवशी राजकारण सोडलं त्या दिवशी राजकारणाचा विचारही सोडला. विरोध कोणाचा होऊ नये असं शक्य तितकं वागायचं हेही मनात पक्कं होतं.

**प्रश्न :** कम्युनिस्ट आणि ख्रिस्ती मिशनरी, कम्युनिस्ट आणि विश्व हिंदू परिषदेचं तुमचं केंद्र याच्यात सतत झगडे होते? कारण कम्युनिस्ट कोणत्याही धर्माच्या विरुद्ध.

**काणे :** या ठिकाणी तलासरीत कम्युनिस्टाचा ख्रिश्चनाना जेवढा विरोध आहे, तेवढा हिंदुना नाही. कारण राजकीय माणूस एकदा ख्रिश्चन झाला की, तो कम्युनिस्ट रहात नाही, अशी त्याची कल्पना आहे. म्हणून माणूस ख्रिश्चन होण त्यांना चालत नसे.

**प्रश्न :** माणूस हिंदुत्वाकडे खेचला गेला तर कम्युनिस्ट राहू शकतो याचा विश्वास त्याना होता?

**काण :** हो. हिंदु सगळा कम्युनिस्ट ही त्यांची भावना ते बोलत नसत; पण हिंदुकडे त्यांचा ओढा, आपुलकी दिसायची. स्वतःच्या स्वार्थाकरिता असेल, पण माणूस ख्रिश्चन होणं कम्युनिस्टांना चालत नसे. त्यामुळे त्याचा आम्हाला कडवा विरोध नव्हता.

**प्रश्न :** सुरुवातीला तुम्ही आलात तेव्हा तलासरीत शिक्षित माणसे कितपत होती? त्याचे तुमचे संबंध कसे होते?

**काणे :** एक पोस्ट होत. एक सहकारी बँक होती. मामलेदार कचेरी होती. पोलीसचौकी, शाळा, सीपीएम्च ऑफिस, गट विकास अधिकाऱ्याच ऑफिस एवढया ठिकाणी तशी शिक्षित माणसं होती. नार्वेकर सीपीएम् चे कार्यकर्ते होते. नार्वेकराचे माझे संबंध जिव्हाळ्याचे होते किती जिव्हाळ्याचे? त्यांच्याकडे मिटिंगला, जेवायला माणसं यायची असली तर आमच्याकडून पातेली, भाडी घेऊन जायचे. त्यावेळी तलासरीत मोठी भाडीकुडी अशी आमच्याकडेच होती. आमच्याकडे आठदहा विद्यार्थी रहात होते; पण पंचवीस माणसाच्या स्वयंपाकाला पुरतील अशी भाडी होती गरज पडली की ते सगळ घेऊन जायचे. आम्हालाही कधीकधी बोलवायचे.

**प्रश्न :** तुमच्या पार्श्वभूमीची सीपीएम् ला कल्पना होती?

**काणे :** मी इथे आलो ते राजकीय वस्त्र बाजूला ठेवून. मी कुणाशीही वैर धरलं नाही.

## सरकारकडून जागा

**प्रश्न :** तुम्ही धरल नसेल वैर; पण ते मनातून सावध नव्हते? एखाद्या मारवाडी, गुजराथी माणसान नफ्यासाठी हॉस्टेल चालू केलं आणि सीपीएम् न त्याची दखल घेतली नाही तर मी समजू शकते. पण जनसघाचे काम करण्यासाठी भोवतालच्याच जव्हार, नगरहवेली भागात फिरलेले तुम्ही तुमच्यावर त्यानी विश्वासठेवला? अप्रत्यक्षपणे झगडे केले नाहीत? तुम्हाला उखडण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत?

**काणे :** तितके नाही. कारण विश्व हिंदु परिषद हो नॉन पॉलिटिकल बॉडी. त्याचा मी प्रतिनिधी. मग ते कशाला त्रास देतील?

**प्रश्न :** विश्व हिंदु परिषदेला शुद्ध नॉन पॉलिटिकल बॉडी समजण्याइतकी कम्युनिस्ट मडळी भाबडी होती?

**काणे :** मुख्य म्हणजे त्याचा एवढा दबदबा होता की, आमचा



**जर या भागात काही चांगलं करायचं असेल तर पुढच्याच पिढीचा विचार करायला पाहिजे—काणे**

विचार करण्याची, आमच्याशी झगडण्याची त्यांना गरजच नव्हती. अगदी मच्छर होतो आम्ही त्यांच्यापुढं.

**प्रश्न** : इतिहास पाहिला तर ध्येयवाद्यांनी शाळा सुरू करण्यापासून कार्याला सुरुवात केलेली दिसते. टिळक-आगरकरानी शाळा सुरू केली. ज्योतिबा फुल्यांनी मुलींसाठी शाळा काढली. तुम्ही तलासरीत वसतिगृहापासून कशी सुरुवात केली? ज्याअर्थी वसतिगृह एवढं विस्तारलं, त्याअर्थी वसतिगृह ही तलासरीची गरज असणारच. पण ही गरज तुम्ही कशी हेरली ?

**काणे** : माझा पिंड तसा राजकारणीच. मी विचार केला जर या भागात पुढं काही चांगलं करायचं असेल, तर पुढच्याच पिढीचा विचार केला पाहिजे. पुढची पिढी विचार करणारी हवी. येथे शाळा होती; पण शिक्षण वाढविण्यासाठी काय हवं? मुलांच्या जेवणाचा प्रश्न सुटायला हवा. म्हणजे ते शिकतील. त्यासाठी वसतिगृहाची सुरुवात केली. या वनवासी माणसाची वैशिष्टयं लक्षात घ्यायला हवीत. हा माणूस प्रामाणिक, कष्टाळू. इकडे उपासमार खूपच. चार-चार दिवस पोट बांधून तो रहातो; पण भीक मागत नाही. सहसा चोरी करीत नाही. फार उपास पडला तर कुठे घरात घुसून एखादे-वेळी कणी आणेल; पण इतर भांड्याला, जास्त धान्याला हा हात लावणार नाही. मला वाटलं, त्याच्या पोटाचा प्रश्न सोडवल्यावर, त्याच्या अंगच्या गुणांनीच तो मोठा होणार आहे. कष्ट उपसण्याची त्याची नेहमीच तयारी असते. वसतिगृहात मुलं जवळ राहिली की, शिक्षणाचं वातावरण आपण निर्माण करू शकतो. स्वच्छता आणि इतर अनेक व्यवहारोपयोगी गोष्टी शिकवता येतात. म्हणून आमचं वसतिगृह सुरू झालं. रहाणाऱ्या विद्यार्थ्यांना आम्ही जेवण, शाळेच्या गणवेषाच्या कपड्याची जोडी, वह्या-पुस्तके देतो. हे दिल्यावर ही मुलं शिकतात असं दिसत. शिक्षणाचा संस्कारच त्यांच्या घरात नसल्यामुळे त्यांची गती तशी मंद असते; पण शिकतात. सुरुवातीला आई-वडिलांचा शिक्षणाला विरोध असायचा. कारण शाळेत जाणारा मुलगा कमाई करणार नाही; पण जसजसे विद्यार्थी शिकून या भागातच इतरांपेक्षा जास्त काही करून दाखवू लागले, तसतसे आई-वडिल मुलाच्या शिक्षणाला तयार होऊ लागले. आता कितीतरी मुलांना मला प्रवेश नाकारावा लागतो, इतकी गर्दी होते.

**प्रश्न** : सुरुवातीच्या लहान जागेतून तुम्ही या मोठ्या जागेवर केव्हा आणि कसे आलात ? आज एवढी मोठी इमारत, थोडी शेती, गोशाळा हे उभं रहाताना काय काय घडलं? पैसा कसा जमा झाला? झगडे कोठे करावे लागले ?

**काणे** : १९७२–७३ मध्ये आम्ही येथे आलो. ही एकंदर पावणे दहा एकर जागा 'वेस्ट फॉरेस्ट लॅंड' सरकारने आम्हाला देणगी म्हणून मालकी हक्काने दिली. नंतर मुंबईत काही कार्यक्रम करून आम्ही फंड जमविला. देणग्या गोळा केल्या. इमारती बांधल्या. ही जागा स्मशानाची होती. सगळीकडे करवंदाच्या जाळी पसरल्या होत्या; पण आम्हाला ही जागा मिळते आहे म्हटल्यावर, मिळाल्यावर मिशनऱ्यांचा आणि सीपीएम् चा त्रास सुरू झाला.

**प्रश्न** : सीपीएम् ला सरकारनं अशी एखादी जागा दिली होती ?

**काणे** : नाही. त्यांना गरज नव्हती. त्यांनी सरकारकडे कधी मागितलीही नव्हती.

मंत्रिमंडळाचा ठराव होऊन अशा प्रकारची जागा मिळते. भाऊसाहेब वर्तक तेव्हा मंत्री होते. सुरुवातीला मी आलो तेव्हा ठक्कर बाप्पा हायस्कूलच्या (गोखले एज्युकेशन सोसायटी) अध्यक्ष म्हणून ते आले होते. मी नगराध्यक्ष असताना ते जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. कलेक्टरच्या मिटिंगना आमच्या भेटी व्हायच्या. बरोबर फिरतही होतो. उद्घाटनाच्या वेळी मी आपला मागे बसलो होतो. मला पाहिल्याबरोबर उठून पुढे ये असं ते म्हणाले. मी सांगितलं, नंतर तुम्हाला भेटतो. नंतर त्यांनी विचारलं, 'इकडे कसा ?' मी सांगितलं, 'राजकारण सोडून असा असा आलो आहे. वसतिगृह सुरू केलं आहे. तुम्ही जिल्हा परिषदेचे अध्यक्ष. मान्यता द्या.' त्यांना विश्वास वाटला नाही. ते म्हणाले, 'काहीतरी गडबड आहे, राजकारण आहे.' त्यांनी तपास केला. वर्षभराने मला म्हणाले, 'मला पटलं, तुम्ही राजकारण पूर्णपणे सोडलं आहे. या भागात तुम्हाला मानतात. जिल्हा परिषदेची तुम्हाला मान्यता देण्याचं माझ्या मनात आलं आहे; पण ते अजून जमलेलं नाही. एक लक्षात ठेवा, मी इथून जेव्हा खुर्ची खाली केली असेल, त्या दिवशी तुम्हाला मान्यता मिळालेली असेल !

त्यांनी त्यांचे शब्द खरे केले. आजही कुठे गेले तर माधव माझा मित्र म्हणून ते सांगतात. पक्ष म्हणून आम्हाला सहाय्य करणं त्यांना फार अडचणीचं होतं. गोखले एज्युकेशन सोसायटीचा आम्हाला विरोध तिथे ते स्वत: अध्यक्ष. सी. पी. एम्. मिशनरी, गोखले सोसायटी सगळे मिळून त्यांना सांगायला गेले की, आम्हाला जागा देणे बरोबर नाही. मिशनऱ्यांची आमच्याबद्दलची मुख्य तक्रार. हे जातीय आहेत. इथे बसून जातीयतेचा प्रचार करतील. भाऊसाहेब वसतिगृह पाहून गेले होते. ते सगळ्यांना म्हणाले, 'चांगलं काम चालल आहे. का त्यांना विरोध करता ?' तुम्हाला पाहिजे तर तुम्ही जागा मागा. त्यांना विरोध करण्यात काय अर्थ ? गोखले एज्युकेशन सोसायटीला त्यांनी जागा दिली होती. तिचा काही फार चांगला उपयोग करणे सोसायटीला जमले नव्हते.

जागा मिळाल्याची प्रत सचिवालयात टंकित होत होती. एक माणूस इथे पेढे घेऊन आला. मुलांना दिले. मुलं फिरायला

चालली. वाटेत हेडमास्तरानी मुलांना बोलावलं मुलानी त्याना सांगितल, आम्हाला जागा मिळाली. लगेच पाटील मास्तर मला विचारायला आले. 'जागा मिळाली ?' मी म्हटलं, 'छे, आता कुठं अर्ज केला आहे. बघू काय होत !' जागा मिळू नये म्हणून त्यानी गडबड सुरू केली. तेवढ्यात जागा मिळाल्याची ऑर्डर माझ्या हातात आली. म्हणजे लोकाना थोड चकवाव लागत. मी राजकारणात अनुभवी होतो. मला यांची सवय होती. कोणताही कार्यकर्ता हे करेल असं नाही आलेला टोला कधी आपल्या रिंगणात ठेवायचा नाही. समाधानानं दुसऱ्या माणसाला घालवायचं कोणी म्हटल तुम्ही बोटचेपेपणा केला, माघार घेतली, हरकत नाही. अरे आमच्याजवळ ताकद नव्हतीच ती कमवायची होती. सुरवातीलाच संघर्ष स्वीकारला असता तर आम्ही संपलो असतो.

नतर ऑगस्टमध्ये सरकारी अधिकारी आले मला जूनमध्ये जागा मिळाली होती. पावसाळ्यात मी काय करू शकणार होतो ? ते म्हणाले, 'जागा काढून घ्यावी लागणार तुम्ही काहीही केल नाही.' मी म्हणालो, 'घ्या. राजानी दिली राजानं घेतली. काय करणार ?' पण सरकारी अधिकारी चांगले त्यानी माझ्याविरुद्ध तक्रार करणाऱ्यांना बोलावून घेतल त्याना म्हणाले, 'या भागात नवीन आलो. ओळखी करून घेण्यासाठी बोलावलं. मग मला म्हणाले, 'जागेची कागदपत्र द्या मी कागदपत्रे दिली, त्यानी सगळ्याना सांगितलं, 'हे बघा माझा आधीचा रिपोर्ट आहे की जागा साफ केली आहे. विहीर खणली आहे झोपडी बांधली आहे. तेव्हा आता ही जागा परत घ्यायची म्हटली तर आम्हाला याना नुकसानभरपाई द्यावी लागणार. माझा साहेब वरून आला आणि इथं झोपडी बांधलेली जागा साफ झालेली त्यानं पाहिली तर मला घरी बसाव लागेल. या जागेचा विचार तुम्ही करू नका. दिली ती दिली.' अशा प्रकारचं सहाय्य सरकारी अधिकाऱ्यानी दिलं. सीपीएम् विरोध करीत होते. एकदा आगपेट्यानी गाडी भरलेली होती. कुठे तरी डॅश झाली, पडली आणि जळली. सी. पी. एम् चा कार्यकर्ता येत होता. मला म्हणाला, 'पाहिलस ? ती गाडी कशी जळली ? अशीच तुझी झोपडी जाळायची आहे,' मी म्हटलं, 'बर. ठीक आहे.' जागेचं भूमीपूजन केलं तेव्हा मी सगळ्यांना बोलावल होत– स्थानिक पुढाऱ्यांना बोलावलं. करवंदाच्या जाळीचा ढीग एके ठिकाणी केलेला होता. त्या कार्यकर्त्यानं येऊन एक दिवस काडी त्या ढिगाला लावली. मी म्हणालो, 'बरं झालं माझी काडी वाचली' म्हणजे विरोध झाला खूप. पण मी संघर्ष टाळीत आलो. खरं म्हणजे हे कंपाऊंड दिसत आहे त्यापलिकडे दहा फूट जागा आमची आहे. पण सी. पी. एम्.च्या पुढाऱ्यांनी कुरापत काढली. मी माझ्या पद्धतीप्रमाणं त्याना बोलावून घेतलं. आणि विचारल, सरकारनं आम्हाला अशि अशी जागा दिली आहे. आता कंपाऊंड घालायच काय करावं ? ते सांगायला लागले, 'ही अमक्याची जमीन. ती तमक्याची. त्या ठिकाणी आमची.' मी त्यांना विचारलं– 'मग माझी जागा कोणती ? दाखवा.' ते दाखवत गेले. मी मान्य केलं. त्यामुळे आमची दहा चौरस फुटाची पट्टी गेली. मी विचार केला, सरकारने पावणे दहा एकर जागा दिली आहे. ती साडेनऊच दिली असं समजू. आम्हाला त्यांच्याशी संघर्ष करायचा नाही. त्यासाठी आम्ही इथ आलो नाही. त्याचं काही बरं करायचं तर करू. त्यांच्याशी भांडायचं नाही. इस्टेट करायची नाही.

## संघर्षाचे प्रसंग

**प्रश्न** : ते लोक किंवा तुमच्याही भोवतालचे लोक या वागण्याला घाबरटपणा म्हणू शकतात–

**काणे** : हो. म्हणतातच. दोघही म्हणतात. पण कोणी काहीही म्हणालं तरी मी माझ धोरण बदलत नाही. पुन्हा कंपाऊंड घालायच्या वेळी मी त्याना बोलावल. नाही तर रेघ मारल्याप्रमाणे कंपाऊंड घातलं नाही म्हणून त्यानी पुन्हा खुसपट काढल असतं. माझ्याजवळ काम करायला मजूर वगैरे नव्हतेच मी त्यानाच सांगितलं, 'धरटी दोन माणसं पाठवा.' त्यांच्याचकडून त्याना हवा तसा बांध घालून घेतला. दुसर असं, दुसऱ्या बाजूला सरकारचीच पधरा फूट जागा होती. म्हटलच तर आम्ही ती घेऊ शकत होतो. कोण मापून विचारायला येईल तेव्हा पाहिल असतं.

**प्रश्न** : आता दहा फूट जागा तुम्ही सोडलीत. पन्नास फूट–शभर फूट असती तर ?

**काणे** : मुख्य काय आहे, जसं आपलं धोरण तसं दुसऱ्याचं. आपण सौम्य असू तर दुसरा सौम्य होतो. असा दुसरा एक प्रसग सागतो. एके दिवशी पन्नास वनवासी आले. सकाळी सगळे येऊन बसले मी त्यांना चहा दिला आणि विचारल, 'काय गडबड आहे ?' ते म्हणाले आम्ही या टेकडीवर प्रेत जाळत होतो. आता जाळण्याचं काय करायच ? मी विचारल, 'कोण गेल ?' तर म्हणाले, 'अहो केव्हा तरी कोणी तरी मरणारच की !' मी त्याना सांगितल, 'अहो, केव्हा तरी मी पण जाणारच आहे. आपण सरकारकडे मागणी करू. सरकारने मला ही जागा दिली. सरकार तुमची दुसऱ्या जागेची व्यवस्था करीलच की !' ताबडतोब मी अर्ज लिहिला, त्यांचं समाधान झालं,

**प्रश्न** : पण ते लोक खरोखरच त्यांच्यापुढे हा प्रश्न पडला म्हणून आले होते की त्याना कोणी उद्युक्त केलं होत ?

**काणे** : उद्युक्त केलेल होत. म्हटले तर सगळे संबंध चागले. पण एकीकडे कागाळ्या, कुरघोड्या चालूच. आमच्या जागेत गुरं चारायची लोकाना सवय होती. आमचं एक तुळशीचं रोपसुद्धा त्यामुळं जगायचं नाही. मी मुलाना म्हटल, 'अरे आता लोकांना हळूहळू सांगायला पाहिजे, ही आमची जागा आहे. इथं गुरं चारू नका.' एक दिवस खाटिकाचा मुलगा शेळ्या चारत होता. आमच्या सतरा–अठरा मुलांची लांबलचक रांग पाऊल वाटेनं येत होती. प्रत्येक मुलानं त्याला टोकला. खाटकाचा मुलगा चिडला. त्यानं शेवटच्या मुलाचा गळा पकडला. तर आमच्या मुलांनी त्याला जोरदार मारलं. मोठी खोक पडली खाटकाचा पोरगा घरी पळाला. आमच्या पोरांनी येऊन काय झालं ते मला सांगितलं. 'ठीक आहे.' असं मी मुलांना म्हणालो. पण खाटकाचा पोर ! मुसलमान ! मी तडक उठलो. पोलीस चौकी गाठली. कॉन्स्टेबल हजर होता. त्याला काय घडलं ते सांगितलं... तो म्हणाला, 'ठीक आहे. उद्या त्या मुलाला समजावतो' मी निघतच होतो. तेवढ्यात इन्स्पेक्टर आले. मग पुन्हा गप्पा मारत बसलो. चहा वगैरे घेतला. निघालो. एवढ्यात पाच पंचवीस मुसलमान आले. खाटीक इन्स्पेक्टरला सांगायला लागला 'साहेब तो काणेसाहेब दारू पित होता. त्याला कमी पडली म्हणून पोरांना घेऊन पुन्हा वडोलीला चालला होता. माझं पोर रस्त्यात दिसलं त्याला त्या लोकांनी मारलं' इन्स्पेक्टर म्हणाले,

'काय झालं पुन्हा एकदा साग.' त्यानं पुन्हा तेच सगळ सागितलं. इन्स्पेक्टर उठले. त्यानी आवाज दिला, 'ते दारू प्यायले का तू प्यायला आहेस ? ते इथं तुझ्यासमोर बसले आहेत. हे पण तुझ्या लक्षात नाही आलेल !' मी त्याला म्हणालो, 'केवढी मोठी खोक पडली आहे ! तो पोर मरेल.त्याला आधी डॉक्टरकडे घेऊन जा बाबा' खाटीक गेला. त्या वेळी इथे एक सिंधी डॉक्टर होते पोराच्या डोक्याला नऊ टाके पडले. जखम गंभीरच होती. मार जोरात बसलेला होता. त्या डॉक्टरनं खाटकाकडून तीनशे–चारशे रुपये काढले आणि त्याला जोरदार सर्टिफिकेट दिलं. प्रकरण गभीर झाल. मुलगा जगला. तरी खुनाचा प्रयत्न अशी केस होऊ शकत होती. काही वेळा कशा असतात पहा. आदल्याच दिवशी हा खाटीक माझ्याकडे येऊन एका सी पी एम् च्या पुढाऱ्याच्या तक्रारी सागत होता. 'ते ✕✕ साहेब बघा मला दम देऊन माझ्याकडून खूप मटण नेतात आणि माझ्या हातावर उगीच चार–पाच रुपये टिकवतात.' मी त्याला म्हणालो होतो, 'थांब, दोन चार दिवस त्यानी असंच केलं तर बघू' दुसऱ्या दिवशी तो माझ्याविरुद्ध असा उभा राहिला. डॉक्टरच्या अशा सर्टिफिकेटनंतर पोलीस इन्स्पेक्टर माझ्याकडे आले. म्हणाले, 'तुमचा मुलगा मला अटक करायला लागणार. कोणी मारला ते सागा. कठीण प्रसग ओढवला. मी म्हणालो, 'मला अटक करा.' इन्स्पेक्टर म्हणाले, 'तुम्हाला अटक करता यायची नाही. मुलगाच लागेल.' मुलगा अटक झाला की वसतिगृहाला लोकांच्या मनात मिळविलेल्या मान्यतेवर बोळा फिरणार. शेवटी इन्स्पेक्टर म्हणाले, 'कोणातरी मुलाचं नाव सांगा.' एका माजी विद्यार्थ्याचं नाव सांगितलं, इन्स्पेक्टरनं त्याला कागदोपत्री अटक करून जामिनावर सोडलं असं दाखविलं आणि म्हणाले, 'या मुलाला काही दिवस तुमच्याकडे ठेवून घ्या. मग काय करायचे ते बघू.' हे सगळं होत आहे तोपर्यंत सी. पी. एम. ची जोरदार सभा झाली. त्या सभेत काणे कसे जातीय आहेत, त्यानी भिवंडीत दंगल केली. अहमदाबादमध्ये आपले कार्यकर्ते मारले, आता आपल्या गावातल्या खाटकाशी भाडण काढल, त्याच्या पोराला मारलं इ. भाषणे झाली. पोलीस इन्स्पेक्टरची पंचाईत झाली. जाहीर सभेमध्ये माझं नाव असं आलं. इन्स्पेक्टर कांग्रेसवाल्याकडे गेले. ते माझ्या विरुद्धच. इन्स्पेक्टरांनी मला बोलावलं ,ते म्हणाले, 'काय हो काय करायचं ? मी हे समजू शकतो तुम्ही धर्माचं काम करता म्हणून मिशनऱ्यांचा तुम्हाला विरोध. पण सी. पी. एम. तुम्हाला शिव्या देतं. कांग्रेस शिव्या देतं. याचं कारण तरी काय ?' मी त्यांना म्हटल, 'लोकाना पटत नाही की एखाद्या माणसानं राजकारण सोडलं म्हणजे सोडलं. त्याना वाटतं तो सदा सर्वकाळ त्या शेणातच रहाणार. तुम्ही माझं राजकारण पाहिलं आहे का ? मी इथे धर्मकारण करतो. राजकारण करीत होतो तेव्हा ते ज्या पद्धतीनं केल पाहिजे तसं करीत होतो. आता सोडलं.' पोलीस इन्स्पेक्टर म्हणाले, 'हे सगळं खरं आहे. मला पटत आहे. पण आता या केसमध्ये काय करायचं ? मला तर ही केस भरली पाहिजे.' मी म्हणालो, 'आता भरा. मी तरी काय करणार?' इन्स्पेक्टर म्हणाले, 'माझ्याकडून जे करायचं ते सगळं मी बरोबर करतो. पण शेवटी ही केस जज्कडे जाणार. जज्च्या मनावर अवलंबून रहाणार ही केस करायची की नाही ? तितकी ती सिरीयस आहे की नाही ? तुम्ही जर जजना भेटलात तर त्यातून काही निष्पन्न होऊ शकेल. मी माझ्याकडून करायचं ते करतो.' मी डहाणूला ओळखीतल्या एका वकिलाना विचारलं, 'इथं पोलीस प्रॉसीक्यूटर कोण ?' सुदैवाने आमच्या कल्याणचा पोलीस प्रॉसीक्यूटर निघाला. त्यावेळी रेल्वेत नोकरी करीत होता. आमच्याबरोबर कामही करीत होता. पुढे वकील होऊन पोलीस प्रॉसीक्यूटर म्हणून आला होता. त्याला भेटलो. त्यान सागितल, मी जजला आधी जाऊन भेटतो. नतर तू भेट. अकरा वाजता आम्ही कॉर्टात गेलो, जजना भेटलो. जजने ती केस नॉन–कॉग्निजीबल करून काढून टाकली. प्रकरण निभावलं.

काही जणाचं म्हणणं असं की आपण झगडलं पाहिजे. केरळमधे नाही का दहा खून झाले ! मलाही इथं कधीतरी रक्त द्यावं लागेल. नाही असं मी म्हणत नाही. पण आज आमची ती ताकद नाही. आज आमचा एक माणूस गेला तर आमचं फार नुकसान होणार आहे. आम्हाला इथे अजिबात रक्त द्यावं लागल नाही असही नाही. आमचा देवबेंदु हा कार्यकर्ता मारला गेला. मार खाऊन बेशुद्ध झाल्यावर दुसऱ्या दिवशी त्याची बायको त्याला माझ्याकडे घेऊन आली. डहाणूला दवाखान्यात नेला. पण तो गेलाच. कम्युनिस्टानी इथे पूर्वी जो जम बसविला आहे तो दहशतीनं. एखादा तुरुंगात गेलेला खूनी असतो त्याला वकील वगैरे सगळ सहाय्य मिळवून द्यायच. त्याच्या घरी मदत करायची. तो आपल्याकडे घ्यायचा. अस्ते अस्ते तो गावचा पुढारी होती हे एके काळचं होतं. आजचे त्याचे पुढारी गुन्हेगार असं मी म्हणत नाही.

## प्रत्येक वनवासी आमचा !

**प्रश्न :** इथे कम्युनिस्ट मार्क्सवादाची पकड असण्याचं कारण गोदावरी परुळेकरांच्या कार्यात आहे ना ?

**काणे :** होय. गोदावरीबाईंबद्दल मला अनेक कारणांनी अत्यत आदर आहे. त्याच्या कष्टाना, चिकाटीला, धैर्याला तुलना नाही. गोदुताई म्हणायच्या, 'लोकमान्य टिळक त्या काळात आदर्श होते- आज आम्ही कोणाचा आदर्श पुढे करू ? अस कोणी नाहीच.' मला वाटायचं हे गोदुताई म्हणू शकतात. त्याच ठीक आहे. पण माझ्यापुढे कोणी आदर्श नाही असं मला म्हणता येत नाही. आमच्यासमोर गोदुताईंचा आदर्श आहेच. शाकाहार हाच श्रेष्ठ आहार हे त्या अभिमानानं सांगत असत. एका कम्युनिस्ट कार्यकर्त्याचे आणि आदिवासी मुलीचे संबंध आले. ते जरा जास्तच पुढे गेले. गोदुताईंनी त्या कार्यकर्त्याला त्या मुलीशी लग्न करायला लावले. पण गोदुताईंसारखेच बाकीचे कार्यकर्ते होते अस नाही. लोकांच्या दृष्टीनं खुनी असलेली माणस कम्युनिस्टानी जवळ केली. हे पुराव्यानं कधीच सिद्ध होत नसतं. दोघे भाऊ. मोठा शेती पहाणारा. निर्व्यसनी, कांग्रेसच काम करणारा. धाकटा दारूडा, सी. पी. एम्. कार्यकर्ता. पण काय घडलं कोणास ठाऊक. त्या भावाच्या घरात जाऊन त्याचा खून केला. आयविटनेस त्या भावाची बायको. पोलीस खुषीत. इतकी चांगली केस. तो तुरुंगात गेला. बेलवर सुटला. वनवासी लोकामधे कोणीही स्त्री–पुरुष एकटा राहू शकत नाही साठ वर्षांचा म्हातारासुद्धा पंचावन्न वर्षांची बाई शोधून काढेल. हा तुरुगातून आल्यावर एक दिवस

भावाच्या बायकोकडे गेला. राहिला. पुढे तिच्याशी लग्न केलं. ज्या दिवशी केस कोर्टात उभी राहिली त्या दिवशी त्याच्याचपासून झालेलं चार महिन्यांच मूल तिच्या हातात. ती याच्याविरुद्ध साक्ष देणार कशी ? पुराव्याच्या दृष्टीन सगळ संपलं. पण तो खुनी आहे हे लोकांना माहिती आहे लोक त्याला वचकून वागतात. त्यानं आवाज चढवला की सामान्य माणूस घाबरतो. या दादागिरीला उत्तर द्यायची ताकद माझ्याजवळ नाही. ताकद कशी वाढू शकते त्याचंही उदाहरण देतो. जेव्हा याच समाजातली माणसं आमच्या बाजूला येतील तेव्हा ताकद वाढू शकते. चिंतामणराव म्हणून आमचे वकील आहेत. तसा मुखदुर्बळ मुलगा. पण चागला शिकला. त्याला कल्याणच्या चांगल्या मातब्बर वकीलाकडे मी ठेवलं. ते त्याला डिस्ट्रिक्ट कोर्टात घेऊन जायचे. नंतर तो जव्हारला परत आला. आता तो या भागातला वाघ वकील आहे. त्याचे वडील, मोठे भाऊ हे सी पी. एम्. चे कार्यकर्ते. हा भाजपचा कार्यकर्ता. खासदारकीसाठी उभा राहिला होता. विजयी उमेदवाराला एक लाख मतं तेव्हा याला ऐंशी हजार मतं होती. एक दिवस याचा अशिक्षित चुलत भाऊ नशेतच त्याच्याकडे गेला. म्हणाला, 'उद्या आमची मिटिंग तुझ्या घरात होणार आहे–' चिंतामणीने विचारले, 'माझ्या घरात घ्यायच कारण काय ?' चुलत भावाने सांगितले, 'आमची तशी परंपरा आहे.' चिंतामणीने सांगितले 'तेव्हा माझे वडील, मोठा भाऊ, तुमचे कार्यकर्ते होते. माझा तुमचा संबंध नाही. तू मिटिंग तुझ्या घरी घे.' चुलतभाऊ म्हणाला, 'हे आमदारानी सांगितलय ! वकील झाला म्हणून तुला काय जास्त शहाणपणा आला काय ?' चिंतामणीने उत्तर दिले, 'मला अक्कल आली की नाही ते नंतर बघू. उद्या मी बाहेर जाणार होतो ते जाणार नाही.' चुलतभाऊ पढवलेल नशेत बोलला, 'उद्या आमदार तुझ्या घरी मिटिंगला येतील.' चिंतामणीने जबाब दिला, 'आमदारांना म्हणाव तुम्ही दोन्ही पायांनी आत याल पण दोन्ही पायांनी बाहेर जाऊ शकणार नाही.' नतर मिटिंग चिंतामणीच्या घरी झाली नाही. चिंतामणीन केल ते योग्य केलं असं मी म्हटलं. पण माझ्या मनात धास्ती. उद्या काही वेगळघा पद्धतीनं चिंतामणीवर सकट आलं तर मला कळायला सुद्धा तीन दिवस लागतील. आमचा कार्यकर्ता घालविण्याची माझी इच्छा नाही. असे चार वकील झाले तर एखादा कदाचित घालवावा लागेल. पण मारामारीतून काही साधत नाही असंच मला वाटतं. संघर्ष न करण्याच एक मुख्य कारण अस. इथला प्रत्येक वनवासी आमचा आहे. आम्हाला पाहिजे आहे. केव्हातरी तो हिंदू म्हणून आमचाच आहे. आपणच एकमेकाच्या टोकाला जाऊन शिव्या देतो. हा समाजवादी, तो मार्क्सवादी. अंतर वाढतं ते कमी केलं पाहिजे. थोडा कमीपणा पत्करूनही अंतर कमी केलं पाहिजे असं मला वाटतं.

### काही नव्या योजना

**प्रश्न :** चिंतामणीच्या चुलत भावान किंवा आमदारानं माघार का घेतली असावी ? शिक्षणाचं स्वयंसिद्ध तेज किंवा अंतर्मनातली अपराधाची जाणीव हे कारण असेल ?

**काणे :** असंच काही नाही. माघार आमदारानं घेतली असावी. एका मिटिंगसाठी इतका संघर्ष त्यांना नको असेल. आमदारानं सांगितलं असेल उद्या मला वेळ नाही. पुन्हा केव्हातरी मिटिंग घेऊ. आमदारानं विचार केला असेल, हा वकील आहे. स्वत:ची कायद्याची बाजू पक्की करून ठेवील. गावात चिंतामणीचे नातलग होते. सासुरवाडी होती. मेहुणा होता. सगळ्याची मिळून ताकद आमदाराला माहिती असेल. ते जाणून त्यानं माघार घेतली असेल.

**प्रश्न :** तुम्ही बाहेरचे. या समाजातले नाही आणि गावातले नाही. म्हणून तुमची ताकद कमी आमदार आणि चिंतामणी तुल्यबळ. मग एकमेकाना भिडायला काय हरकत ?

**काणे :** तरीसुद्धा माझ्या डोक्यात सतत आहे ज्याच्या भल्यासाठी मी इथं आलो आहे त्याच्याशी संघर्ष करून मी त्याच्यात भलेपणा कसा आणू शकेन ? म्हणून संघर्ष कमी. कामाला वेळ लागेल. गती संथ होईल. तरीसुद्धा संघर्ष नको.

**प्रश्न :** जी संघर्षवादी माणसं आहेत, ती याला पळपुटेपणा म्हणणार. तडजोड आणि पळपुटेपणा यांची सीमरेषा कशी ठरवणार ?

**काणे :** संघर्षवादी सोडा. इतर अनेकाना माझं वागणं पटत नाही. असं पहा या भागात संघाची शाखा लागत नाही यामुळं काही लोकाचा माझ्यावर रोष आहे. संघाची शाखा लागावी हे माझं काम आहे असं मी समजत नाही.

**प्रश्न :** शाखा लावणं हे इतकं महत्त्वाचं आहे ? तसं म्हटलं तर तो एक उपचार वाटतो. ती विचारसरणी तुम्ही कार्यवाहीत आणली की पुरेसं होत नाही ?

**काणे :** शाखा लावण्याचं काम करणाऱ्याना ते महत्त्वाचं वाटतं. त्यांना त्याशिवाय बरं वाटत नाही. त्याचं म्हणणं त्याच्या परीने बरोबर आहे. तितकच मला माझ्या कार्याच्या दृष्टीनं ती न घेणं बरोबर वाटतं. कोणाचा याबद्दल रोष झाला तर मी त्यांची क्षमा मागतो. संघर्ष आत–बाहेर सगळीकडे टाळतो. हा बावळटपणाचा, भिरूतेचा भाग असेलसुद्धा. कम्युनिस्टाच्या शेजारी मी काम करतो आहे. त्याचा भर जितका संघर्ष करण्यावर आहे तितकाच माझा भर संघर्ष टाळण्यावर आहे. कोणी असंही म्हणेल, यांची ताकदच नाही म्हणून हे असलं तत्त्वज्ञान उभं करतात.

**प्रश्न :** तुम्ही असा काही निश्चित कालावधी आखून घेतला आहे का संघर्षाचं इतकं पाऊल टाकायला आपल्याला तितकी वर्षं लागतील ? जी ताकद आहे असं वाटतं ती अजमावून पहायला नको का ?

**काणे :** मी अजून पाच किंवा सात, दहा वर्षांनी संघर्ष करेन असं नाहीच. मी मुलामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करीन. त्यासाठी सहाय्य करीन.

**प्रश्न :** तुमचं ध्येय–जीवन कसं सुरू झालं, कसं सखोल होत गेलं त्याची थोडीफार कल्पना आली. पण हे ध्येयजीवन सुरू असताना व्यक्तिगत जीवन कसे होते ? अनेक ध्येयवादी तरुण पुरुष दोन ठिकाणी माघार घेऊन ध्येयापासून दूर जातात एक म्हणजे तरुण पुरुषाने पैसे मिळवून घराची जबाबदारी स्वीकारावी आणि दुसरं म्हणजे योग्य वेळी विवाह करून संसार मांडावा हे पारंपारिक विचार. तुम्ही यातून कसे निभावलात ?

**काणे :** आम्ही तिघे भाऊ. मी धाकटा. मोठा संसारी. १९४६ मध्ये आई आणि वडील वारले. १९४७ च्या जूनमध्ये वहिनी वारल्या. नतर अमावस्येला काका वारले. ते दिवस कठीण, मानसिक अस्वस्थतेत

गेले. मोठ्या भावाचा आजार फारच बळावला घरातलं वातावरणच उदास होत. तेव्हा काही करावंसं वाटलं नाही. मोठा बरा झाला. त्याच पुन्हा लग्न झालं. हळूहळू घराची घडी पुन्हा बसली. मधला भाऊ अविवाहित. संघाचं काम करीत होता. जगल कॉंट्रॅक्टरचा व्यवसाय करून दोन–तीन वर्षं मी वखार चालवली. पण फायदेशीर धंदा करणं मला मुळीच जमलं नाही. सोडून दिल. धंदा मला जर नीट जमला असता तर कदाचित आयुष्यानं वेगळ वळण घेतलही असतं. आपल्या रिवाजाप्रमाणं माझ्यापेक्षा मोठ्या भावाच लग्न व्हायच असल्यामुळं माझा या दृष्टीन विचार झाला नाही. अर्थात मी लग्न करायचं म्हटल असतं तर झालं असतं. पण तस म्हणावंसं मला कधी वाटलं नाही. लग्न न करण्यामुळे होणारा संघर्ष वगैरे मला जाणवला नाही. बहिणीची लग्नं झाली होती. त्यामुळे आर्थिक जबाबदारी माझ्यावर फारशी नव्हतीच. संघाचं किंवा समाजासाठी कार्य करणं याला आमच्या घरामध्य काही विरोध असा नव्हताच.

**प्रश्न** : या ठिकाणचं दारीद्रच आत्यंतिक आहे हे सगळ्यांच्या बोलण्यात येतं. हे दारिद्रय कमी करण्यासाठी मुलाना तुम्ही काही शिक्षण देता का ?

**काणे** : काही योजना माझ्यापुढे आहेत. आमच्या केंद्राची ही जमीन म्हणजे फॉरेस्ट वेस्ट लॅंड. भातशेती इथे फायदेशीर होऊ शकली नाही. तेव्हा विचार आला या जगल उपजाऊ जमिनीत काही औषधी देणारी, जगली झाडच वाढवणं फायद्याच होईल. म्हणून गेली दोन तीन वर्ष प्रयत्न करतो यावर्षीचा प्रयोग म्हणजे एका गुठ्यात शंभर निलगिरीची झाडं लावायची. ३३ X ३३ चा एक गुठा. दर तीन फुटावर झाड. हे झाड वर्षाला पाचसात फूट वाढतं. पाच वर्षात त्याची वाढ पूर्ण होते. तेव्हा एका गुठ्यातून दोन अडीच हजार रुपये उत्पन्न मिळू शकते.

**प्रश्न** – या झाडांचं उत्पन्न कोणत्या मार्गांनी मिळू शकतं ? तेल ?

**काणे** – आपल्याकडची निलगिरीची झाडं शुष्क. तेलाचा अंश फार कमी. जळाऊ लाकूड म्हणून किंवा कॉंक्रीटच्या इमारतीला ठिय्ये द्यायला या लाकडाचा उपयोग होतो. निलगिरी लागवडीचा उपक्रम 'वेस्ट लॅंडमध्ये' करायचा. साधारण दोन अडीच एकर जमीन असेल तर पाच गुठे निलगिरीसाठी. म्हणजे दरवर्षी एका गुठ्यामागे दोन–अडीच हजार रुपयाचे निश्चित उत्पन्न राहील. या झाडाच्या पानाना उग्र वास असतो, गुरं ती खात नाहीत. त्यामुळे संरक्षणाचा फारसा खर्च नाही. झाड वाढविण्याचाही खर्च नाही. जमिनीत थोडे खड्डे खणायचे. शेणखत घालायचं पालापाचोळा घालायचा, एक पाऊस झाला की तयार केलेले निलगिरीच रोप त्यात खोचून द्यायच. निलगिरीची रोप आम्ही केंद्रावर तयार केली आहेत. सामान्यतः तलासरी, जव्हार, मोखाडा या ठिकाणी आमचे विद्यार्थी पसरले आहेत. यावर्षी, हे तीन चार तालुके माझ्या डोळ्यासमोर आहेत. साधारण चार तालुक्यात शंभर विद्यार्थ्यांकडे एक एक गुठ्यात निलगिरी लावायची. ही जबाबदारी आमच्या केंद्रानं स्वीकारायची. उन्हाळ्यात आम्ही खड्डे खणू. रोपं केंद्रावर तयार करून पाठवून द्यायची हा एक जोडधंदा होऊ शकतो. हे उत्पन्न सुरू झाल. सागाची झाडं, बांबू, काही फळझाडं याची पैदास एकेका गुठ्यात सुरू करायची. एका छोट्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होऊ शकेल. मग विहिर, पंप, बारमहा शेती या मार्गांनं जाता येईल. झाडाची प्रवृत्ती माणसासारखी असते, एक झाड वाढल तर भोवताली दहा झाड वाढतील. मी या जागेत आलो तेव्हा इथं एक झाड नव्हतं. आता पहा किती झाडं आहेत. सुरुवातीला तुळशीचं एक रोप जगत नव्हत. लोक आम्हाला हसायचे या जमिनीत प्रयत्न करतात म्हणून; पण आता चार झाडं लावली तर त्यातली तीन जगतात. फक्त शेणखतावर ही प्रगती केली.

जसजशी जगलाची वाढ होईल तसतशी पाखरं, ससे, हरणं वाढवता येतील. स्वातंत्र्यानंतर आपल्याकडे जंगलाचा योजनाबद्ध विचारच झाला नाही. वाटेल तशी जगलतोड झाली. ब्रिटिशांच्या राज्यात कुठलही जगल वीस वर्षाच्या आधी तोडायचं नाही असा नियम होता. दहा टक्के जंगल पंचाहत्तर वर्षानंतर तोडत. जनावरासाठी पावसासाठी जंगल हवं. जंगलातले पशु, पक्षी या वनवासी लोकाचा आहार होता आज चागल्या प्रकारे तो त्यांना मिळत नाही. जंगल नीट वाढले तर मिळू शकेल. इथले खूप लोक दूध पीत नाहीत. ते निषिद्ध गाईच दूध तिच्या वासराच. ते माणसानं पिण पाप ही त्यांची कल्पना. इथल्या गाई जेमतेम अर्धाएक लीटर दूध देतात. ते माणसानं घेऊन टाकलं तर वासरू नीट वाढणार नाही. शेतीला चांगला बैल मिळणार हा व्यवहारीक दृष्टिकोनही नकळतच धर्मकल्पनेशी निगडीत झाला असेल. आतापर्यंत माझ्याकडे असे विद्यार्थी होते की ते दूध किंवा दुधाचा पेढा खात नसत. आता मात्र सगळेजण दूध पिणारे आहेत.

**प्रश्न** : जंगल नीट वाढलं तर जनावरं चागली वाढतील आणि आदिवासीना चागला आहार मिळेल अस तुमच्या बोलण्यात आलं. केंद्रावर तुम्ही फक्त शाकाहारच देता आहात. म्हणजे शाकाहाराचा संस्कार मुलावर होतो आहे. मासाहार मुलानी करावा असं तुम्हाला अपेक्षित आहे ?

**काणे** : हो, वनवासीचा जो आहार आहे तो त्यानी घ्यावा. पण चांगल्याप्रकारे घ्यावा अस आम्हाला वाटतं. इथ आम्ही देणार नाही. पण विद्यार्थ्यांनी मासाहार करूच नाही अस माझ मत नाही.

## अंधश्रद्धेविरुद्ध

**प्रश्न** : इथले संस्कार त्यानी पुढे जन्मभर टिकवावेत असे तुम्हाला अपेक्षित आहे ना ? स्वच्छता, शिक्षण, शेतीचे प्रयोग, तसाच शाकाहारही होऊ शकत नाही ?

**काणे** : स्वच्छता पाळा, चागलं शिका हे आम्ही त्यांच्या मनावर सतत बिंबवतो. तस फक्त शाकाहारच घ्या असं आम्ही म्हणत नाही. सरकारी अधिकारी मला मासाहाराबद्दल विचारतात मी सागतो आमच्या संकेताप्रमाणे आम्ही मांसाहार देत नाही. पण सणावाराला गुळाच्या पोळ्या, शिरा यातून पौष्टिक अन्न आम्ही मुलाना देतो. शासनाच अनुदान आम्हाला मिळत त्यामुळे मांसाहाराचे पौष्टिक अन्न आम्ही देणं अपेक्षित आहे. पण आमच्या बाबतीत शासनाने आग्रह सोडला आहे. आज मासाहार आम्हाला आर्थिक दृष्ट्या परवडत नाही. आमची ताकद येईल तर उद्या आम्ही तो मुलाना देऊ. केंद्रावर देणार नाही. दुसऱ्या ठिकाणी देऊ.

**प्रश्न** : उद्या जर कोणी विद्यार्थी तुम्हाला विचारायला आला की

शाकाहार आणि मांसाहार यातला श्रेष्ठ कोणता ? तर तुम्ही काय सांगाल ?

**काणे :** मी सांगेन, हे श्रेष्ठ ते कनिष्ठ-निकृष्ट असं काही नाही.जे खायचं ते स्वच्छ, चांगलं असलं पाहिजे. जे परवडेल ते खावे. स्वतःच्या आर्थिक स्थितीचा विचार करावा. माझी ही भावना विश्व हिंदु परिषदेची आहे असं म्हणता येणार नाही.

**प्रश्न :** याच दृष्टीने तुमच्या पुढे गोमांस खायलाही कसली हरकत नसावी.

**काणे :** वनवासी मुलगा गोमांस खाणारच नाही. त्याच्यावर तो संस्कार नाही. लहानपणापासून घरात तो कधी गोमांस खायला शिकलेला नसतो.

## अंधश्रद्धेविरुद्ध...

**प्रश्न :** पण समजा एखादा विद्यार्थी जास्त पुढारला, त्या संस्कारातून बाहेर पडला आणि तुम्हाला गोमांस खाण्याबद्दल त्यानं विचारलं तर तुम्ही काय सांगाल ?

**काणे :** तो एवढा पुढारेल तेव्हा काय करायचं, खायचं ते त्याचं तो पाहील.

**प्रश्न :** गोदुताई परुळेकरांबद्दल आदर वाटण्याच्या कारणात एक कारण तुम्ही त्यांचा शाकाहाराबद्दलचा अभिमान हे सांगितलंत. याचा अर्थ शाकाहार हे तुम्ही एक श्रेष्ठ जीवनमूल्य मानता असा होत नाही का ?

**काणे :** कोणाच्या मताचं दडपण न ठेवता, भीड न ठेवता त्या शाकाहाराबद्दल अभिमान व्यक्त करायच्या हे मला आदरणीय वाटत होतं. मत व्यक्त करण्यातली निर्भिडता महत्त्वाची आहे.

**प्रश्न :** आहाराच्या बाबतीत तुम्ही म्हणालात मांसाहार त्यांनी घ्यावा कारण तो त्यांच्या समाजाचा आहार आहे. तसंच दारूच्या बाबतीत म्हणता येईल, ते त्यांच्या समाजाचं पेय आहे. त्यांनी ते नेहमी घ्यावं असं तुम्ही म्हणाल का ?

**काणे :** त्यांचं पेयं दारू नाही, ताडी. ताडी सूर्योदयापूर्वी काढली आणि घेतली तर ती नीरा. तिला नशा नाही. म्हणून ताडीला वनवासी सूर म्हणतात. आपल्या देवाच्या सुरापानाशी या शब्दाचा संबंध आहे देव घ्यायचे म्हणून त्यांच्याकडे 'सूर' पेयाला प्रतिष्ठा आहे. पण काय होत, ताडी ते आंबवतात. उकळतात. त्यामुळे दारूचे सगळे दुर्गुण तिच्यात येतात. तिची नशा चढते. ही दारू पिऊ नका असं मी अगदी स्पष्टपणे सांगतो. दारू पिणं ही त्यांची संस्कृती असंही म्हणणं चुकीचं आहे. आपल्याकडे चहा तशी त्यांची ताडी. हा माणूस उपाशी फार. ताडी भूक शमवते, दुःखाचा विसर पाडते. म्हणून ती या समाजात रूढ झाली याचा अर्थ ती त्यांची संस्कृती आहे असा होत नाही. नुसती नीरेसारखी ताडी पेय म्हणून घेतली तर हरकत नसावी. ताडी दारू म्हणून घेणं बरं नाही हे आता त्यांना कळायला लागलं आहे. समारंभासाठी आमच्या वसतीगृहातला मुलगा घरी गेला आणि ताडीसेवनाची वेळ झाली की पालक म्हणतात, 'तू आपला आता हॉस्टेलवर जा.' एखाद्या मुलाचे वडील कामासाठी, मुलाकडे, माझ्याकडे येणार असले तर वसतिगृहात येताना ताडी पिऊन येत नाहीत. बाहेर रस्त्यावर भेटले तर सांगतात. 'ताडी घेतलीय आता येत नाही. पुन्हा केव्हातरी' हे आपोआप घडतं. मुलांच्या पालकांना आम्ही कधी काही याबद्दल सांगत नाही.

**प्रश्न :** मागे इथे जवळच हिंदु सेवा संघात आंभागला मी गेले होते. तेव्हा अण्णा टोकेकर म्हणाले, खेड्यात घरोघरी दारूचे गुत्ते. परका माणूस पाहिला तर त्यांना पोलिसाचा संशय येऊन खतम करायला मागेपुढे पहात नाहीत. ओळख काढून जाणं बरं. 'माणूस' मध्ये ती मुलाखत प्रसिद्ध झाल्यावर एकदोन जणांनी मला म्हटलं हीच खेड्यांची स्थिती आहे. तुमचं काय मत ?

**काणे :** आभाण येथून तीस पस्तीस मैलावर आहे. तेथे मनोरीला शहरी वातावरण आलं आहे. इथे वातावरण दहशतीचं नाही. सरकारनं संस्कृतिरक्षण म्हणून आदिवासींना दारू गाळण्याची परवानगी दिली आहे. झोपडीत स्वतःपुरती गाळतात. त्यामुळे बेकायदेशीर काही नाही. पोलिसाचा प्रश्न येत नाही, मुंबईतल्या दारूच्या अड्ड्याभोवतीचं गुन्हेगारी वातावरण इथे नाही.

**प्रश्न :** तुमच्या वसतिगृहातल्या मुलांशी मी गप्पा मारल्या. त्यांचा भुतावर, भुताळी बायका वगैरे प्रकरणावर फार विश्वास वाटला. त्यांच्या प्रगतीला त्यामुळे अडथळा येतो, तर हे अंधविश्वास घालवण्यासाठी तुम्ही काही केलं आहे ?

**काणे :** पूर्वी हे विश्वास जितके जबर होते तितके ते आज नाहीत. इतक्या वर्षांच्या गुलामगिरीचा एक परिणाम असा झाला आहे, की तो नुसत्या कुणाच्या बोलण्यावर विश्वास ठेवत नाही. प्रत्यक्ष दिसला तर विश्वास ठेवतो. झाड वाढलेली दिसली तर तो लावील. दवाखान्यातल माणूस बरं झालेलं पाहिलं तर दवाखान्यात येईल. वसतिगृहातल्या मुलांची मनं आता डॉक्टरसाठी तयार झाली आहेत. पूर्वी कॉलरा, सर्पदंश सगळे रोगी भगताकडे जायचे. ते दगावायचे. आता तसं नाही. वसतिगृहातला एक मुलगा घरी गेला होता. त्याच्या भावाला ओकाऱ्या होत होत्या. भगत बोलावला होता. पण मुलगा डॉक्टरसाठी धावत वसतिगृहावर आला. आमच्या परिचयातले डॉक्टर जीपने गेले. मध्ये ओढा. डॉक्टर ओढ्यातून गेले. त्यांनी इंजेक्शन दिलं. पण आणखी उपायासाठी याला न्यायला हवं म्हणाले. घराचा, गावाचा विरोध. पण आमचा मुलगा वस्ताद. दमदाटी करून भावाला खाटेवर घालून त्यानं ओढ्यातून पलीकडे आणलं. जीपमध्ये घालून वसतिगृहावर आणले. औषधोपचार झाले. गावात सगळ्यांनी गृहित धरलं होतं, पोरगं मेलं. पण दुसऱ्या दिवशी मुलगा स्वतःच्या पायांनी चालत गावात गेला. गावाचा डॉक्टरवर विश्वास बसला. पण डॉक्टर मिळायला हवा. गावाचा सरकारवर विश्वास नाही. सी. पी. एम्‌चं राज्य असल्यामुळं सगळ्या वातावरणात एकसारखं सरकार विरोधीच बोललं जात. त्यामुळं तर सरकारचा लोकांना बिलकूल भरवसा वाटत नाही. आमच्या वसतिगृहातल्या दवाखान्यात दर रविवारी मुंबईहून डॉक्टर यायचे. त्यांच्याकडे लोक यायचे. नंतर पेट्रोलचे भाव वाढले. डॉक्टरांना येणे जमेना पण आता ऊंबरगावहून दर रविवारी डॉक्टर जातो येतात. तेव्हा दीडशेदोनशे वनवासी रुग्ण असतात. ज्ञानाचा प्रसार जितका जास्त आणि खोल होईल तितक्या अंधश्रद्धा आपोआप संपत जातील. आमची ही जागा म्हणजे आधीचं स्मशान. या वनवासी लोकांची रीत अशी, मृताला दहन किंवा पुरलं तर त्याच्याबरोबर त्याच्या सगळ्या वस्तूही पुरतात. कधी अशा वस्तू, हाड इथं सापडायची. मुलं घाबरत. रात्री कोणी उरावर बसनं वगैरे म्हणत. त्यांच्या या कल्पना एकदम दूर करता येत नाही. मी मुलांना

सांगितलं, ' भुतांचा सरदार मुजा. मेल्यावर मी होणार आहे मुजा. त्यामुळे आतासुद्धा मी इथ आहे म्हणजे कोणाला भुताचा त्रास होणार नाही.' मुलाना पटलं. त्याची भीती गेली. थोड तारतम्य ठेवावं लागत. ज्या बायकाना भुताटकी, करणाऱ्या भुताळी ठरवतात त्याची स्थिती फार वाईट. सगळं गाव त्यांना जिवे मारतं. त्याच्या घरातली माणस गावाला सामील असतात. आज या बाबतीत काही होऊ शकत नाही. मोखाड्यात महिलाना हॉस्पिटलसबंधित शिक्षण देण्याचा मी प्रयत्न केला होता. तीसचाळीसजणी शिकून गेल्या. ते वाढवलं पाहिजे.

## सुसंकृत विद्यार्थी

**प्रश्न :** इथ आठवड्यातून एकदाच डॉक्टर येणार. अचानक कोणाला काही झालं तर काय करता ?

**काणे :** जिल्हा परिषदेच्या प्रायमरी हेल्थ सेंटरवर जातो. तेवढ्यानं निभण्यासारखा नसेल तर सरळ डहाणु. तेथे डॉक्टर आहेत. कॉटेज हॉस्पिटल आहे.

**प्रश्न :** जवळच्या ख्रिस्ती मिशनरी हॉस्पिटलमधे जाता ?

**काणे :** नाही. आता आतापर्यंत मिशनरी हॉस्पिटलमधे डॉक्टरच नव्हते. अपटूडेड कपड्यातल्या नर्स. सीलबंद औषध. नर्स त्या औषधांवरची माहिती वाचून आपल्याला औषध सांगणार. आता यायला लागला आहे त्याच्याकडे एक डॉक्टर. काही औषध उत्तम असतीलही. नाही म्हणत नाही. पण डहाणु बरं.

**प्रश्न :** म्हणजे मिशनरी हॉस्पिटलमधेही नेहमीसाठी, चोवीस तास डॉक्टर नाही ?

**काणे :** नाही. पूर्वी आमचा दवाखाना गुरुवारी चालायचा तर त्याच ओ. पी. डी. गुरुवारी बंद आता आमचा दवाखाना रविवारी तर त्यांचं ओ. पी. डी. रविवारी बंद.

**प्रश्न :** आदिवासी समाज स्त्री-पुरुष सबंधाच्या बाबतीत मुक्त समाज आहे. विवाहाआधीच मुलगा-मुलगी एकत्र रहातात. मुल होतात. नंतर सवडीने विवाह करतात. काडीमोड सहजपणे घेऊन दुसरा साथीदार शोधतात. तरी मुलाना बीनबोभाट सांभाळतात. पण तुमच्या हॉस्टेलमधे मुलामुलींचा एकमेकाशीं संपर्क नाही. एकमेकाशी बोलत नाहीत. हे कस ? की तुम्ही तस वातावरण इथे निर्माण केलं आहे ?

**काणे :** मूळ विचार होता मुलींच वसतिगृह पूर्ण वेगळ्या ठिकाणी ठेवावं. पण जागा, कार्यकर्ते यादृष्टीनं ते शक्य नव्हतं. म्हणून एकाच प्रिमाइसेसमधे दोन वसतिगृह केली. मुलींच्या वसतिगृहाच दार बंद केलं तरी आत सर्व प्रकारची व्यवस्था आहे. बाहेर येण्याची त्याना गरज पडत नाही. मुलामुलींचा परिचय आहे. जे बहीण भाऊ आहेत ते काम असलं तर एकमेकाकडे जातातही. काही समारंभाना मुलं-मुली एकत्र असतात.

**प्रश्न :** हे सगळ आहे. पण मधे एक प्रकारे पडदा आहे ना ?

**काणे :** हो. पडदा आहेच.

**प्रश्न :** का ? काही प्रेमप्रकरणं समजा उद्भवली तर काय बिघडणार आहे ? त्यांच्या समाजात काही हलकल्लोळ होणार नाही. मुलामुलींचा परिचय असला तरी मैत्री दिसत नाही.

**काणे :** मैत्री नाहीच. माझ्यापुढे मुलींचे वसतिगृह सुरू करताना अनेक प्रश्न होते. वसतिगृहप्रमुख म्हणून एक महिला कार्यकर्ती आवश्यक होती. आमचे कार्यकर्ते अप्पा जोशी याचा विवाह होऊन त्याच्या पत्नीने ही जबाबदारी स्वीकारल्यावर मुलींचं वसतिगृह नीट मार्गी लागलं. त्याआधी एक वर्ष एक म्हाताऱ्या बाई होत्या. तेव्हा ते जेमतेम सुरू केल होत. जास्त काही किटकिटी मला नको होत्या. मुलींना शिक्षणासाठी आम्ही इथं आणल आहे. स्त्री शिकली की ती घर बदलते. पुरुषाच्या शिक्षणान ते तितक होत नाही. या मुलामुलींना मुळात अभ्यासाचा संस्कार नाही. इतर आकर्षण निर्माण झाली तर अभ्यासावरच लक्ष झट्कन उडेल, एका वेगळ्या प्रकारे हा पूर्वीचा शिक्षण घेण्याचा ब्रह्मचर्याश्रम समजा.

**प्रश्न :** हा पडदा मला बरोबर वाटत नाही. मुलं-मुली एकमेकांना दिसतात. एका शाळेत जातात. त्यातून आकर्षण निर्माण होऊनही अभ्यासावरचं लक्ष उडू शकतं. गप्पा मारताना मुलं मला म्हणाली, आम्ही हॉस्टेलवर नाही पण शाळेत मुलींशी बोलतो.

**काणे :** जेवढा प्रयत्न करता येईल तेवढा करायचा. गणपतीच्या वेळी मुला-मुलींनी रात्रभर एकत्र नाचण्याची त्याची प्रथा आहे... एकीकडे मुली नाचत असल्या तर आम्ही मुलांना म्हणतो तुम्ही दुसरीकडे, पलीकडे जा. आता तिकडे नावयावर जाऊन ते एकत्र नाचतही असतील; पण मुद्दाम प्रतिसाद देणारं वातावरण आम्ही या ठिकाणी येऊ देत नाही. शिवाय माझ्यासारखा मनुष्य इथे रहातो. संस्थेची काही पद्धत; आचाराचे संकेत आहेत.

**प्रश्न :** तुमच्या वसतिगृहातल्या मुलाच रहाणीमान उचावण्यासाठी तुम्ही हेतूत: प्रयत्न करता की, उच्च रहाणीमानाच्या गोष्टी ते आपोआप आत्मसात करतात.

**काणे :** साधारणपणे आपोआप आत्मसात करतात; पण स्वच्छता शिकवावी लागते. सडासात जाणे, पाणी ओतण, ते स्वच्छ ठेवण शिकवाव लागतं.

**प्रश्न :** घरी गेली की, ही मुलं पुन्हा ती अस्वच्छता, गुरांबरोबर एकाच झोपडीत रहाण स्वीकारतात ?

**काणे :** ती फार वेळ झोपडीत टिकत नाहीत. त्यांना रोज आघोळ करण, कपडे बदलणं याची सवय होते.

**प्रश्न :** मग मुलगा आणि बाकीच घर यांच्यात एकमेकाबद्दल थोडी परकेपणाची भावना येते ? इतर भावडाना मत्सर ?

**काणे :** मुबईचा मुलगा अमेरिकेत जाऊन आल्यावर, त्याला थोड्या सवलती देण्याकडे घराचा कल रहातो. तेच इथ घडतं. घर काळजी घेते. मत्सर साधारणपणे भोवताली असतो. मला अनेकदा वाटायच आमचे विद्यार्थी घरी जाऊन भोवतालच्या मुलाना एकत्र का करू शकत नाहीत ? पंचाईत अशी होते, बाकीच्याना हा शिकलेला मुलगा 'फॉरेनर' वाटतो. याच्याजवळ अस काहीं तरी आहे, जे आपल्याजवळ नाही. हा जेव्हा म्हणतो, आपण हुतुतू, खो-खो खेळू, तेव्हा त्याना हे काय नवीन ते खेळावं अस वाटतं; पण मग ते म्हणतात, तू कुठं नेहमी आमच्याबरोबर असतोस ? तू कुठं आमच्याबरोबर ताडी

पितोस ? हा दुरावा निर्माण होतो. शिक्षणाचे फायदे त्यांनी जवळून पाहिले की, हे सगळं हळूहळू कमी होईल.

**प्रश्न :** शिकलेल्या विद्यार्थ्यांचा कल याच भागात रहाण्याकडे असतो की, शहराकडे पळण्याचा ?

**काणे :** शहरी मनात एक भीती असते. खेडयातली शिकलेली मुलं शहरात येऊन आपला बोजा वाढवतील.

**प्रश्न :** आमच्याकडे एस्. एस्. सी. झालेले विद्यार्थी प्रामुख्याने जिल्हा परिषद, आश्रमशाळा या ठिकाणी शिक्षक झाले शिक्षित माणस इथेच रहावीत असा आमचा प्रयत्न असतो. तेवढा हा भाग जास्त सुधारेल. आमचे विद्यार्थी शहरात रहायला फारसे उत्सुक नसतात. नोकरी नाही मिळाली तर नाइलाजानं शहरात जातात.

**प्रश्न :** याचं कारण शहरात आपण टिकू शकणार नाही, अशी काही कल्पना की, या भागाच प्रेम ?

**काणे :** टिकू शकणार नाही ही भीती थोडी असेल; पण मुख्य म्हणजे शहरात रहायला खर्च जास्त. वाढत्या खर्चात स्वत:च्या घराला सहाय्य करिता येत नाही ही जाणीव असते. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, एस्. टी. मध्ये नोकरीला लागलेले विद्यार्थी, या भागात बदली करून घ्यायला बघतात. शेतकीचे BSC झालेले दोन विद्यार्थी आहेत त्यानी पालघर, जव्हार हेच भाग मागून घेतले आहेत.

एक लक्षात घ्या, इथे फक्त शेतीवर भागणार नाही. 'कसेल त्याची जमीन' मध्ये मिळालेली जमीन अगदी कमी आहे. शिकलेला मुलगा बाहेर जाऊन नोकरी करणं हेच योग्य आहे. नोकरी नाही तर दुसरा व्यवसाय त्याला करता आला पाहिजे. त्या दृष्टीने आम्ही यंत्रशाळा सुरू केली आहे एक वर्षाचे यंत्रशिक्षण मुलांना देतो. एका वेळेला पधरा मुलं शिकतात. शिकलेली इथेच भोवतालच्या फॅक्टरीत नोकरीला लागलेली आहेत. वीजेची मोटर बसविली, गोबर गॅस प्लँट, विहिरीवर पप हे सगळं त्याला कळलं पाहिजे, दुरुस्त करता आलं पाहिजे असं शिक्षण आम्ही देतो.

विद्यार्थी पूर्वी मला सांगायचे, व्यापारी आम्हाला लुटतात. विशेषत: रेशनचे दुकानदार, पावसाळयात याच्याकडे धान्य मिळत नाही. धान्य असत; पण जास्त भावानं विकतात. मी मुलाना म्हटलं, रेशनचं दुकान तुम्ही चालवा; पण चोपट भावानं विकण्याचा व्यापारीपणा करू नका. आज आमचे तीन विद्यार्थी रेशन दुकान चालवतात. त्या भागामध्ये धान्य नाही असं कधी होत नाही. दुर्दैवानं या भागात न्हाव्यापासून, धोब्यापर्यंत सगळे व्यापारी बाहेरचे आहेत. या सगळया व्यवसायात वनवासी शिरले पाहिजेत. न्हावी, धोबी अजून कोणी झाले नाहीत. दुधाचा धदा काहीजण करतात. एकानं चक्की टाकली आहे. दुसरा भाताची गिरणी काढण्याच्या विचारात आहे. मात्र हे सगळं हाताच्या बोटावर मोजावं इतकं मर्यादित आहे. म्हणून हे आमच्या प्रयोगाचं यश आहे असं म्हणता येणार नाही. अजून दहा वर्षांनी यश म्हणावं इतपत स्थिती येऊ शकेल.

**प्रश्न :** न्हावी, धोबी हे व्यवसाय करताना काही जातीयतेची कल्पना आड येऊ शकते.

**काणे :** व्यवसायाच्या बाबतीत म्हणण्यासारखं जातीचं स्पिरीट नाही; पण झटकन् न्हाव्याचा धंदा कोणी करणार नाही, इथे हॉस्टेलच्या परिसरात करेल; पण स्वत:च्या गावी जाऊन करणार नाही. दुधाचा धंदा करण्याकडे कल दिसतो. तो शेतीला जोडून सहज होऊ शकतो.

**प्रश्न :** दुधाच्या धंद्याला, न्हाव्यापेक्षा जास्त पसती याचं कारण केवळ आर्थिक की, प्रतिष्ठेची कल्पना ?

**काणे :** नाही म्हटलं तरी प्रतिष्ठेची कल्पना आहे. पांढरपेशे समजले जाणारे व्यवसाय करणंच या मुलांनाही सहजपणे आवडतं.

**प्रश्न :** तुमच्या केंद्राचा सगळा खर्च तुम्ही कसा चालवता ?

**काणे :** शासनाचं वार्षिक एक लाख रुपये अनुदान आहे. बाकी सगळया देणग्या.

**प्रश्न :** समाजकार्य करणाऱ्या परदेशी संस्थाकडून काही मदत होते ?

**काणे :** नाही. अजिबात नाही. मुंबई, ठाणे जिल्हा आणि उंबरगाव इकडच्या लोकांकडून मुख्यत: देणग्या येतात. आमचा वार्षिक खर्च साडेतीन लाख रुपये आहे. आमच्या गरजेएवढं दूध आमच्या गोशाळेतून मिळतं. आठवडयातून चार दिवस खाता येईल एवढा भाजीपाला आम्ही इथंच पिकवतो. तेवढयावरच भागवतो. तादूळ मात्र बाहेरून आणावा लागतो. फक्त एका महिन्याला पुरेल एवढाच तादूळ आम्ही इथं काढू शकतो.

कधी शाळाच्या सहली इथं येतात. त्यांची आम्ही पैसे घेऊन व्यवस्था करतो. कोणकोणत्या निमित्तानं इथं येणारे, रहाणारे लोक संस्थेला काही तरी मदत करतात. उणीव उकळण्याची वृत्ती सहसा नसते.

मला नेहमी एक खंत वाटते, वसतिगृहात रहाणाऱ्या मुलांना आम्ही दोन वेळा जेवायला देतो. पण मधल्या वेळी काही खायला देऊ शकत नाही. शाळेच्या गणवेषाचे दोन कपडे देतो. पण अजून एक कपडयाची जोडी देता आली पाहिजे. हे जमलं पाहिजे.

आमच्या इथल्या सगळया कामाची जबाबदारी उचलणारे अण्णा जोशी आणि त्यांची पत्नी यांची तर आम्ही काही व्यवस्थाच करू शकत नाही. दोघानाही सुटी, विश्रांती माहिती नाही. एवढी मोठी जबाबदारी त्यानी पेललेली आहे, तुम्हाला झटकन कल्पना येणार नाही.

**प्रश्न :** तलासरी भागाचे विकासाचे तुमचे मार्ग तुम्ही मला सांगितलेत. इतराच्या बोलण्यात विकासासाठीच आंदोलनात्मक मार्ग आले आदोलनात्मक कार्यात सहकार्य म्हणून विश्व हिंदु परिषदेचं प्रतिनिधित्व असेल ?

**काणे :** नाही तो फार वेगळा भाग आहे. विद्यार्थ्यांवर संस्कार, शिक्षण, उपजीविका हे आमचं उद्दिष्ट आहे पचवीस विद्यार्थी माझ्याकडे आले तर त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सोडवण्याचा मी प्रयत्न करीन. पण त्यासाठी सार्वत्रिक आदोलन करणार नाही. प्रत्येक बाबीसाठी सरकारवर अवलबून रहाणं, सरकारकडे दाद मागणं हे मला पसंतच नाही.

**प्रश्न :** मोर्चाचा एक फायदा वाटतो. मुलं धीट होतील परवा इथे तलासरीत सी. पी. एम्. नं पोलिसाविरुद्ध शाळेतल्या विद्यार्थ्यांचा मोर्चा काढला होता. त्यातून पोलीसविरुद्ध बोलण्याचं धैर्य मुलामध्ये येईल. त्याचं काही महत्त्व ?

**काणे :** आमचे पंचवीस विद्यार्थी आज पोलीसमध्ये आहेत. ते योग्य

मार्गानं काम करायला समर्थ आहेत हे महत्त्वाचं.

**प्रश्न :** पण ते सगळे प्रस्थापित चौकटीत जिरून जातील असं नाही होऊ शकत ? तुम्हाला अशी खात्री वाटते की, तुमच्या संस्कारांनी निर्माण झालेली व्यक्तिवैशिष्टय, उद्दिष्ट राखून ते त्या खात्यात वावरू शकतील ?

**काणे :** प्रस्थापित चौकटीत ते जिरणार नाहीत अशी मला खात्री वाटते.

**प्रश्न :** कशावरून ? पुरावा देऊ शकता ?

**काणे :** आमचा एक विद्यार्थी शिक्षण झाल्यापासून भिवंडीत सब-इन्स्पेक्टर आहे. तो चांगल्या प्रकारे टिकून आहे. भोवतालचं वातावरण असतं. त्यातून तो शंभर टक्के सुटतो असं मी म्हणत नाही. पण खूपसा सुटतो. त्याचे अधिकारी इथं आले की नेहमी त्याचं कौतुक सांगतात. गणपतीत पोलिसाना साधारणपणे सुटी नसते. पण याला मिळते. कारण याच काम चांगलं आहे.

**प्रश्न :** तुम्ही अधिकाऱ्यानं केलेलं कौतुक सांगता आहात अधिकाऱ्याचा विश्वास संपादन करायला आणि जनतेचा विश्वास संपादन करायला वेगळे गुण लागतात. मर्जीप्रमाणे वागल्यावर अधिकारी प्रसन्न होतो. पण त्याच जनतेच्या मतात कोणत स्थान आहे का ?

**काणे :** सध्या पोलिसांसबंधी हेच मत सगळीकडे आहे, संस्कारानी फरक पडू शकतो, यावरचा सार्‍यांचा भरवसा सपला आहे. पण संस्कारानी फरक पडतो यावरचा विश्वास वाढवणं हेच मला महत्त्वाचं वाटत. आमच्या आणि राजकीय पक्षाच्या मतातील हाच मोठा फरक. यासबंधी कोणावर दोषारोप करण्यापेक्षा आपले मन व कृती चांगली ठेवावी यावर आम्ही भर देतो. आमचा विद्यार्थी जेव्हा भिवंडीला पोलीस सब-इन्स्पेक्टर म्हणून दाखल झाला त्याच दिवशी पोलीस स्टेशनवर एक धडक मोर्चा आला होता. आमच्या लक्ष्मणने ही बाब अशी हाताळली की वरिष्ठ आणि मोर्चेवाले दोघाचही समाधान झाल. आज तो त्याचा आधार आहे. भिवंडीत उसळलेल्या दंगलीच्या काळातही त्यान नागरिकांचा आणि वरिष्ठाचा दोघाचाही विश्वास मिळवला होता. आमचं भिवंडीच महाविद्यालयीन विद्यार्थी वसतीगृह, भिवंडी-कल्याण रोडवरच्या झोपडपट्टीत एका हनुमान मंदिराजवळ आहे. दंगल उसळली तेव्हा सुटीचे दिवस असल्यामुळे तीन चार विद्यार्थीच होतो. दंगल उसळल्यावर आजूबाजूच्या सुमारे ५०० भगिनींनी त्याचा आश्रय घेतला मंदिरात या मुलानी सुमारे आठ दिवस त्यांची देखभाल केली. तेथील धान्य सपताच कल्याणमधल्या माझ्या मित्राना गाठून धान्य मागवून कोणाच्या दमदाटीला न घाबरता जे आश्रयाला आले होते त्या बायका मुलांना आधार दिला. पीडित देशबांधवांची साथ आपण करायची हा संस्कार खोल रुजल्याचाच परिणाम म्हणजे त्याची ही कृती.

□

श्री. माधवराव काणे एक प्रज्ञावंत कार्यकर्ते आहेत, हे त्यांच्या शब्दाशब्दातून जाणवते. रा. स्व. संघाच्या शाखेत त्याच्या सामाजिक जीवनाची सुरवात झाली असली आणि विश्व हिंदु परिषदेचे प्रतिनिधी म्हणून ते तलासरीत उभे आहेत, तरी या संघटनांच्या चौकटीने त्याचे विचार बंदिस्त झालेले नाहीत. त्याचे विचार स्वयंभू आहेत, आणि कार्यपद्धतीही स्वयसिद्ध आहे. ती संघटनेच्या कर्मकांडात रुतलेली नाही. त्याची वृत्ती अतिशय धर्मी आहे. निर्णय ठाम आहेत. परिस्थितीचा अचूक अंदाज त्याना येतो. संघटनेच्या आत बाहेर दोन्हीकडे त्यानी जरूर संघर्ष स्वीकारले आहेत. परतु बडखोरीची आवेशपूर्ण भाषा ते बोलत नाहीत. उलट सतत तडजोडीची, माघार घेण्याची भाषाच ते बोलतात. कारण ते मुरब्बी राजकारणी आहेत. शब्दात पकडले न जाण्याची दक्षता ते सहजपणे घेऊन जातात. अंगिकारलेल्या कार्याच्या फायद्या-तोटयाचे गणित त्याच्या मनात सतत असते. तोटा होऊ शकेल असे शब्द ते कधी वापरणार नाहीत. कर्तृत्वाने निर्माण झालेला त्याचा अधिकार इतका स्वयसिद्ध आहे की बंडखोरीच्या शब्दाची त्याना आवश्यकताच भासत नसावी. ते कृती करतात आणि मोकळे होतात.

## क्रांती नव्हे उत्क्रांती

मात्र त्याचे राजकारणपटुत्व ध्येयवाद व्यवहारात आणण्यासाठीच प्रयत्नशील आहे हे सतत जाणवते. स्वतःची विशिष्ट प्रतिमा उभी करण्याकडे, किंवा सत्तेच्या खेळाकडे या राजकारणपटुत्वाचा कल आहे, असे त्याच्याशी बोलताना तरी बिलकूल वाटले नाही. असीम ध्येयनिष्ठेमुळेच हे शक्य वाटते. कर्तृत्ववान माणसामध्ये असणारा अहंकाराचा स्वाभाविक दर्प त्याच्या व्यक्तिमत्त्वात आढळत नाही. 'मी राजकारणात होतो म्हणून मला हे जमलं. कोणत्याही कार्यकर्त्याला जमेल असं नाही' हे वाक्य अगदी निर्लेपतेने त्यानी सहज उच्चारले. त्यात इतराचा अधिक्षेप नव्हता. किंवा स्वतःचा गौरव नव्हता. केवळ वस्तुस्थितीचे भान होते. कशामुळे होऊ शकते हे सारे ?

'पहिले हरिकथानिरूपण । दुसरे राजकारण ॥
तिसरे सावधपण । सर्वाविषयी ॥

ही रामदासाची विचारसरणी श्री. माधवरावांच्या रक्तात अगदी भिनून गेली असावी.

सरकाराच्या जोरावर सत्त्वशील, स्वत्वयुक्त, अन्यायाचा मुकाबला करण्यास समर्थ अशी तरुण पिढी घडविण्यासाठी श्री. माधवराव काणे आत्मविश्वासाने उभे आहेत. त्याची नजर वास्तवाचा वेध घेण्यात जागरूक आहे. तिला स्वप्नरजन माहिती नाही. म्हणूनच मुलामधे ध्येयवाद रुजवितांना त्यांच्या पोटापाण्याच्या व्यवस्थेचा ते विचार करतात. ध्येयवादाची काजळी उडविण्याकडे, असंतुष्टतेचा वणवा पेटविण्याकडे त्याचा कल नाही.

श्री. काणे क्रांती करू इच्छित नाही. त्याचा मार्ग उत्क्रांतीचा आहे त्याच्या भोवताली त्याच्या कार्यात विघ्ने आणणारी माणसे आहेत, असे त्याच्या बोलण्यात आले. त्याच्याशी मुकाबला करण्यास ते पुरे पडतील असे वाटते. पण त्यांच्या उत्क्रांतीच्या मार्गातला शत्रू ठळठळीतपणे समोर उभा नाही. तो अदृश्य आहे. संस्काराच्या जोरावर सुखी-समृद्ध जीवन, सुसंस्कृत वातावरण त्याना निर्माण करायचे आहे. सत्प्रवृत्त, अन्यायाशी झगडण्यास समर्थ, स्वार्थत्यागी नव्हे पण प्रामाणिकपणे नोकरी करणारा माणूस त्याना हवा आहे. संस्कार टिकण्यात अनेक अडथळे उत्पन्न होतात. क्षणाक्षणाला बदलणारी आर्थिक परिस्थिती माणसाला भ्रष्टाचाराकडे खेचू लागते. भ्रष्टाचार करणाऱ्याला ताठ मानेने अन्यायाविरुद्ध उभे रहाता येत नाही.

वर्तमानपत्रातल्या जाहिराती, चित्रपट, दूरदर्शन मोहमयी जीवनाची स्वप्ने तरुण माणसापुढे उभी करतात प्रतिष्ठा सन्मान, प्रसिद्धी, अनेक रूपांनी निर्माण होणारी जीवनातली स्पर्धा कधी कधी गळा आवळणारी परिस्थिती निर्माण करते. या सर्वांवर मात करून संस्कार टिकविणे सोपे नाही परंतु याच मार्गाने पुढे जायचे असा काणे यांचा निर्धार आहे, आणि उत्क्रांतीसाठी त्याला पर्यायही नाही असे वाटते. परंतु एक मात्र वाटते, त्यांचे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी, संघर्ष आणि तडजोड यांचा समन्वय साधण्यासाठी मुचीला तयारी करण्याकडे त्यांनी विशेष लक्ष केंद्रित करायला हवे. ◻

## श्री. अप्पा जोशी आणि सौ. शोभा जोशी

कोणतीही व्यक्ती कितीही कर्तृत्ववान असली तरी एखादे मोठे कार्य, कार्यक्षम संस्था, एका व्यक्तीच्या प्रयत्नाने बहरू शकत नाही. मुख्य व्यक्तिच्या भोवताली प्रामाणिक, तळमळीचे कार्यकर्ते आवश्यक असतात. श्री. माधवराव काणे यांच्या खांद्याला खांदा लावून उभे असलेले अप्पा जोशी हे असेच तळमळीचे कार्यकर्ते आहेत. वसतिगृहातल्या मुलांची भोजन, निवासाची व्यवस्था, श्री. अप्पा जोशी पहातात. मुलांच्या प्रार्थना, व्यायाम, खेळ, आजारपणे, इतर काही गरजा सगळीकडे अप्पा जोशींचे लक्ष असते. संस्थेत येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत, भोजन–निवासाची व्यवस्था, त्यांच्या परत जाण्याची सोय याची जबाबदारीही अप्पांवरच असते. या चाकोरीच्या कामात माधवराव काणे यांचा वेळ जाऊ नये म्हणून अप्पा जोशी दक्ष असतात. अप्पांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे 'माधवरावांची उंची मोठी. मी तेथपर्यंत पोहोचू शकत नाही. माझी भूमिका धाकट्या भावाची. त्यांच्यापुढे मोठे कार्य आहे. नेहमीच्या व्यवहारात ते अडकू नाहीत, त्यांचा वेळ जाऊ नाही याची काळजी घेणं मी माझं कर्तव्य समजतो.' मी अप्पांना म्हटले, 'एवढी मोठी संस्था. तिचा व्याप बराच. विद्यार्थ्यांच्या किरटकिटी, गडी माणसांचा चुकारपणा, आलेल्या पाहुण्यांची काही तरी कुरकुर, हे कोठल्याही ठिकाणी असतं तसं इथं असणारच. ते निभावताना तुम्ही आणि माधवराव, तुम्ही आणि विद्यार्थी यांच्यात कधी तणावाचे, संघर्षाचे प्रसंग आले ? ते सांगू शकाल ? अप्पा जोशी मनमोकळेपणाने म्हणाले, 'प्रसंग आले आणि गेले. खरं सांगतो, मला बारीकसारीक गोष्टी फारशा आठवत नाहीत. मी विसरतो. माधवरावांशी संघर्षाचे असे प्रसंग मुळीच आले नाहीत. पण माधवराव या ठिकाणी चुकीचं वागत आहेत असं कधी कधी मला वाटायचं. शेवटी दिसायचं, तेच बरोबर आहेत. त्यांच्याजवळ जी दूरदृष्टी आहे ती माझ्याजवळ नाही. माझा स्वभाव पटकन् कोणाशीही, काहीही बोलून जाण्याचा. माधवराव मला नेहमी म्हणायचे, एवढा मोकळेपणा बरोबर नाही. समोरचं माणूस लक्षात घेऊन बोलण्याचं धोरण ठेवलं पाहिजे. अनुभवाअंती मला हे पटलं. पण मूळ स्वभाव वर येतोच. एकदा रात्रीची जेवणं झाल्यावर थोडं अन्न उरलं होतं. सकाळी उठलो तेव्हा लक्षात आलं ते अन्न नाहीसं झालं आहे. मी मुलांची चौकशी केली. छडा लावला. मुलांना राग आला. त्यांनी माझ्याविरुद्ध तक्रारीची चिठ्ठी माधवरावांना लिहिली. ही



दोघांची
जीवनमूल्ये,
जगण्याचा ध्यास
एकच !

मुले तशी प्रामाणिक, कष्टाळू, इतर कोणत्या बाबतीत चौकशी केली असती तर ती रागावली नसती. पण 'जेवण' म्हणजे इथल्या या मुलांच्या जीवनात फार नाजूक जागा. मी त्यांच्या मर्मावरच आघात केला होता. म्हणून मुले दुखावली. नंतर मला हे स्पष्ट झाले. मी ठरविले. शक्यतो अशी वेळच येवू द्यायची नाही आणि जेवण्याखाण्यावरून मुलांना काही बोलायचे नाही.

### एकाच कार्याशी समरस

तलासरीला येण्यापूर्वी श्री. अप्पा जोशी रोहा, मुरूड, पाली, रायगड या भागात रा. स्व. संघाचे प्रचारक म्हणून काम करीत होते. काही काळ त्यांनी शाळेत शिक्षक म्हणून काम केले. त्यांचे व्यायाम शिक्षकाचे प्रशिक्षण झाले आहे वडिलांच्या मृत्यूनंतर केवळ प्रचारक म्हणून काम करणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे उपजीविकेची सोय होईल असे कार्यक्षेत्र निवडण्याचे त्यांनी ठरविले. श्री दामुअण्णा टोकेकरांनी तलासरीला जाण्यास त्यांना सुचविले. आणि १९६९ मध्ये ते तलासरीला आले. काही वर्षांनी अप्पानी विचारपूर्वक गृहस्थाश्रमात प्रवेश केला. आपण कोणत्या प्रकारचे जीवन स्वीकारले आहे, येथे अकरा ते पाच अशा ठराविक वेळाला बांधलेले काम नाही, आठवड्यातून एक दिवस सुटी, वर्षातून एक महिना रजा असेही नाही याची सांगून आलेल्या मुलीला विवाहापूर्वीच कल्पना दिली. मुलींच्या वसतिगृहाची जबाबदारी स्वीकारावी लागेल याचीही भावी पत्नीला कल्पना दिली. आणि नंतर विवाह केला.

सौ. शोभाताई जोशींनीही मुलींच्या वसतिगृहाची जबाबदारी मनःपूर्वक स्वीकारलेली दिसते. त्यांचे माहेर कोकणातले. शालेय शिक्षण त्यांनी एका वसतिगृहात राहूनच पुरे केले. त्यामुळेच वसतिगृहाची जबाबदारी स्वीकारण्याचे आकर्षण वाटले असे त्या म्हणतात. सामाजिक कार्य करायचे म्हणजे काय केले जाते याची त्यांना विवाहापूर्वी नीट समज नव्हती असे त्या मोकळेपणाने कबूल करतात. पण जे स्वीकारले आहे, त्यातून बाहेर पडावे असे मात्र त्यांना कधी वाटले नाही. सासर–माहेरच्या सगळ्या कौटुंबिक सोहाळ्यांना जाता येत नाही हे सुरुवातीला त्यांना जाणवायचे. पुढे अंगवळणी पडले.

पती–पत्नीची जीवनमूल्ये, जगण्याचे ध्यास यात फार तफावत असली की, संसाराचा विचका होतो. समाजकार्य करणाऱ्याच्या जीवनात तर अशा वेळी क्षणाक्षणाला समरप्रसंग उभे रहातात. वैयक्तिक जीवन अस्वस्थ झाले की कधी कधी ध्येयजीवनालाही तडे जाऊ शकतात. सुदैवाने जोशी पती–पत्नी एकाच कार्याशी समरस झाले आहेत. वसतिगृहातल्या मुली पुस्तके वाचतात की नाही हे ताई जातीने पहातात. वेळ मिळेल त्याप्रमाणे मनाचे श्लोक, रामरक्षा, मुलींना शिकविण्याचे त्यांच्या मनात आहे. तर वसतिगृहातील मुले खेळाडू म्हणून पुढे येऊ शकतील, त्यांना खेळांची सर्व सामग्री दिली पाहिजे, खेळ शिकवण्यासाठी चांगले शिक्षक आणले पाहिजेत असा विचार अप्पांच्या डोक्यात घोळत असतो. शाळेत जाणाऱ्या त्यांच्या दोघी मुलीही वसतिगृहाच्या वातावरणात रमल्या आहेत. आपल्या मुलींना मुद्दाम शहरी संस्कारात वाढवावे असे जोशी पती–पत्नींना वाटत नाही. आमच्या सगळ्या नातेवाईकांचे आम्हाला सहकार्य आहे, कोणत्याही अधिक प्रापंचिक जबाबदाऱ्या ते आमच्यावर टाकत नाहीत, हे जोशी पती–पत्नी आवर्जून सांगतात.

तलासरीचा परिसर अनेक दृष्टींनी जागा झाला आहे, हे फिरताना व्यक्तीशी बोलताना जाणवते. गोदावरीबाईंनी त्याला गुलामगिरीतून मुक्त केले. अर्धपोटी असला तरी हा परिसर आत्मविश्वासाने भोवताली पाहू लागला. गोदावरीबाईंबद्दलची भक्ती ही या ठिकाणची मार्क्सवादाच्या प्रेमाची प्रेरणा आहे. मार्क्सचे तत्त्वज्ञान नव्हे. सतत संघर्षाची तयारी करून कम्युनिस्टांनी तलासरी परिसराला जागरूक ठेवले आहे. आता ते औद्योगिकरणाने अधिक विकास करू इच्छितात. विश्व हिंदु परिषद या परिसराला सुखी–समृद्ध सुसंस्कृत समर्थ जीवन देऊ इच्छिते. जिल्हा परिषदेने शिक्षणाचे जाळे सर्वभर विणले आहे. आपले पोट भरण्यासाठी इच्छेने–अनिच्छेने अनेक माणसे नोकर म्हणून हे कार्य करीत आहेत. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शिक्षण आणि वैद्यकीय सेवेसाठी जाग व्यापलेली.

प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मार्गाने ही सगळीच मंडळी निवडणुकीच्या राजकारणाला जोडलेली आहेत. त्यातूनही तलासरीचा विकास होतो आहे.

येथे मला म्हणावेसे वाटते की राजकारण, सत्तेची स्पर्धा ही आत्यंतिक वाईट समजण्याचे कारण नाही. त्या सत्तेच्या मोहाने का असेना पण काही माणसे या दुर्लक्षित, दरिद्री माणसांच्या जगाकडे वळली. सत्तेपासून, राजकारणपासून दूर असलेल्या कोणालाच या भागाकडे पहाण्याची आवश्यकता पूर्वी वाटली नाही आणि आजही वाटत नाही.

□

---

## पुस्तके

# क्षणाचे वळण–समृद्ध कथा

'क्षणाचे वळण' हा सौ. कुंदा पारसनीस यांच्या वीस कथांचा संग्रह. यातील काही अपवाद सोडले तर जवळजवळ सर्व कथा सत्यकथेतून प्रसिद्ध झाल्या आहेत, त्याही सत्तावन ते पासष्ट या कालखंडात. जेव्हा सत्यकथा पूर्णार्थानं बहरात होती. जी. ए., गाडगीळ, गोखले यांच्यासारखे पक्व किंवा चिरमुले, पानवलकरांसारखे मुक्त लेखक खूपसं काही देत होते. विचाराला चालना देत होते. अस्वस्थ करत होते. झपाटून टाकत होते आणि तृप्तीही देत होते. अशा या नवकथेच्या प्रसन्न काळात कुंदाताईंनी सत्यकथेच्या जाणकार वाचकाला बरंच काही दिलय्, समृद्ध केलंय्, हे या कथा वाचून पटतं.

सर्व कथा वाचत असताना अस्तरासारखा जागवत रहातो तो लेखिकेच्या स्वभावातील मायाळूपणा. लेखिकेला असलेली अतीताची ओढ. जन्ममरणाच्या त्याच त्याच फेऱ्यात भोवंडण्याबद्दलची बेचैनी आणि तरीही तिचं वास्तवाचं न सुटलेलं भान. प्रत्येकाचे पाय मातीचेच असतात ही शहाणी जाण असल्यामुळे नेहमी तडजोडीकडे असणारा कल. समांतर रेषा दूर परंतु निश्चितपणे एकमेकांना मिळतात. याची शहाणी जाणीव. मनुष्यस्वभावाचा शोध. अतर्क्य अशा परिस्थितीचं निसर्गाच्या माध्यमातून अगदी रस्त्यासारख्याही सरळसोट माध्यमातून केलेलं चिंतन इथे दिसतं.

'संधिकालातील सीमाप्रांत' या पहिल्या कथेतच लेखिकेची मुक्तीची ओढ दिसून येते. ॲनेस्थेशियाच्या अर्धशुद्धीत जन्ममरणाच्या न संपणाऱ्या अटळ साखळीत अडकल्याची गुदमर तिला सैरभैर करते. या चक्रात भोवंडायचं आहे याची जाण असूनही शेवटी मृत्यूकडे नेणारा विचित्र अन्अर्थली प्रकाश आणि नंतरचा काळोख तिला भयभीत करतो. पण नंतर शुद्धीच्या वाटेवर जीवनाच्या मार्गावरच्या चांदण्या, फुलं, झंकार सगळं तिला उघड्या खिडकीतून सुखवतं. शाश्वताची ओढ असूनही अशाश्वत जीवन कसं खुणावत असतं ! लेखिकेच्या नकळतही आसक्त मन जीवनाच्या मोहात पाडतं.

प्रीतिपुष्प कोमेजणार नाही अशी काळजी घेणारा जिवंत झरा बाळगणारी, त्यागाचा भार वाटणार नाही अशा तऱ्हेनं त्याग करणारी, अपार माया असलेली उर्मिला जितकी खरी वाटते, तितकाच 'वेध' मधील भय्या, त्याचं जाईशी जुळलेलं प्रेमाचं तरल नातं वाचकालाही फुलवत नेतं. पण जाईला बहीण म्हणताना भय्याची कलदार मनस्वी व्यक्तिरेखा कुठे तरी उणावल्यासारखी वाटते.

'जरब' आणि 'माझी मुंज' मधील चाळीस पन्नास वर्षांपूर्वीचं वातावरण. बहिणीला मारणारा मेहुणा आणि सुनांवर हात उगारणारा काका यांना वठणीवर आणून स्वतः चंपाबाईच्या सुरांनी आणि मनगटावरच्या गजऱ्याच्या सुवासानं धुंदावलेले आबा. म्हणून झुरणारी आई. किती आवरला तरी त्या सुरांच्या दुनियेत विहरणारा सदू. स्त्रीच्या मनाची अगतिक स्पंदनं, अश्रू पीत जगण्यातली तिची मनोवेदना, त्यातली सूचकता सगळ्या वाचकांच्याही अंतर्मनापर्यंत पोहोचतं.

खानोलकरांच्या 'देवाच्या आई' चं दुःख वागवणारी शांतीची अशांत कहाणी. अशा लोकांच्या हॅलो हॅलोला हलकटच उत्तर मिळणं हा अटळ असा दैवदुर्विलास आहे. पाण्यात पडणारी पिशवी वाचवली म्हणून

आभारादाखल शातीकडे पाहून प्रसन्न हसणारी बाईही तिला पाहून ओठाला मुरड घालते. स्पर्शाने मैत्रीण दुरावते. बुचाच्या फुलावर पाय पडला की टच् आवाज होतो. शांतीच्या अशात मनातलो अशीच दुखरी टच् टच् लेखिकेन फार समरसून बोलकी केली आहे. गाडीच्या दारात उभी राहिलेली विव्हल शांती, दारातून पडलेली प्रकाशाची पिवळी चौकट त्या चौकटीत जेलीसारखे थरथरणारे काळे चकचकीत सापासारखे पळणारे प्रवाही रूळ, मध्येच किंचाळत पलीकडे जाणारे. शांतीच्या मनातली तीव्र हुरहुर, त्या चौकटी ते रूळ याचं एक लागट बोचरं मिश्रण वाचकाला गुदमरवत. आणि ती देवाची आई नसते तर समाजान तिला जनावराहूनही हीन केलेल असत हेही जाणवतं.

'चौकटीतून आरपार' ही स्वप्नावरील शास्त्रशुद्ध प्रयोगावर आधारलेली कथा पुढे मिथिक होते. शॉवरच्या आवाजाने पाऊस पडल्याची स्वप्न पडणं. गाण्याच्या आवाजाने त्या गाण्याशी निगडित असे मनातले विचार काही रूप घेऊन येण. इथपर्यंत हे प्रयोग मानवी पातळीवरचे आहेत. पण वेटिकाशीर्षक लिपीतला कागद अजयजवळ येणं, अजयच्या हाताला चुरगळलेल्या पानाचा वास येण हे अतिमानवी स्तरावर जात. इथे मिथ सुरू होते.

'एका संध्याकाळी'मध्ये गॅलरीत उभ्या असलेल्या पुष्पाला दिसणाऱ्या अंधाराच्या लाटा पश्चिमेच्या लाल नारिंगी रंगाला झाकून टाकणाऱ्या. मधूनच उठणारे तुषार; आकाशात जाऊन चांदण्या बनणारे. निळाई चांदण्या हा अंधारालाही मिळणारा दिलासा, शांतीचा विश्रब्धतेचा. दोन्ही बाहू पसरून आकाशाला विळखावेसे वाटणाऱ्या पुष्पाचं मन पुन रस्त्याने धावत घरी निघालेल्या शेळ्या, बकऱ्यात घोटाळलं, पिंपळपानासारखे लपलपणारे त्याचे कान पुष्पाच्या मनात पिंपळपान डोलवू लागले. इथेही पुन्हा लेखिकेच्या मनाची मातीची, जीवनाची शाश्वताची ओढ अतीताला कवटाळण्याच्या ऊर्मीतूनच उमललेली दिसते.

'धडपड' ही इडिपसशी फारस साम्य नसलं तरीही इडिपसची आठवण करून देणारी कथा. मनस्विनी शरयू, देहस्वी अरुण शरयूबद्दलची त्याची ओढ. 'अरुणुल्या' हे लहानपणचं संबोधन वापरून अंतर राखणारी शरूताई मलमपट्टी करणारी साकार होण्यापलीकडे गेलेलं गाळीव सत्य. संधिप्रकाशानं भरलेला आणि मिटून गेलेला आकाशाचा शिंपला. शिंपला मिटण्याशिवाय गत्यतरच नव्हतं. पुनः तडजोड. मनस्वी असली तरी शरयू मुक्ता होऊ शकली नाही. त्याचप्रमाणे 'जलचर' कथेतही अस्लम कालिंदी या माणसाची मनं इतर माणसांप्रमाणेच सागरासारखी खोल आहेत. त्यामुळे त्यातले जलचर एकमेकापासून दूर होण्याचा व्यवहारी निर्णय घ्यायला भाग पाडतात. आणि तशीच 'क्षणाच्या वळणा'वर दबून राहिलेलं पर्व मनातल्या आपल्या कप्प्यात दडवणारी मीना बसमधल्या सहप्रवाशाबद्दलच्या आसक्तीची ऊर्मी जीवनाच्या चाकोरीबद्ध प्रवाहात दडपून ठेवणारी

## स्त्री व्यक्तिरेखांना प्राधान्य

'चिमणी' ही यातली जिवंत मूलभूत प्रश्न निर्माण करणारी कथा. सत्यकथेत अतर्भूत असायला हवी असलेली. पण प्रत्यक्षात 'माहेर'मधून प्रसिद्ध झालेली. येथे 'द्रौपदीच्या वस्त्रा आड श्रीकृष्ण नागडा झाला.' या ग्रेसच्या ओळीची आठवण होते. पदराआडचा, लोणी मागणारा मुलगा मोठा झाला विमानात बसून भुर्रकन् उडाला. आईला व्याकूळ करून. तो पदराआड असताना तिचं मन त्याच्यात गुतल होत तसंच आताही गुंतलेल आहे सत्य हृदयविदारक न मानणारी अलिप्तपणे जगणारी चिमणी ती होऊच शकत नाही. तिच्या स्वतःच्या आईची मृत्युघटका जवळ आली आहे. आत्ताच तर तिन इग्रजी व्याकरण शिकवलं होतं. तिच्या हातच्या पदार्थांची चव अजून जिभेवर आहे. अस्तित्वाबरोबर ज्वलत अस्मिताही लोपली पण हे सगळं लोपत असताना ती तरी. चिमणी झाली असेल का? ही विदारक शंका स्वीकारायला किती कठीण आहे? माणसाला माया बाधून ठेवते. अलिप्त होता येत नाही. चिमणीसारखं मुक्त होता येत असतं तर! सत्य इतक कटु का असावं?

माणसांच्या मनाच्या साडपाण्याची सोय काय? त्यांना नवीन विचाराचे नवचैतन्याचे झरे नकोत काय? म्हणूनच क्रूर असले तरी चैतन्यानं जिवतपणानं लसलसणारे आर्य जिते होतात. 'अखेर'मधील पिम्प्रचं हे म्हणणं जरी खर असलं तरीही सुसंस्कृत म्हणवून घेणारे आर्य, त्याच्या टोळ्या किती क्रूर रानटी होत्या ते उघडपणे दिसतं. केवळ ते जेते झाले म्हणून इतिहास पुराणांनी त्यांना गौरविलं. इतिहास जे त्याचा खुषमस्कऱ्या असतो हेच खरं या ठिकाणी आर्यांना अनार्यांना पाहून आठवण होते ती ज्यूंची.

अशा या खिळवून ठेवणाऱ्या कथा. स्थलाभावी सर्वांचा परामर्ष घेणं शक्य नाही मुक्त मनाला प्रेमाच मायेचं रेशमी बंधन आहे त्यामुळे त्या बधनात अडकलेल्या व्यक्ती. कधी ते बधन जोडतं कधी मोडतं. कधी जास्तच गुतागुत करतं. पण हे सगळंच वास्तवाची कास धरून, उलगडत जातय. म्हणून जिवत वाटत. माणसाच्या मूडस्ना मिळते जुळते निसर्गाचे मूडस् फार परिणामकारक वाटतात. झाडं पानं फुलं चांदण्या आकाश वगैरे. विशेषत. भोगमधील यामिनी आणि मीरा याना एकच चित्र दिसतं पण दोघीचे आविष्कार पूर्णपणे भिन्न होतात. एकीला त्यातून जीवन उमळताना दिसतं. एकीला तो मृत्यूचा मार्ग दिसतो. या दर्जाच्या साहित्याला अनुदान मिळवून प्रकाशात येण्याची वेळ यावी इतक मराठी प्रकाशन विश्व दरिद्री आहे का? असा प्रश्न पडतो आणि फार खेद होतो.

या कथांमध्ये साधारणपणे स्त्रियांच्या व्यक्तिरेखांना अभावितपणेच प्राधान्य आले आहे. त्या उत्कट असल्या तरी लवचिक समतोल आहेत. उर्मिला, मीरा, जाई, कालिंदी वगैरे. कुंदाताईंची भाषा टोकदार नाही. पण कनवाळू आहे. सहज फुलत जाणाऱ्या फुलासारखी आहे. वाचकाच्या मनाला गोजारत तरीही सलत, अस्वस्थ


मराठातील एक सच्चे आत्मचरित्र
हंसा वाडकर
सांगत्ये ऐका
चौथी आवृत्ती
मूल्य : १४ रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

करीत रहाणारी ही कथा सपत कुठेच नाही. उत्तर, शेवट सगळच शोधत रहाव लागतं हे या कथेच यश आहे.

मुखपृष्ठावर चंद्राकडे दृष्टी लावून बसलेली, सर्व सोसणारी, कृश, एकच पाढर फूल ल्यालेली श्वेतवस्त्रा मुक्तकेशा नायिका प्रातिनिधिक आहे.

— शकुंतला जोग

क्षणाचे वळण
कुंदा पारसनिस
सुपर्ण प्रकाशन
पृष्ठे : १०६, किंमत : १६ रुपये

## पंचकथाओ

पाच आटोपशीर कथांचा संग्रह. दोन कथाना राजकोय व थोडीशी कौटुंबिक वातावरणाची पार्श्वभूमी, दोन कथाना सामाजिक पार्श्वभूमी व एका कथेला कौटुंबिक जीवनाची पार्श्वभूमी लेखकाचे नाव कथाकार, कादंबरीकार म्हणून नावाजलेले आणि म्हणून त्या ओढीने पुस्तक वाचायला घेतले पण कथा अतःकरणाला खास करून भिडतील असे वाटले नाही. लेखकाने जे अवलोकन केले, त्याचे शब्दरूप म्हणजे या कथा साध्या, सरळ, सोप्या कथा. प्रसग घडत गेले आणि त्या त्या प्रसगात आलेल्या व्यक्ती व त्याचे व्यक्तिदर्शन एवढेच दिसते असो.

त्या कथासबधी थोडक्यात सांगणे आवश्यक वाटते.

१) ध्वजा : कथेला एका राजकीय पक्षाची व त्याच्या कार्याची पार्श्वभूमी पण त्यातही मध्यमवर्गीय कुटुवाच्या जीवनावा स्पर्श. पार्टीच्या कामानिमित्त सबध आलेला बयस्क, मध्यम व तरुण तरुणीच्या मनाची घालमेल दाखविली आहे आणि तरीही कोणाला कोणाच्या मनाचा थागपत्ता लागत नाही. आतरजातीय विवाहाला लेखकाचा पाठिंबा दिसतो पण! ... नायक शरद सुशिक्षित पण जन्माने मराठा. याच्या तोडी ब्राह्मण व मराठे याच्या पिढीजात संस्काराची व जातीची भाष्ये घालून लेखकाने काय मिळविले? का समाजात अशा व्यक्ती असतात असे दाखवायचे आहे? पण त्यात ठिसूळपणा दिसतो. शरद चांगला शिकलेला, उच्च पदस्थ नोकरीत असलेला—कम्युनिस्टासारखे वागणे पण त्या तत्त्वज्ञानात तो पक्का मुरलेला असेही दिसत नाही. एके ठिकाणी तर तो मराठ्यासारखा वागतो असा उल्लेख आहे वीणा व ज्योती या जन्माने ब्राह्मण. वीणाचा नवरा जयंत कम्युनिस्टाचा पुढारी. कार्यकर्ता. त्याचे आकस्मिक निधन. ज्योतीचा प्रियकर शरद. या दोघीच्या सहनशील, संयमी व गरीबपणाच्या वागण्याचा शरद व त्याच्यासारखे दुसरे कसा गैरफायदा घेतात हे त्यात दाखविलेल्या कौटुंबिक चित्रणावरून वाटते. शेवटी अती झाले की माती होते—सबध दुरावतात नायिका ज्योती जरी शरीराने आणि मनाने अशक्त दाखविली आहे तरी तीच पुढे अन्यायाला तोड देण्याकरिता स्फुलिंगासारखी फुलते व नायक शरद याला बाजूला सारते. पार्टीच्या कार्याला वाहून घेते. कथेचा हा शेवट निश्चयात्मक वाटतो.

२) स्थूल आणि सूक्ष्म : पृ. ४६ वर लेखक लिहितो (कथेतला 'मी') ... पण गंमत बघा. आपणना कधीकधी सहज म्हणून काही गोष्टी करतो. त्यातून निष्पन्न व्हाव असं काही नसत पण त्यातून एखाद्याच्या आयुष्याला पार कलाटणी मिळते आणि सहज म्हणून काही करणारे आपण ते जिथल्या तिथच खितपत पडतो...' तसेच पृ. ५५ वर लेखक लिहितो, '... आपण सहज म्हणून काही तरी करतो त्याने दुसऱ्याचे नशीब फळफळते, आपण बसतो बोबलत ...' या दोन संदर्भावरून (ही द्विरुक्ती कशाला?) या कथेतील 'मी'ची भूमिका आणि पर्यायाने कथेचे सार दिसते. एखाद्या फडतूस माणसाला (आपल्या भिडस्त स्वभावामुळे) सहानुभूती दाखवून फुलवल तर तो कसा फुलत जातो आणि तरीसुद्धा त्या फुलणाऱ्या माणसाला स्वतःच्या मर्यादा कळत नाहीत अशा माणसाचे चित्र म्हणजे कथेतील नायक (लेखक) दिवाकर सौदागर. सामान्य असा प्रा. मोकाशी व त्याची अति शहाणी पत्नी उमा याची शब्दचित्रे म्हणजे एकेक नमुनेच म्हणता येतील. साहित्य प्रातात झब्बुगिरी कशी चालते याचेही चित्र लेखकाने जाता जाता दाखविले आहे. साधी सरळ गोष्ट वाटते पण उत्कठा वाढविते.

३) दैत्य : सरकारी, जिल्हा परिषदसारख्या कामकाजात आजकाल गरीब, अश्राप, शिकलेला पण नेकीने काम करणाऱ्या अधिकाऱ्याचे काही कारण नसताना कसे वाटोळे होते आणि त्याला कारण म्हणजे त्याच्या डोक्यावर असलेले निर्बुद्ध अधिकारी व त्याच्या पुढे पुढे करणारे लाळघोटे कसे असतात त्याचे हे चित्रण म्हणजे ही कथा. निष्पाप अशा नायकाच्या पत्नीचा नायकावर झालेला अन्याय आणि त्यामुळे मनाला लावून घेऊन त्यात तिचा झालेला अत. शेवटी मरताना ती त्या निर्बुद्ध अधिकाऱ्याना शाप देते की त्यांचे वाटोळे होईल. हा शाप सवाष्णीचा आहे आणि तो खरा होईल असे त्या पापभिरू पण निर्बुद्ध माणसाना खरे वाटते म्हणून शेवटी नायकावरील आरोप मागे घेतात, पण इकडे नायक व त्याची एकुलती एक मुलगी याचे जीवन उध्वस्त होते असा शेवट केला आहे कथा बरी आहे.

४) काळवेळ : व्यक्तीचित्रणे उत्तम. यातील 'दोडम्मा' म्हणजे 'हातानं करतील आणि तोडान घालवील' अशी. तिची नात 'मोगा'. तिचा बाप (दोडम्माचा मुलगा) व आई अल्पवयीन वाटतात म्हणून दोडम्मा व मोगा एकमेकीच्या सोबती. मोगाचे दैवयोगाने लग्न होत नाही. काही काळ शिक्षिका म्हणून राहिलेली पण तीही तिची नोकरी सुटते व त्यामुळे पुढे दोडम्माची सेवा करण्यात आयुष्य घालविणारी प्रौढ कुमारिका. देवेंद्र भट, शानभोगमामा, डॉ. ममदापूर ही नावे व गावाची नावे शिमोगा, दावणगिरी आणि कषाय (पेज ?) मुबरी वगैरे पदार्थांची नावे वाचल्यावर या कथेचा परिसर उत्तर कॅनरा (कर्नाटक) पण कोकणच्या परिसराजवळचा (सृष्टीसौंदर्याच्या दृष्टीने) असा वर्णनावरून वाटतो. 'राडच्या' मुलाला 'पुता' म्हणणे वगैरे भाषेचा डौल तिकडचाच. कथेचा एकदर सूर करुणामय आहे आहे त्या परिस्थितीत भागवायचे ही माणसांची वृत्ती. या कथेतून एक गोष्ट ध्यानात येते ती अशी नियतीने ठरविल्याप्रमाणे आम्ही जणू काही त्या घराण्यांतील व्यक्तीना पूर्वीच माहीत असावी अशी त्याच्या मरणाची वेळ खरी होते. एका घराण्याचा जणू काही तो ठेवाच असावा असे दृगोचर होते. दोडाम्माचा शेवटही (ती शेवटपर्यंत शुद्धीवर राहून) तिला जाणवत असतो. अशा तऱ्हेच्या घटना लेखकाने अवलोकिल्या असतील हे जाणवते.

५) महाकथा : भारताला स्वातत्र्य मिळाले त्यावेळेचा फाळणीचा काळ, निर्वासिताचे लोढे, राजधानीतील हत्या, दगली कत्तली याचे वर्णन. कथेतील बापू म्हणजे दुसरेतिसरे कोणी नसून महात्मा गाधी व त्यांच्या जीवनातील तत्त्वज्ञान (अहिंसा, आत्मशुद्धी, ब्रह्मचर्य) याचा उल्लेख. खास उल्लेखनीय म्हणून या कथेकडे बघता येणार नाही.

—वसंत फाटक

पचकथाई
वसत नरहर फेणे
श्री विशाखा प्रकाशन, पुणे
पृ. : १७०, किमत : ३० रु

# वृत्तपत्र-शाळेच्या वर्गात

पृष्ठ ४ वरून

लागतील असेच असतात त्यामुळे मुलाचो Practical Vocabulary निश्चितच वाढते.

लहान वर्गातील activity oriented पाठही वर्तमानपत्रामुळे सहज शक्य होतात. चित्रे कापणे, चिकटवणे, रगवणे यासारख्या अनेक तऱ्हानी हे होईल. नुकताच इथे पिनांग या बेटाला जोडणारा नवीन पूल बाधून पूर्ण झाला. आमच्या पाचवीतल्या मुलाने त्या पुलाची आलेली छायाचित्रं कापून ती मनिलापेपरवर चिकटवून त्याच्या जोडीला त्या पुलाची विशिष्ट माहिती लिहून एक तक्ता तयार करून वर्गात लावायला नेला. त्याच्या शिक्षकानी इतर मुलाना आणखी एका नवीन इमारतीचा असाच तक्ता तयार करायला सांगितला. सर्वच मुलाच्या सहजासहजी सामान्यज्ञानात भर.

**वाचनाची गोडी**

नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र यासाठी तर वर्तमानपत्र किती उपयोगी आहे ते सागण्याचोही गरज नाही.

असो. तर या NIE प्रकाराची सुरुवात कशी झाली ?

१९५०–६२ च्या दरम्यान अमेरिकेतील वृत्तसपादक, समाजशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ याच्या लक्षात आले की, टि. व्ही.च्या प्रसारामुळे मुलामध्ये वृत्तपत्र वाचनाची सवय फारच कमी होऊ लागली आहे. त्यावर काय उपाययोजना करावी, यासाठी विचार करण्यासाठी घडवून आणलेल्या चर्चांचे फलीत म्हणजे, वृत्तपत्र वर्गातल्या अभ्यासक्रमातच सामावून घ्यायचे, हा विचार पुढे आला. अन् त्या दृष्टीन पावल टाकली गेली.

Newspaper in Education ची तीन उद्दिष्टे होती. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, मुलाचे सामान्यज्ञान वाढवून त्याना सभावतालच्या वस्तुस्थितीबद्दल जागरूक रहायला शिकवणे आणि भविष्य काळातील वृत्तपत्रवाचक तयार करणे.

उपक्रमाची सुरुवात झाली अन् त्यामधून चौथे महत्त्वाचे उद्दिष्ट्य प्रभावीपणे पुढे आले ते म्हणजे Enhance a Lesson, शिकणे आणि शिकवणे या प्रक्रियेतील गोडी वाढवणे.

१९५२ साली या उपक्रमाची अधिकृत सुरुवात समजली जाते. पण न्यूयॉर्क टाईम्सने १९३० मध्ये NIE ची सुरुवात केली म्हणतात. अमेरिका आणि इतर पाश्चात्यदेश आणि ऑस्ट्रेलिया या देशामधून या उपक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढीला लागली आहे असे दिसून आले आहे. लहानशा लोकल दैनिकापासून ते मोठमोठ्या वृत्तपत्रसंस्थानी चालवलेल्या अशा NIE उपक्रमाची सख्या जगात जवळजवळ ६०० च्या आसपास आहे.

'The Omaha World Herald', 'The Balfimore Sum', 'The Age (ऑस्ट्रेलिया)', 'The Sunday Morning' 'The Sun of Herald(मेलबोर्न) वगैरे अनेक वृत्तपत्रानी हा उपक्रम शाळाशाळातून सुरू केला आहे त्याला प्रतिसादही खूपच चागला मिळतो आहे. मुलांमध्ये उत्सुकता, कुतूहल जागृत झाल्यामुळे शिकणे आणि शिकवणे अधिक मनोरंजक बनते आहे.

मलेशियात काही महिन्यापूर्वीच या उपक्रमाची सुरुवात झाली आहे. श्री. मॅकफलॉड आणि श्री. बुनवर्थ या 'The Age' दैनिकाच्या NIE तज्ज्ञानी इथे येऊन त्यासबंधीचे एक सेमिनार, वर्कशॉप घडवून आणले. त्यानतर इथले दोन शिक्षक आता शाळामध्ये याचे प्रात्यक्षिक वर्ग घेऊन दाखवतात. मी स्वत: एक प्रात्यक्षिक वर्ग पाहिला. शिक्षकानी वर्तमानपत्रातील एक बातमी निवडली. 'विमानोड्डाणाला विलब झाल्यामुळे चिडलेल्या प्रवाशाने तक्रार केली की आम्हाला विलबाचे कारण तीन तास झाले तरी का कळू नये ?'

ही बातमी सर्व मुलाना वाचायला सागितली. त्यानतर काही मुलांना तुम्ही तक्रार करण्यासाठी वाक्यरचना कशी कराल ? ती करायला लावली. काही मुलाना तुम्ही काऊटरवर असाल तर उत्तर कस द्याल ती वाक्य करायला सागितली. त्यानतर विमानोड्डाण व तत्संबधीचे सर्व शब्द फळ्यावर लिहिले. त्यानंतर प्रत्येकाला विलबाचे एक एक नवीन कारण आणि तेही most rediculous शोधून काढायला सागितले. प्रत्येकाचे विलबाचे कारण ऐकताना सारा वर्ग खदखदून हसत होता. कुणेसागे Flight Engineer झोपला, कुणी म्हणे विमानात पेट्रोलऐवजी पाणीच भरल्याच लक्षात आलं. कुणी म्हणे पायलटचं पोट दुखतय ... आता त्यातला गमतीचा भाग निरर्थक वाटला तरी मूळ उद्देश इंग्लिश, संभाषण, वाक्यरचना, अवघड शब्द सहज साध्य होऊन गेला होता.

आपल्याकडेही टि. व्ही., व्हिडिओचा प्रसार आणि कॉम्प्युटरचं आगमन यामुळे मुलाची वाचनाची गोडी कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे हे नाकारता येणार नाही. शिवाय सध्याचे शिक्षण हे अत्यंत पुस्तकी आहे ते अधिक जीवनाभीमुख व्हायला हवय असं सारेच म्हणतात. मग त्यासाठी आपल्या रोजच्या जीवनातील वृत्तपत्र ही इतकी महत्त्वाची गोष्ट, तीही सहजसाध्य अन् स्वस्त शिक्षणक्रमात सामावता येण शक्य नाही का ?

काहीचा दावा असेल की हे आम्ही करतो आहोतच. पण अगदी नियमित, योजनाबद्ध तऱ्हेने वर्तमानपत्राचा उपयोग करणं ही NIE ची योजना आहे. इथल्या काही शाळामध्ये ४०० – ५०० च्या वर कॉपीज घेऊन दररोज मुलाना त्या वर्तमानपत्राचा वर्गात उपयोग करायला लावतात.

आपल्याकडच्या परिस्थितीला योग्य त्या तऱ्हेने खचितच आपण हे प्रभावी माध्यम वापरू शकू.

सौ. सुजाता तांबे
मलेशिया

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्याचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलाची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**

# पौराणिक व्यक्तिरेखांचा वेगळा शोध : सं. मंदोदरी

वि. भा. देशपांडे

संगीत मंदोदरी हे गो. नी. दांडेकरांचे नवे नाटक. दांडेकर प्राधान्याने कादंबरीकार म्हणून मान्यता पावलेले. पण त्याच बरोबर त्यांचे अल्प प्रमाणात झालेले नाट्यलेखनही लक्षात घेण्यासारखे आहे. विशेषत: 'जगन्नाथाचा रथ', 'शितू', 'पवनाकाठचा धोंडी' ही नाटके निरनिराळ्या कारणांनी रंगभूमीवर आपला ठसा उमटविणारी. अर्थात या नाट्यकृतींना (विशेषत: शितू आणि धोंडी ) त्यांच्याच कादंबरीवर लेखनाचा भक्कम आधार. किंबहुना या कादंबऱ्यांची ती नाट्यरूपे. पण मंदोदरीच्या संदर्भात तशी स्थिती नाही.

नाटकाच्या शीर्षकावरून काळ आणि नाट्यविषय यांचा किमान अंदाज आपल्याला येतो. तो म्हणजे रावणकाळातील हे नाटक असणार. त्यातही रावण म्हटल्यावर सीताहरण आणि राम–रावण युद्ध ह्या दोन गोष्टी आपण गृहीत धरतोच. ह्या दोन्ही गोष्टींचा दांडेकरांनी जरूर उपयोग केला आहे, पण तो सांकेतिक पद्धतीने नाही किंवा पारंपरिक रीतीने नाही. तर नाट्यघटना त्याच ठेऊन त्यातून व्यक्तिरेखांना आणि प्रसंगांना एक वेगळे परिणाम देण्याचा यत्न या नाटकात आहे.

सामान्यत: मराठी नाटककार इतिहास किंवा पुराणातील व्यक्ती–प्रसंग नाट्यरचनेसाठी स्वीकारतो. तेव्हा तो त्या व्यक्तीच्या संदर्भातील लोकमानसाला सहसा धक्का लागणार नाही याची काळजी घेतो. लोकमानसातील प्रतिमांचा वेगळा अर्थ शोधणे अथवा त्या प्रतिमांना छेद देणे अनेक दृष्टीने घातक ठरणारे असू शकते. म्हणून सावधतेचा सुकर मार्ग अनेकजण स्वीकारतात. पण मंदोदरीमध्ये दांडेकरांनी इतका सोयीचा मार्ग स्वीकारला नाही ही आनंदाची, महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. रावणाने सीतेला लंकेला आणलेली कळताच मंदोदरीच्या जीवनात प्रचंड अस्वस्थता निर्माण होते. रावणाची अपेक्षा अशी की, आपल्या या अपूर्व पराक्रमाचे स्वागत आपल्या पत्नीकडून होईल, आपली मनोकामना पूर्ण होईल. सीतेचा उपभोग आणि पर्यायाने रामावर सूड उगवण्याची कांक्षाही पूर्ण होईल. या कार्यासाठी आपली पत्नी आपल्या साथीला राहील. पण तसे घडत नाही. तसे न घडण्यातले नेमके नाट्य दांडेकरांनी पकडले आहे. मंदोदरीचा विरोध केवळ व्यक्तिगत स्वार्थासाठी नाही तर तो अधिक खोलवरचा विरोध आहे. तो स्त्रीत्वाच्या स्तरावरून केलेला विरोध आहे, एक स्त्री म्हणून, माणूस म्हणून मंदोदरीने सीतेकडे पाहिले आहे. अशा स्त्रीची विटंबना आपल्या नवऱ्याकडून होऊ नये म्हणून ती खंबीर विरोधात उभी आहे. दांडेकरांनी तिला दिलेले परिमाण मंदोदरीच्या व्यक्तिरेखेबरोबरच एकूण नाटकाची उंची वाढवते.

या नाटकाच्या निमित्ताने आणखी जाणवणारी गोष्ट म्हणजे मराठी पौराणिक नाटकांत रावण आणि मंदोदरी या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा इतक्या विस्ताराने आणि वेगळ्या स्तरावर प्रथमच आल्या. किंबहुना रावणाच्या जीवनात घडलेल्या महत्त्वपूर्ण घटनेचा असा अन्वयार्थ नाट्यपूर्ण रीतीनेही प्रथमच व्यक्त झाला. व्यक्तिरेखांच्या संदर्भातील वेगळा विचार जसा झाला, तसाच या नाटकाची संवादभाषा हाही विचारात घेण्यासारखा भाग आहे. विषयाला–व्यक्तिरेखांना अनुकूल अशी प्रौढ संवादभाषा दांडेकर वापरतात. प्रौढतेबरोबरच काही ठिकाणी ( विशेषत: रावणाच्या तोंडी वर्णनाच्या वेळी ) त्या संवादांना आलेली लयबद्धताही आपल्याला गुंतवून ठेवणारी आहे. मात्र अलंकरणाच्या सोसापायी प्रसंग आणि व्यक्तिरेखा झाकोळून जाणार नाहीत याचीही काळजी घेतली गेली. नाटकात संगीताचा झालेला वापर अतिशय माफक आहे. त्यातील रचना पद्यांपेक्षा काव्याच्या जवळ जाणारी अधिक आहे. पारंपारिक संगीत नाटकाचा बाज असलेले नाटक केवळ पारंपारिकतेमध्ये अडकून न राहता नवीनतेचा शोध घेणारे आहे, वेगळ्या दिशेचा प्रवास करणारे आहे.

संगीत नाटकाचे लेखन ही दिवसेंदिवस दुर्मिळ गोष्ट होत चालली आहे. त्याला कारणेही तशीच आहेत. संगीत नाटकाला नव्या पिढीचा प्रेक्षक थोड्या प्रमाणातही नाही. जुन्या पिढीतील प्रेक्षकांचा प्रतिसाद ठराविक नाटकांपलिकडे जात नाही. त्यांना त्यांच्या परंपरेतले–पठडीतलेच नाटक, त्याच बाजात हवे असते. त्या चौकटीला धक्का लावणारे नाटक कितीही चांगले असले तरी ते पाहतीलच असे नाही. त्यामुळे दोन्ही बाजूंनी संगीत नाटकाचा प्रेक्षक कमी होत चालला आहे, हे सतत जाणवणारे सत्य आहे.

पण अशाही स्थितीत जी काही थोडी मंडळी संगीत नाटके नेटाने करीत असतात, त्यामध्ये शिलेदार कुटुंबीय आहेत. ते सौभद्र, मानापमान, स्वयंवर ही पारंपारिक संगीत नाटके करतातच; पण त्याचबरोबर खानोलकरांचे 'अभोगी' आणि आता दांडेकरांचे 'मंदोदरी' ते करीत असतात. संगीत नाटकाशी या मंडळींचे नाते अतूटपणाने जोडलेले आहे.

शिलेदारांच्या संदर्भात एक गोष्ट सातत्याने जाणवत आलेली आहे, ती म्हणजे नाटक नवे असो, की जुने असो, प्रयोगातील व्यवस्थितपणात कोठेच कमतरता रहात नाही. याचा प्रत्यय मंदोदरीत येतो. रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य आदी जी प्रयोगतंत्रे आहेत, त्यामध्ये कोणतीच कसूर राहिलेली नाही. दिग्दर्शनाची जबाबदारी दीप्ती भोगलेने स्वीकारली होती. नाटकाचा अन्वयार्थ प्रेक्षकांपर्यंत नेमकेपणानं पोहोचेल अशी काळजी तिने घेतली आणि त्या दृष्टीने आवश्यक त्या

गोष्टी दिग्दर्शनाच्या संदर्भात तिने केल्या. विशेषत: पात्रांच्या हालचाली आणि विरचना. संपूर्ण रंगमंचाचा वापर करून मंदोदरी-रावण यांच्या वास्तव्याची ही वास्तू आहे, याची जाण सतत त्यामध्ये होती.

स्वत: दीप्तीने (पूर्वाश्रमीची लता शिलेदार) मंदोदरीची भूमिका तितक्याच ताकदीने केली. विशेषत: मंदोदरीचे उभे राहणे, चालणे-बोलणे आणि एकूणच व्यक्तिरेखेचा आब उत्तम राखला गेला. मात्र एक गोष्ट जाणवली ती म्हणजे नाटककाराने मंदोदरीच्या सौंदर्याचे केलेले वर्णन आणि प्रत्यक्ष कलावती यामध्ये अंतर आहे. झाले एवढेच की, दीप्तीने आपल्या कामामुळे अशा काही उणीवा कामी केल्या. शिलेदारांच्या नाटकात कीर्ती ही नायिकेच्या किंवा केन्द्रवर्ती भूमिकेत पाहण्याची आपल्याला सवय आहे; पण या नाटकात कीर्ती दुय्यम पण महत्त्वाच्या व्यक्तिरेखेच्या स्वरूपात आपल्यासमोर येते. कीर्तीने केलेली मेघावरी लक्षात राहणारी आहे. गाण्यामुळे काही प्रमाणात पण व्यक्तिरेखेतील अघळपघळ बोलण्यामुळे, मुद्राभिनयामुळे आणि एकूणच नाटकात रंग भरण्यामुळे. रामराज्यवियोगातील कीर्तीने केलेली मंथरा जशी ध्यानात राहील तशीच ही मेघावरी. जी काही गाणी आहेत, ती मेघांवरीला प्राधान्याने आहेत. नीलकंठ अभ्यंकरानी दिलेले संगीत प्रसंगाला अनुकूल आहे. आटोपशीर आणि परिणामकारी आहे.

या नाटकात आणखी लक्षात राहील, तो म्हणजे रावणाची भूमिका करणारा राहूल सोलापूरकर हा कलाकार मूळचा हौशी-प्रायोगिक रंगभूमीवरचा; पण योग्य संधी मिळताच व्यावसायिक रंगभूमीवर आला. मिळालेल्या संधीचा त्याने पूर्ण फायदा घेऊन आपले गुण सिद्ध केले. त्याला असलेली शारीर उंची, भरीव आवाज आणि अभिनयाची उत्तम जाण यामुळे त्याने रावण यथार्थपणे उभा केला. त्याला त्याच्या गुणांमुळे व्यावसायिक रंगभूमीवर निश्चितच वेगवेगळ्या भूमिका मिळतील. त्याचे रंगमंचीय भविष्य उत्तम ठरेल, अशी साक्ष रावणाने दिली आहे. शिलेदारानी अशा कलाकाराची निवड करून हौशी-व्यावसायिक रंगभूमीची केलेली जोडणी महत्त्वाची आहे. ती याही आधी त्यानी केली आहे; पण रावणाने ती अधिक अर्थपूर्ण केली.

लेखन, अभिनय आणि काही प्रमाणातले संगीत यामुळे हा प्रयोग अवश्य पाहण्याजोगा आहे. संगीतप्रेमी असलेल्यानी आणि नसलेल्यांनीही ! □

चित्रपट

## स्त्री धन – जरा वेगळा

मराठी चित्रपटसृष्टीत चाकोरीबाह्य चित्रपट निर्माण करणारी जी थोडीफार मंडळी मोडतात त्यात फत्तेलाल बंधूचं नाव विसरता यायचं नाही. 'चोरीचा मामला' नंतर बऱ्याच वर्षांनी त्यानी 'स्त्रीधन' हा वेगळ्या पार्श्वभूमीचा चित्रपट निर्माण केला आहे.

अभयसिंह इनामदार (कुलदीप पवार) हा लहानपणापासून प्रेमाविना वाढलेला आणि त्यामुळे पाषाणहृदयी वगैरे झालेला तरुण. आपले 'शोक' पुरवता पुरवता तो इतका कर्जबाजारी होतो की 'खानदान की इज्जत' वाला वाडाही त्याला गहाण टाकावा लागतो. कोर्टाच्या एका दाव्याच्या संदर्भात जुनी कागदपत्रं धुंडाळताना त्याला गुप्तधनाचा नकाशा सापडतो. चेहऱ्याच्या विशिष्ट जागी तीळ असणारी आणि कौमार्यभंग न झालेल्या तरुणीचा बळी दिल्यावर त्याला या गुप्तधनाची प्राप्ती होणार असते. चित्रपटीय योगायोगानुसार त्याला नकाशातील सर्व क्वालिफिकेशन्स असणारी रत्ना (अलका कुबल) ही मुलगी लगेच भेटते. गुप्तधनाच्या लोभाने तो तिच्याशी लग्न करतो. लग्न झाल्यावरही त्याची परस्पगत कुठल्याही पातळीवरची जवळीक राहत नाही. दरम्यान रत्नाला तो नकाशा सापडतो आणि मग अभयसिंहाच्या प्रत्येक कृतीचा अर्थ तिला कळू लागतो. पण तिच्यातले जाज्वल हिंदू स्त्रीत्व एकदम तळपू लागल्याकारणाने ती आपण या बाबतीत अज्ञानी आहोत असे दाखवते. त्याची सेवाशुश्रुषा वगैरे निष्ठेने करत राहते. अखेर एका पौर्णिमेच्या दिवशी अभयसिंह रत्नाला नकाशात सांगितलेल्या स्थळी बळी द्यायला नेतो. तिथ रत्ना स्वहत्या करायलाच तयार आहे असं कळल्यावर त्याला तिच्या महान वगैरे त्यागाची कल्पना येते. मग गुप्तधनावर पाणी सोडून ते घरी परततात. इकडे नायकाचा कुठला तरी काका अचानक अवतरुन सर्व कर्जाची क्षणार्धात बेगमी करून टाकतो. आणि मग ते रिवाजानुसार सुखेनैव नादू लागतात.

कथेचा हा सांगाडा जरी जरासा वेगळा असला तरी त्यात भरण्यात आलेला मसाला मात्र तद्दन मराठी आहे. कौटुंबिक पातळीवरील त्यागाची चढाओढ, 'पती हेच माझे दैवत, माझी जागा त्याच्या पायाशी' सारखी हिंदू स्त्रीच्या पातिव्रत्याची झलक दाखवणारी ओशट वाक्ये, सावत्र आईने सावत्र मुलाचा केलेला छळ ते नवऱ्यानं बायकोचा केलेला छळ अशा छळाच्या विविध छटा, घरगड्याच्या बावळटपणामुळे निर्माण होणारे विनोद, तोंडी लावायला गावरान लावणी असा हा सगळा 'मराठी मामला' आहे. परंतु हेही मान्य करायला हवं की इतर मराठी चित्रपटाच्या तुलनेत 'स्त्रीधन' बराच उजवा आहे. त्याची तांत्रिक बाजू सबळ आहे. कथा कौटुंबिक असली तरी तिला असलेल्या रहस्यमय झालरीमुळे कथेची प्रेक्षकाना खुर्चीत खिळवून ठेवण्याची शक्ती वाढली आहे. आणि दिग्दर्शक बाबासाहेब फत्तेलाल, छायाचित्रकार एम्. गोकुळ व संकलक विजय खोचीकर या त्रयीनं मिळून कॉम्प्युटर युगातील या भाकडकथेतील भाकडपणाकडे प्रेक्षकाना दुर्लक्ष करायला लावलय.

आशा काळे इतिहासजमा होऊ घातल्यामुळे आणि रंजनाच्या दीर्घ आजारामुळे मराठी चित्रपटाच्या पडद्यावर सविता प्रभुणे, अर्चना जोगळेकर, सुप्रिया सबनीस सारखे जे नवे चेहरे दिसायला लागले त्यात अलका कुबल या सुजाण अभिनेत्रीचं नावही महत्त्वाचं आहे 'स्त्री धन' मध्ये तिनं सहनशीलता, त्यागशीलता, दयाशीलता आणि अनेक 'ता' चा अर्क असणारी रत्नाची भूमिका केली आहे. तिच्या वैयक्तिक दुसऱ्याच चित्रपटाच्या मानानं तिची कामगिरी दखलपात्र आहे.

अभयसिंहाची नायक कम् खलनायकाची भूमिका कुलदीप पवारनं व्यावसायिक सफाईनं पार पाडली आहे खर्जातला आवाज हे त्याचं सगळ्यात मोठं भांडवलं आहे आणि अभयसिंहाची मुजोरी भूमिका करताना त्याला

या आवाजाचा फार उपयोग झाला आहे.

कुठलाही व्यावसायिक धोका पत्करायचा नाही असं ठरवल्यामुळे दिग्दर्शकाला कामिनी भाटियाच्या लावणीचे प्रयोजन करावे लागले आहे. नाचण्यापलीकडे आणि एक दोन मादक हुंकार काढण्यापलीकडे कामिनीला या चित्रपटात स्थान नाही. प्रकाश इनामदार आणि आशा पाटील या विनोदी जोडगोळीने प्रेक्षकांना परिहासाचा रिलीफ देण्याचे काम चोखपणे पार पाडले आहे. बाकी राघवेंद्र कडकोळ, जयराम कुलकर्णी, पी. डी. पाटील हे आहेतच.

चित्रपटाचं संगीत विश्वनाथ मोरे यांचं आहे. चित्रपटातील सर्व गाणी ही त्यांनी स्वतःच्याच अनुकरणातून निर्माण केली असली तरी त्यांनी दिलेल्या पार्श्वसंगीतामुळे प्रत्येक दृष्याला एक गूढ परिणामकारकता लाभली आहे.

एकूण सध्या मराठी चित्रपटांमध्ये दर्जात्मक वाढ होतीय. अशा दर्जेदार मराठी प्रेक्षकांचा प्रतिसादही उत्तम आहे. 'लेक चालली सासरला' 'धूमधडाका' सारख्या चित्रपटांनी मराठी चित्रपटसृष्टीला वेगळी क्षितिजे दाखविली आहेत. 'स्त्री धन' ही त्यांच्याच रांगेत बसणारा चित्रपट आहे.

—मिलिंद संगोराम

# बाँड ३०३

## विदेशी सिगरेट म्हणून चक्क देशी जर्दा !

आपल्याकडे मद्रासी सिंदूर असतो ना तसा मॅजेंटा कलरसारखा भडक आणि इडलीसांबार इतका सहज व कमरेला लुंगी लावावी तसा गुंडाळलेला चित्रपट म्हणजे बाँड ३०३.

रामायण, महाभारतापासून जगातले कुठलेही विषय कॉपी करण्याचा जन्मसिद्ध हक्क असलेल्या आपल्या फिल्म इंडस्ट्रीने 'बाँड'-सारख्या प्रतिमेला मोकळं सोडायचं म्हणजे डोळे असून आंधळं असण्यासारखं !

साधारण ७० सालच्या सुमारास, आसपास जितेंद्र नावाचा छकडा हिरो पडद्यावर आला. तोच काही काळ पांढरी पँट, लाल टी शर्ट, पांढरे बूट असले रामा गड्यांना एकदम पैसे मिळाले तर ते कसे कपडे शिवतील तसले कपडे घालून 'इंडियन बाँड' झाला. नंतर हा बाँड मद्रासमध्ये गेला आणि तंग तुमान, तंग नट्या यांच्या सहाय्याने 'मार्केट' सांभाळून राहिला तो आजतगायत.

निर्माते बी. सी. देवरांचा बाँड ३०३ हा चित्रपट, त्या चित्रपटाची प्रिंट आणि परवीन बाबी सारखी हिरॉईन यावरून बरीच वर्षे रखडलेला होता हे आधीच कळतं आणि देवकुमार, प्रेम चोप्रा, मॅकमोहन, टॉम अल्टर सारखे 'देशद्रोही' या चित्रपटात आहेत आणि कादरखान, शक्ती कपूरसहित बप्पी लाहिरीचं संगीत नाही यावरूनही हा चित्रपट 'जुना'च होता हे सिद्ध होतं याशिवायही एक जबरदस्त पुरावा—उत्खननात सापडलेल्या नर्तकीसारखी चक्क 'हेलन' आम्हाला इथं सापडली ! आर. डी. च्या तालावर व आशाच्या सुरावर 'मैऽऽलिली' असं हिंदकळत व हिंदकळवत सापडली.

तर साधारण ११ वी—एस. एस. सी. बंद झाली त्या सुमाराच्या या चित्रपटाची कथा 'देश के गद्दारों के खिलाफ' आहे. या देशद्रोह्यात सायंटिस्ट वगैरे. (या असल्या चित्रणामुळं पुढे कॉमर्सची लाट आली) कॅबरे डान्सर, जुडवा बहन त्यातली एक अर्थातच 'देव' पार्टीत दुसरी 'राक्षस' पार्टीत. नंतर तिचा वाल्मिकी होणार. यात एक आणखी गंमत आहे. श्रीराम लागू प्रचंड 'जागरूक' संपादक दाखवलेत. देशातल्या घटनांवर ते कसलीही भीडभाड न ठेवता पोलीस, सरकार यावर सडेतोड लेखणी चालवत असतात. (पुढे आपल्याला कळतं की देशद्रोह्यांचा खतरनाक सूत्रधार 'टायगर' म्हणजे श्रीराम लागू उर्फ वर्माच आहे !) त्यामुळे मला आता उगाचच माधव गडकरी वगैरेंची शंका यायला लागलीय !

अशा या दे मार आणि मरतुकड्या चित्राचे दिग्दर्शक आहेत रवी टंडन.


त्यांनी चित्रपटाची सुरुवात आणि शेवट यात थोडीशी गुंतागुंत, देशद्रोह्यांचे 'गुदाम्स' सुकलेल्या चेहऱ्याचे पोलीस. पावणे आठ हिरो. हिरॉईन व कॅबरेडान्सर इ. इ. गोष्टी मारामारीसकट व्यवस्थित रचल्यात.

बाँड असल्याने जितेंद्रला गड्यांसारखे कपडे घालायला विशेष वाव मिळाला नाहीए. बऱ्याचदा सूट. परवीन बाबी नावाची जी एक नटी होती, जी सध्या गायब आहे ती पडद्यावर आलीय आपली. स्टंट सिनेमातल्या बायांसारखी तिनेही थोडी हाणामारी केलीय. या बाईला इंडस्ट्रीत चागलं 'वळण' लागायच्या आतच ती कुठं टर्न झाली कळत नाही. प्रेम चोप्रा, देवकुमार, मॅकमोहन या राक्षस पार्टीची कामं देवासारखी प्रामाणिक. आमच्या वडिलांच्या वगैरे उमेदीच्या दिवसात असावं तसलं 'दिलखेचक' वगैरे नृत्य हेलनने केलंय. श्रीराम लागूंनी जेवढे पैसे मिळाले तेवढाच अभिनय केलाय.

बाकी छायाचित्रण म्हणजे 'मुन्नी' कॅमेरा असल्याने सगळं हलत होतं एवढंच. आरडी बर्मनने विशेष काही वाजवले नाही. उपजत बुद्धी आहे; पण अभ्यासाचा कंटाळा किंवा दुर्लक्ष करणाऱ्या मुलासारखं आर्डी करतो. शोले, हम किसीसे... इ. इ. मधले पीस 'टू बाय टू' सारखे वापरलेत !

एकूणच हा 'बाँड ३०३' म्हणजे विदेशी सिगरेटच्या नावाखाली देशी जर्दा विकण्याचा प्रकार आहे आणि यातल्या तकलादू कथा, ट्रिक्स, टेकिंग, उन्हात वाळवलेल्या कुरड्या डब्यात भरताना तटतट तुटाव्या तसल्या 'फायटिंगी' आणि चमेली हिरो यामुळे या देशी जर्दाची 'पिक'ही या सिनेमाच्या नावाने टाकू नये असला गिळंकृत चित्रपट आहे.

—संजय पवार



लवकरच प्रकाशित होत आहे...

या कॉम्प्यूटरमध्ये दडलंय काय ?
आणि
ऊर्जा प्रश्न : आशा उद्याच्या

यानंतरचे
व्यावहारिक—व्यावसायिक उपयोगाचे
आणखी एक राजहंस प्रकाशन

# लघुउद्योग मार्गदर्शक

लेखक : शिरीष सहस्रबुद्धे

छोटे उद्योग चालू करणं, अन् यशस्वी करणं
यासाठी उद्योजकांना-बँकेच्या आणि सरकारी अधिकाऱ्यांना
असायलाच हवी अशी चौफेर, ताजी, बहुमोल माहिती
मराठीत प्रथमच एकत्र.

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई : ४०० ०२८ * फोन : ४२२ ५४५५